
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९८९

REFBK-0006263



# संघटन-संजीवनी

६२६३

संपादक

ग. प. पाटणकर

REFBK-0006263

मूल्य १। रुपया

प्रकाशक—एम्. आर्. कुळकर्णी,
मांगलवाडी, गिरगांव, मुंबई

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे आदि सर्व हक्क
स्वातंत्र्यवीर सावरकर यांचेकडे आहेत.

मुद्रक—द. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई



# सुखी होण्याचा मार्ग



आपल्या मांत्रिक व ज्योतिष विषयक ज्ञानानें प्रसिद्धीस
पंडित डी. व्ही. शर्मा यांची १ च मुलाखत घ्या.
जीवन सुखी करा. जगण्याला कंटाळलेल्या आणि वैतागले-
ांनीं आपले आयुष्य सुखसंपत्तीत कसें घालवावें ते आश्चर्यजनक दैवी-
अद्भुत मंत्रयोग चमत्कारानें, हस्तरेषा, किंवा ज्योतिषशास्त्रानें
करून देतील. धंदा रोजगारांत नुकसान, नोकरींत त्रास,
ैराश, रेस-सट्टा-लॉटरी वगैरेमध्यें नुकसान ह्या व
हेच्या चिंता ह्यांतून सोडवणूक करतील. तसेंच कर्जदारींतून
भयंकर अशा रोगांतून मुक्तता करतील करितां आजच भेटा आणि
भाग्यशाली व्हा.

बाहेरगांवच्या ग्राहकांनीं उत्तरासाठीं ८० चे तिकिट पाठवावें.

**पंडित डी. व्ही. शर्मा** ३४६ एंजिनियर बिल्डिंग १ ला माळा
र मुक्तागिरीसमोर, ठाकुरद्वार, मुंबई २ [ टे. नं. ३२ . . २ ]

# श्रीविनायक–वंदन

( भूपाळी )

धन्य नरवरा श्रीविनायका वीरांच्या वीरा ॥ धीरा ॥
अभिनव भारत अभिवादित तुज हिंदभाग्य–भास्करा ॥

दास्यनिशेमधिं अवघा भारत घोरत जधिं पडला ॥ भारत ॥
स्वातंत्र्याची उषा उदेली देसी हांकेला ॥ १ ॥

चतुरंगबलें सिद्ध विपक्षा आव्हानित आला ॥ वीर हा ॥
मातृभूमिस्वातंत्र्यरक्षणा रणीं उभा ठेला ॥ २ ॥

इच्छामात्रें अविरत गगनीं विहगराज विहरे ॥ गगनीं ॥
दुष्टदंड भेदितां वक्ष कीं भूमितलाते पडे ॥ ३ ॥

किंवा स्वैरा संचारा करि गहन अरण्यीं कुणी ॥ केसरी ॥
व्याधशरें होऊनी विद्ध गति रुद्ध जाइ होऊनी ॥ ४ ॥

अप्रतिहत परि धैर्य जयाचें तुटतीं जधीं शृंखला ॥जयाच्या॥
हिंदुत्वाच्या जयघोषानें भारत घुमवीला ॥ ५ ॥

अतुल त्याग, धी, अतुल धैर्यही अतुल तुझें सारें ॥धैर्यही॥
श्रमलि लेखणी, शब्द संपले वर्णन परि अपुरें ॥ ६ ॥

—पिछाडीवरचा सैनिक

# हें पान वाचण्याचें धाडस करणाऱ्या

# वाचकांस—

**फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥**

केसरी, त्रिकाळ, प्रभात इत्यादि ठिकाणांहून मारलेली ही लूट, लूटमारीची संधि दिल्याबद्दल त्या त्या घरधन्यांचे आभार मानीत नि या घरधन्यांचेही घरधनी जो स्वातंत्र्यवीर सावरकर त्यांचेविषयीं कृतज्ञता व्यक्त करीत वाचकांचे हातीं देतांना मला अकल्पित समाधान होत आहे. या अकल्पितची कुळकथा पुढीलप्रमाणें आहे. गेल्या गणेशोत्सवाचे वेळीं स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं मुंबईत जीं व्याख्यानें दिलीं त्यामुळें मुंबईच्या हिंदु जनतेंत बरीच जागृती झाली. हिंदुसभेची भूमिका ज्यांना कळलीच नव्हती त्यांना ती कळली नि पटलीही, ज्यांचे गैरसमज होते ते दूर झाले, जे हिंदुत्वनिष्ठ होतेच त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेला उजळा मिळाला. आपल्या चाळींत व्याख्यान असतांही दारें खिडक्या बंद करून नि काळे पडदे लावून सूर्यप्रकाश अडविणारे मूढात्मे अपवादादाखल सांपडणार नाहींत असें नाहीं. पण त्यामुळें प्रकाश त्यांच्याच डोक्यांत पडला नाहीं, सूर्याचें नुकसान कांहींच झालें नाहीं.

व्याख्यानांनीं झालेली ही जागृती पाहून मुंबईत व इतर ठिकाणीं झालेली कांहीं व्याख्यानें त्याचप्रमाणें कांहीं निवडक लेख यांचा एक संग्रह प्रकाशित केल्यास संघटनेच्या दृष्टीनें तें हितकर होईल असें मला वाटलें. तथापि विलीयमान होण्याकरितांच ज्यांचे मनोरथ उद्भवतात अशा वर्गांतील मी असल्यानें आजचा दिवस उगवेल अशी मला कल्पनाही नव्हती.

ही संग्रहाची कल्पना ज्या वेळीं माझ्या मनांत आली त्याचवेळीं वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीचे येथील कट्टर हिंदुत्वनिष्ठ एजंट श्री. एम्. आर. अर्थात् अप्पाराव कुळकर्णी यांचे मनांतही तोच विचार आला. थोर माणसांची मनें एकाच दिशेनें विचार करीत असतात अशा आशयाची इंग्रजी म्हण मला आठवत आहे. पण तिचा उपयोग माझ्या बाबतींत करण्याचें धाडस मला होत नाहीं ! असो. आमचे दोघांचे विचार एकमेकांना समजतांच मी हमालीचा वाटा उचलावयाचें मान्य केलें नि मुख्य जें आर्थिक सहाय्य तें देण्याचें श्री. अप्पाराव

कुळकर्णी यांनीं मान्य केलें. श्री. अप्पाराव यांच्या सहाय्याच्या अभावीं हा संग्रहच बाहेर पडूं शकला नसता.

प्रस्तुत संग्रहांत लेख आणि भाषणें असे दोन भाग करण्यांत आले नाहींत. लेख–भाषण, भाषण–लेख या पद्धतीचाही अवलंब केलेला नाहीं. कालानुक्रमही राहूं शकला नाहीं. सामुग्री जसजशी हातांत पडली तसतशी ती पाकगृहांत पाठ-वून दिली. निरनिराळ्या पक्वान्नांनीं भरलेलें ताट पुढें ठेवल्यावर ज्याला जें पक्वान्न अधिक आवडेल तें त्यानें अगोदर खावें. पक्वान्नांच्या मांडणीविषयीं वाद घाल णारा गृहस्थ आपलें अग्निमांद्य लपविण्याकरितांच तसें करीत असतो.

अन् भाषण नि लेख यांचा अनुक्रम तो काय लावायचा ? सावरकर बोलतांना लिहितात नि लिहितांना बोलतात; त्यांच्या लेखनांत वक्तृत्व आहे नि भाषणांत लेखन आहे. या संग्रहांतील ‘ वैभवशाली हिंदु राष्ट्र ’ हा लेख भाषण म्हणून सहज खपेल. ‘ महायुद्ध नि महासभा ’ हें भाषण लेख म्हणून खुशाल दडपून द्यावें.

भाषणांना प्रस्ताव वगैरे कांहीं दिला नाहीं. तसें करण्याची कांहीं आवश्य-कताच नाहीं. हजारों श्रोते, शेजाऱ्याच्या ( स्वतःच्या नव्हे !) श्वासोच्छासाचीही कटकट व्हावी इतकी शांतता, भावनांनीं उचंबळून आलेलीं हृदयें, प्रसंगानुरूप हंशा नि टाळ्या ( ज्ञानप्रकाशांतील नव्हे ), वीर सावरकरांच्या आगमन–निर्गमन प्रसंगीं स्वातंत्र्यवीरांचा नि हिंदुधर्माचा गगनभेदी जयघोष या गोष्टी प्रत्येक व्याख्या-नाचे वेळीं व्हायच्याच असा नियमच ठरून गेला आहे. बऱ्याच व्याख्यानांचे वेळीं घडणारा आणखी एक प्रसंग मी विसरतच होतों. स्वातंत्र्यवीर सावरकर यांची ओळख करून देण्याची आवश्यकता नाहीं असा ठराविक मंत्र तोंडानें म्हणत आपला मूर्खपणा श्रोत्यांवर लादण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रस्तावकांची ‘ अहो खालीं बसा, पुरे करा, तुमचें व्याख्यान पुन्हां केव्हां तरी ठेवा ’ अशा शब्दांत श्रोत्यांनीं केलेली संभावना हाच तो दुर्धर प्रसंग होय !

सर्व साधारणपणें पुस्तक निर्दोष झालें आहे असें माझें प्रामाणिक मत आहे. श्री. दलाल यांच्यासारख्या, कीं ज्यांचा हात कोणीच धरूं शकणार नाहीं–अर्थात् त्यांच्या कलेंत–अशा निष्णात कलावंतानें काढलेलें मुखपृष्ठावरील सुंदर चित्र, आंत तात्यारावांचे छायाचित्र, उत्तम मुद्रण इत्यादि सर्व गोष्टी

आहेत. त्यांतून यांत कोणाला दोष आढळलेच तर तो दोष त्याच्या 'काक-दृष्टीचा, माझा नव्हे.*

संग्रहाचा कालानुक्रम पाहिला तर त्यांत भागानगरपासून भागलपूरपर्यंतचा धांवता इतिहास ग्रथित झाल्याचें वाचकांना दिसून येईल. 'वैभवशाली हिंदु राष्ट्र' हा लेख १९३६ सालीं लिहिला गेला. लाहोरच्या जातपाततोडक मंडळाच्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनीं त्या अधिवेशनाकरितां लिहिलेल्या (कारण मंडळानें हरकत घेतल्यामुळें तें भाषण होऊं शकलें नाहीं) भाषणाला अनुलक्षून तो लेख लिहिला गेला ही गोष्ट वाचकांनीं अवश्य ध्यानांत बाळगावी. चौपाटीवरच्या भाषणाची तारीख १४ अशी पडली आहे ती चुकीची असून त्या ठिकाणी ११ चा आकडा पाहिजे 'संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा' हा लेख उशीरां मिळाला म्हणून तो संपूर्ण न घालतां त्यांतील (माझ्या मतें) महत्त्वाचा भागच तेवढा दिला आहे. असो.

उत्कृष्ट मुद्रणाबद्दल 'मौज प्रिंटिंग ब्यूरो' ची ख्याती आहे. ती अनाठायीं नसल्याचें प्रस्तुत पुस्तकाच्या मुद्रणावरून दिसून येईल. 'मौज प्रिंटिंग ब्यूरो'चे व्यवस्थापक श्री. जयरामभाऊ भागवत यांचा मी त्याबद्दल आभारी आहे. श्री. दलाल यांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांनीं वेळेवर चित्र दिलें नाहीं तरीही मी त्यांचा आभारी आहे !

श्री. अप्पाराव कुळकर्णी यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानूं ? अप्पारावांचे सहाय्य नसतें तर पुस्तक निघूच शकलें नसतें. या पुस्तकाला जनतेकडून चांगलें उत्तेजन मिळाल्यास स्वातंत्र्यवीराच्या लेख-भाषणांचा आणखी संग्रहही आपण प्रकाशित करूं असें अप्पाराव मजजवळ म्हणाले आहेत. त्यामुळें त्यांच्याविषयींच्या कृतज्ञतेनें माझें हृदय भरून आलें आहे.

आपल्या नांवाचा उल्लेख न करण्याविषयीं राजा जोशी व वसंत सोमण यांनीं विलक्षण धाक घातल्यामुळें त्यांच्या सहाय्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख टाळणें मला भागच पडत आहे !

पुस्तकांतील भाषणांवर वा लेखांवर मल्लिनाथी करून प्रस्तावनेच्या आपत्तींत आणखी भर मी टाकीत नाहीं !

संपादक

प्रभात कार्यालय, ता. ५।२।४२



नाशोनी तिमिरा स्वयें उगवतां हिंदुत्वभानू नभीं ॥
बोरू फेकुनि बंदुका उचलतां राष्ट्रीय सेना न भीं ॥
हिंदुजातिहितार्थ देह झिजवूं टाकूं अहिंसा पिसें ॥
दे अर्घ्यांजली ज्याचि त्यास सुममनें संजीवनीच्या मिषें ॥

# युरोपीय महायुद्ध व हिंदुमहासभा

आज मला चुकल्या चुकल्यासारखें होत आहे. मी सुटल्यापासून पुण्याला दोनतीनदां आलों आणि त्या प्रत्येक वेळेला सेनापति बापट गायकवाडवाड्यापासून तों मी स्टेशनवर पोहोंचेपर्यंत माझ्याबरोबर असत. एखादे वेळीं आम्ही जरा पुढें गेलों तर ते मागून हांक मारून म्हणायचे 'अरे, अरे, मी राहिलों आहे ना, ज्या मोटारींत सावरकर आहेत, त्या मोटारींत माझी जागा राखून ठेवलेलीच आहे.' माझ्या व्याख्यानाचा विषय त्यांना अनुकूल असो अगर नसो ते माझ्याबरोबर व्यासपीठावर हजर असावयाचेच, पण आज ते माझ्याबरोबर येथें नाहींत, आज मला

**पहिल्या प्रथम जर कोणाची आठवण होत असेल, तर ती सेनापति बापट यांची होय.**

त्यांना एक वर्षाची सजा झाली आहे. अशा प्रकारच्या शिक्षा देऊन देशांतील असंतोष कमी होईल अशी जर सरकारची समजूत असेल, तर ती चूक आहे. महासभेच्या कार्यकारी मंडळानें या बाबतींत ठराव करून स्पष्टपणें बजाविलें आहे कीं, अशा धरपकडीमुळें देशांतील अशांतता जास्तच वाढेल. सेनापतींना ५ वर्षांची सजा द्यावी असें सांगण्यांत आलें होतें. कारण काय तर त्यांना पूर्वीच्या शिक्षा आहेत. होय आहेत, आणि तेंच तर तें कारण आहे कीं, ज्यामुळें ते आज लोकांच्या अंतःकरणांत विराजमान झाले आहेत. त्या पुरुषाला स्वदेशासाठीं कष्टत असतां अनेकवार शिक्षा भोगाव्या लागल्या. त्यांचे माझे मार्ग भिन्न असतील; पण, त्यामुळें त्यांचा आमचा विरोध नाहीं, दोघांचें

**उद्दिष्ट एकच**

आहे. मी नाशिकच्या गाडीनें निघालों तर ते कलकत्त्याच्या गाडीनें निघाले. दोघांचेंहि ध्येय एकच आहे आणि अशा स्थितींत एकाला अपघात झाला, तर दुसऱ्याचें हृदय तळमळल्यावांचून रहाणार नाहीं."

८२६३

वरील प्रास्ताविक उद्गारानंतर 'महासभा नि महायुद्ध' या विषयाकडे स्वातंत्र्यवीर वळले. ते म्हणाले:—हिंदुस्थानच्या सध्यांच्या परिस्थितींत, या कोटीकोटींच्या देशांत, महासभा काय, राष्ट्रसभा काय किंवा महाराष्ट्र सभा काय यांनी कांहीं योजना आखावी अशी परिस्थिती नाहीं. येऊन जाऊन काय तर कोणाचा कार्यक्रम पंगु याची तुलना करावयाची. जन्मजात आंधळ्यांनीं आपल्या अंधत्वाची दुसऱ्याच्या अंधत्वाशीं तुलना करण्यासारखेंच हें आहे. या पंगुपणाचे आपण सर्वच जण भागीदार आहोंत. तो पंगुपणा घालविण्याचे प्रामाणिक प्रयत्न आपण सर्वांनीं केले पाहिजेत, मग ते प्रयत्न फॉरवर्ड ब्लॉक म्हणून करा कीं बॅकवर्ड ब्लॉक म्हणून होऊंद्यात. आपण पंगु आहोंत याचा अर्थ आपण उद्योग सोडले पाहिजेत असा नाहीं. 'पंगुं लंघयते गिरिम्' असेंहि घडूं शकतें. हिटलरचेंच उदाहरण घ्या ना. वीस वर्षांपूर्वी हाच हिटलर तुरुंगांत पडला असतांना, देशाची स्थिती पाहून ढसढसां रडत होता असें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत लिहून ठेविलें आहे. तो मनाचा अत्यंत हळवा आहे. अनेक वेळां त्याच्या आयुष्यांत हें करूं कीं तें करूं असे प्रसंग उद्भवले आहेत आणि त्याला रडू कोसळलें आहे. त्यानें आत्महत्येचेही तीनदां प्रयत्न केले होते. आजचा जर्मनी १२ वर्षांपूर्वी हिंदुस्थानप्रमाणेंच पंगु होता. आज ज्याप्रमाणें महायुद्धाच्या राजकारणाची चर्चा करायची आपल्याला लाज वाटते त्याचप्रमाणें तेव्हांच्या जर्मनीला युरोपीय राजकारणाची चर्चा करायला लाज वाटत असे. पण,

## हिटलरच्या प्रयत्नांनीं

तें राष्ट्र आज वर आलें. जर्मनीच्या उदाहरणाप्रमाणें हें राष्ट्र देखील तसेच प्रयत्न करीत गेलें तर आज ना उद्यां आपण गिरि लंघूं शकूं. आपल्या राष्ट्राची परंपरा, पांच हजार वर्षें नुसती जीवंत नाहीं. तर नांदत आहे; नांदत आली आहे

हिंदुमहासभा बोलून चालून येवढ्याचकरितां प्रवृत्त झाली आहे कीं, या राष्ट्रांत नांदत असलेलें खरें राष्ट्र जें हिंदुराष्ट्र तें कायम राहिलें पाहिजे. हें धोरण कोणाला आकुंचित वाटो. पण हिंदुमहासभेचें धोरणच समजलें नाहीं असें मात्र यापुढें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं.

मी जगाच्यापुढें मान ताठ करून हीच प्रतिज्ञा घेतली आहे. या जगांत हिंदूंचा कोणी वाली असलाच पाहिजे.

जगाच्या सगळ्या राजकारणाची कसोटी, सत्याची कसोटी, असत्याची कसोटी, हिंसेची कसोटी, अहिंसेची कसोटी, ही एकच असली पाहिजे. ती कसोटी म्हणजे हिंदूंचें कल्याण होईल तें सत्य, हिंदूंचें अकल्याण तें असत्य. जगताचें काय होईल? मानव्याचें काय होईल? हे विचार मुख्य नाहींत! तेहि विचार आहेत पण ते विचार दुय्यम आहेत. सूर्य गेला तर काय होईल? सूर्य विझला तर तो विझला म्हणून मला दुःख होणार नाहीं, तर हिंदूंना प्रकाश मिळणार नाहीं म्हणूनच मला दुःख होईल.

आजकाल आपलें कल्याण विसरणें हाच न्याय ठरला आहे. स्वतःची माणसकी विसरणें हेंच माणुसकीचें लक्षण ठरलें आहे.

महायुद्धाकडे हिंदुमहासभा एकाच दृष्टिकोनानें बघते. तो म्हणजे महायुद्धामुळें हिंदूंचा किती लाभ होईल आणि किती हानि होईल हें पहाणें हा होय. राष्ट्रीय सभेच्या वतीनें गांधींनीं लोकशाही राष्ट्रांवर संकट आलें असतांना त्यांना अडविणें योग्य नाहीं, ते संकटांत असतांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मला सोडवायचा नाहीं. What is even the freedom of India if Britain and France loose their freedom? असें गांधी म्हणतात. नेहरूहि चीनमधून नुकतेच परत आले होते. त्यांनींहि 'नाझीझम प्रभृति हुकुमशाही वादांचा विरोध करणें हें

## हिंदुस्थानचें एकमेव ध्येय

असल्याचें घोषित केलें. या दोन प्रमुखपुढाऱ्यांनीं प्रामाणिकपणानें हें धोरण प्रदर्शित केलें व त्याचेच प्रतिध्वनि इतरांच्या तोंडून दूरध्वनिक्षेपित झाले.

महासभेनें निश्चित भूमिका मांडणारा पहिला ठराव या परिस्थितींत केला. चालू युद्ध हें इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकरितां चाललें आहे, लोकशाहीकरितां चाललें आहे, हें युद्ध नैतिक आहे ही गोष्ट हिंदुमहासभा अमान्य करते. सर्वचजण स्वतःच्या संरक्षणासाठीं, स्वतःच्या राष्ट्राच्या स्वार्थासाठीं लढत आहेत. दहावा अवतार होऊन जगाच्या उद्धारासाठीं कांहीं कोणी लढत नाहींत.

जर्मनीनें पोलंडवर स्वारी केली तेव्हां प्रे. रूझवेल्ट यांनीं हिटलरला तार धाडून हें कृत्य योग्य नाहीं असें कळविलें होतें. मीहि पण प्रे. रूझवेल्ट यांना तार करून, हिटलरप्रमाणेंच हिंदुस्थानच्या बाबतींत तुम्ही इंग्लंडला तार करा असें कळविलें होतें. त्या तारेवरून तेथील पत्रांत अग्रलेखहि आले होते.

महासभेनें या

## ठरावाच्या दुसऱ्या भागांत

आपलें धोरण काय असावें तें सांगितलें आहे. हिंदुस्थानाच्या बाबतींत व्हाइसरॉय, भारतमंत्रि म्हणत आहेत कीं, तुम्ही अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवा म्हणजे आम्ही तुम्हांला स्वराज्य देतों–त्यांचें हें म्हणणें वांझेच्या मुलीच्या लग्नासाठीं पैसे देतों म्हणण्यासारखेंच आहे. पोलंडच्या बाबतींत हिटलरनेंहि चेंबर्लेनला सांगितलें कीं, तुम्हीं आधीं हिंदुस्थान मुक्त करा, म्हणजे मी पोलंड मुक्त करतों. जगामध्यें प्रत्येक राष्ट्र आपल्या लाभासाठीं

## सर्व कांहीं करीत आहे.

साम्राज्यें असलेलीं राष्ट्रें साम्राज्यरक्षणासाठीं, साम्राज्यें नसलेलीं राष्ट्रें तीं संपादन करण्यासाठीं लढत आहेत. नैतिक दृष्टीनें तुम्हांला पाठिंबा देण्यास आम्हीं बांधलेले नाहीं. तुम्ही तुमचे जीव वांचविण्याकरितां प्रयत्न करीत आहां, आम्ही आमचे जीव वाचविण्याकरितां या चौकटींत (ठरावाच्या) बसत असेल, तर कांहीं सहकार्य करूं.

मुसलमानांच्या पाकिस्थानच्या योजना आजच्या नाहींत, त्या १५–२० वर्षांपूर्वीपासूनच्या आहेत. किंबहुना त्या अहंमदशहा अबदालीच्या काळापासूनच्या आहेत. या पाकिस्थानच्या कल्पनेला जें आजचें नित्याचें स्वरूप आलेलें आहे तें या युद्धामुळें आलेलें आहे. मी तुम्हांला सांगतों कीं याबाबतींत इंग्लिश मुत्सद्यांशीं बोलणींचालणीं होऊन

## अलिखित करार

झालेले आहेत. इंग्लिशांची हानि न होईल अशा बेतानें व हिंदूंची कितीहि हानि झाली तरी मुसल्मानांच्या मागण्या पुरविण्यांत येतील. यांतून यादवीचें प्रकरण उद्भवण्याचाहि संभव आहे.

हिटलर कॅलेपर्यंत येऊन पोंचला आहे. एक पत्र कॅले घेतलें म्हणतें, दुसरें पत्र कॅले घेतलें नाहीं म्हणून म्हणतें तर तिसरें पत्र तो कॅलेपर्यंत पोंचला आहे असें म्हणतें. ब्रि. मुत्सद्दी लढाईच्या भयंकर पेंचांत सांपडलेले आहेत. यावेळीं गांधीजींनीं सांगितलें, 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न दुय्यम आहे' I don't

want to embarass the British. कोणाची लढाई आहे? ही काय गांधींची लढाई आहे? He did not like to embarass the Naizam मग तिकडे हिंदूंचें कांहींहि होवो. व्हाईसरॉयसाहेबांनीं आतां नुकतीच विजयासाठीं प्रार्थना करा असें सांगितलें आहे.

## प्रार्थना करायला मनुष्य केव्हां लागतो ?

प्रार्थना करायला सांगणें हें कांहीं मोठें शुभ लक्षण नव्हे ! आतांपर्यंत ख्राईस्टची आठवण कोणालाच नव्हती मला तर ख्राईस्टची कींव येते. कारण त्याचीं हीं दोन्हीं कोंकरें आपापल्याला विजयप्राप्ति व्हावी म्हणून त्याची प्रार्थना करीत आहेत. एका कानानें तो हिटलरची प्रार्थना ऐकत आहे, त्याच्या दुसऱ्या कानांत इंग्लिशांची प्रार्थना शिरत आहे. कोणाची प्रार्थना तो ऐकणार? मला वाटतें या प्रार्थनेवर ख्राईस्ट कांहींच बोलणार नाहीं. तो स्वस्थ बसेल.

युद्धाच्या या परिस्थितींत व्यवहाराला धरून, व गडबडींत फसून जाऊं नये असें धोरण महासभेनें आंखलें आहे. तें बुद्धिप्रधान आहे. जवाहरलालनीं एकदां सांगितलें, या वेळीं सत्याग्रह करतां कामा नये आणि लगेच पुन्हां दुसऱ्या ठिकाणीं ते सांगतात, इंग्लिशांचें तें कांहीहि जरी असलें तरी, आमचा स्वातंत्र्य-संग्राम आम्ही सोडणार नाहीं. अशी स्थिती होतां कामा नये.

केवळ हिंदुस्थानच्या संरक्षणापुरताच महासभेचा महायुद्धाशीं संबंध आहे च या संरक्षणापुरता संधि करायला हरकत नाहीं. केवळ पोथींतले शब्द वाचून राजकारणांतील कोडीं सुटत नाहींत. एखादा मनुष्य काल शत्रु होता म्हणून आज तो शत्रु राहीलच असें नाहीं किंवा काल मित्र होता म्हणून आज तो मित्र राहीलच असेंहि नाहीं. अशा स्थितींत सांभाळून बेतानें मैत्री ठेवावयास हरकत नाहीं. गेल्या युद्धांतील फ्रान्सचा दोस्त इटली आज नाहीं फ्रान्सच्या विरुद्ध आहे? आणि १९२५ सालीं रशियाला रोग म्हणून संबोधणारा हिटलर पोलंडच्या प्रश्नावर एका रात्रींत रशियाचा दोस्त नाहीं का बनला ?

महासभेनें आपल्या सहकार्यासाठीं पुढें मांडलेल्या अटींत युद्ध संपतांक्षणींच वसाहतीचें स्वराज्य मिळालेंच पाहिजे अशी मागणी केली आहे. वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणें म्हणजे तुमच्या स्वातंत्र्याच्या बाष्कळ बडबडीला कलंकच नाहीं का असें कोणी म्हणतील. पण ध्येय व वास्तववाद यांत फरक

आहे, आणि यांत कलंक असला तरी, राजनिष्ठेच्या प्रतिज्ञा घेऊन मंत्रिमंडळ स्वीकारण्याच्या कलंकापेक्षां तो खास कमी आहे.

महासभेचें दुसरें मागणें म्हणजे

## हिंदुस्थानचें अखंडत्व कायम राहिलें पाहिजे

आज पाकिस्थानची चळवळ जिवंत चळवळ आहे. ती खंबीर आश्वासनावर आधारलेली आहे. याचा अर्थ खाकसारांच्या फावड्यांनीं हिंदुस्थान उकरला जाईल असा नाहीं. खाकसारांच्या फावड्यांनीं हिंदुस्तान उकरावयाचा प्रयत्न म्हणजे फावड्यांनीं हिमालय उकरण्याच्या प्रयत्नासारखा आहे. जोंपर्यंत हिंदु राष्ट्र अशी कल्पना ज्याच्या मनांत आहे असा एक हिंदु जिवंत असेल तोंपर्यंत पाकिस्थान होणें शक्य नाहीं.

कॉंग्रेसनें आझाद मुस्लिम परिषद स्वतःच्या खर्चानें भरविली. कॉंग्रेस मुसलमानांना मुसलमान म्हणून मानते तर तेवढाच न्याय हिंदूना हिंदु म्हणून कां देत नाहीं? तुम्ही राष्ट्रीय असाल तर कोणालाच बोलूं देऊं नका. अर्थात् तुमच्यांत तेवढी शक्तिं असेल तर ! आझाद परिषदेचे ठराव कॉंग्रेसनें उचलून धरले आहेत. आझाद परिषदेनें मुसलमानी हिंदुस्थान असा तुकडा न पाडतां सर्वच हिंदुस्थान आमचा आहे असें म्हटलें आहे एवढेंच. आणि एवढ्या शब्दापुरतें मी त्यांचें अभिनंदन करतों. आझाद परिषदेनें एवढें मात्र सांगितलें आहे कीं, मुसलमानांना काय हवें आहे हें सांगण्याचा अंतिम अधिकार मुसलमानांचा असला पाहिजे आणि मुसलमानांना काय पाहिजे हें सांगणारे मुसलमान मुसलमान गटांतून निवडून येणार आहेत, तर हिंदूना मात्र काय पाहिजे हें सांगण्याकरितां स्वतंत्र मतदार संघ नाहींत, अशा स्थितींत घटनापरिषदेंत हिंदूंची काय दुर्दशा होईल याची कल्पना करा. मुस्लिम लीगचे जे प्रतिनिधी येतील ते पाकिस्थानची मागणी करणार, तर आझाद परिषदेचे मुसलमान येतील त्यांचें म्हणणें कॉंग्रेसनें मान्य केलें पाहिजे; कारण मुसलमानांना काय हवें हें ठरविण्याचा

## अंतिम अधिकार

त्यांच्या हातीं आहे.

या परिस्थितीचा, तुम्ही कोणीहि असा, राष्ट्रसभावादी वा सुभाषवादी असा, तुम्हांला जर हिंदु म्हणून जर जिवंत रहावयाचें असेल, तर विचार केला पाहिजे.

आज सारखें काँग्रेस आणि लीग, लीग आणि काँग्रेस असें ऐकूं येतें. याचें कारण एकच, नि तें म्हणजे काँग्रेस आज सत्तेला विरोध करीत नाहीं. काँग्रेसनें जेव्हां विरोध केला तेव्हां त्यांनीं तिला दमडीचेंहि महत्व दिलें नाहीं.

> गांधींनीं चार वेळेला स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, मुसलमानांनीं पाकिस्थान मागितलें तर अशी कोठली शक्ति माझ्याजवळ आहे कीं, मी त्यांना अडवूं शकेन. मी स्पष्टपणें सांगतों. मी गांधींना ती शक्ति दाखवितों. ती शक्ति हिंदुमहासभा आहे. ( टाळ्यांचा कडकडाट )

मुसलमानांची पाकिस्थानची कल्पना म्हणजे केवळ पंजाब स्वतंत्र करावयाचा अशी नाहीं, तर या देशांत पंजाब, सिंध, बंगाल, निझाम अशीं स्वतंत्र मुसलमान राज्यें स्थापन करावयाचीं अशी आहे. या पाकिस्थानासाठीं

## सर्वस्वाचा त्याग करण्याची घोषणा

हुबळीच्या मुस्लिम लीग परिषदेंत मुसलमानांनीं केली आहे.

मी कर्नाटकच्या दौऱ्यावर गेलों होतों तेव्हां तेथले लोक म्हणाले, आमच्याकडे हिंदुमुसलमान कांहीं नाहीं सर्व ठीक आहे. त्याच कर्नाटकाच्या मुसलमानांनीं हा ठराव केला आहे. मी मद्रासमध्यें गेलो तेव्हां तेथेंहि मुस्लिम लीगची परिषद झाली आणि फझलुल हक्कांनीं सांगितलें कीं, मलबार हा अरबस्थानचा भाग आहे तो त्याला जोडला गेला पाहिजे. असें आहे काय ? होय तर मग मीहि आव्हान देतों. We shall annex Arabia to Malbar. आम्ही अरबस्थानचें मलबारला जोडून घेऊं

## वचने किं दरिद्रता ?

शब्दांनीं मनुष्य कसा फसतो याचें उत्कृष्ट उदाहरण गांधींच्या शब्दांत सांपडते. ते म्हणतात ' मी जीनांचे राज्यांत सुखानें राहीन कारण, त्यांचें राज्य झालें तरी तें हिंदी राज्य आहे. ' हिंदी या

## शब्दानें कशी फसगत होते

याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. येथें राज्य केलेले औरंगजेब वगैरे हिंदीच होते. मग त्यांच्याविरुद्ध शिवाजी महाराजांना कां उठावें लागलें ? आज त्यांना कोणी मार्ग चुकलेले देशभक्त Misguided Patriot असें म्हणतात.

पण महाराष्ट्रांत तरी त्यांना Misguided Patriot म्हणणारा कोणी नराधम नाहीं. हिंदुस्थानांत राहणारे म्हणजे हिंदी असें म्हटलें, तर येथले साप, विंचू, वाघ हेहि सर्व हिंदीच होतील; पण, आपण त्यांना तसें मानतों का ?

गांधीजींनीं सर सिकंदरांचे पूर्वज ब्राह्मण होते व त्यांना त्यांचा अभिमान वाटतो असें म्हटलें होतें. गांधींच्या या उद्गारांवरून मुस्लीम लीगच्या ईस्टर्न टाईम्स या पत्रानें त्यांच्यावर

**बदनामीची फिर्याद करण्याची चळवळ**

चालविली आहे. आपण आपल्यावरून भोळसटपणानें त्यांची कल्पना करतों. तसें बघितलें तर इंग्लिशहि आर्यच आणि हिटलरहि स्वस्तिकाचीच पूजा करतो. प्राणिशास्त्रदृष्ट्या सिंह आणि गाय एकच. पण गाय सिंहाच्या पोटांत जाते !

अशा स्थितींत रक्ताच्या संबंधाचा काय उपयोग ? औरंगजेब तर रजपुतानी-च्याच पोटचा होता आणि त्यानें आपल्या भावाचा शिरच्छेद केला. तेव्हां यांत रक्ताचा संबंध नाहीं. तसें म्हटलें तर आपण नाहीं का दत्तक घेऊन त्याला सर्व मालमत्तेचा वारसा देत ? तेथें त्या रक्ताचा संबंध कोठें आहे ? मानसिक भाव, मानसिक महत्त्व हेंच राष्ट्राचें खरें लक्षण आहे. तो मानसिक भाव, मानसिक महत्त्व हिंदूंत आहे. तें मुसलमानांत नाहीं. या परिस्थितीवर एकच उपाय आहे तो म्हणजे हिंदूंच्यावतीनें बोलण्याचा अधिकार हिंदूंच्याच प्रतिनिधींना या हें म्हणणें व्हाइसरॉयसाहेबांकडून मान्य करवून घ्यावयाचें.

ता. ३१ जुलै १९४० पुणें.

---

# आत्यंतिक अहिंसा हें पाप होय

परवांच कॉंग्रेसचे अध्यक्ष आझाद यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, शस्त्राखेरीज कोणतेहि राष्ट्र २० तासमुद्धां आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकणार नाहीं. मला आश्चर्य वाटते त्यांनीं ही २० तासांची अट कां घालावी ? मी तर म्हणतो कीं, क्षणभर देखील टिकूं शकणार नाहीं. परंतु वरील शब्द कॉंग्रेसच्या अध्यक्षाचे मुखांतून बाहेर पडले आहेत, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

आज देशांत गांधीवादी, रॉयवादी, फॉरवर्ड ब्लॉक वगैरे ब्लॉक्स आणि त्यांचे हेडस आहेत.त्या सर्वांचें धोरण देशाचें बरें करावें हेंच आहे; हीच खरी मनापासूनची सर्वांची इच्छा आहे. परंतु, हें करतांना आपलें धोरण व तत्त्व कोणतें असावें हा महत्वाचा भाग आहे, या दृष्टीनें मी

## तर्ककर्कश चर्चा

करणार आहे आणि त्या दृष्टीनें मी जर व्याख्यानांत थोडीफार टीका केली तर ती व्यक्तीवर नसून धोरणावर होय. या चर्चेचा उद्देश व्यक्तीवर टीका करण्याचा नाहीं हा विवेक ऐकणारांनीं ठेवावा आणि मीहि तो विवेक पाळीन.

## शांतिब्रह्माचा पत्रव्यवहार

आज हिंदुस्थानांत जे पक्ष आहेत त्यांत एका बाजूला गांधींचा पक्ष आहे. त्यांनीं युद्धाच्या सुरवातीला हिटलरला पत्र धाडून त्याला युद्ध करूं नको म्हणून सांगितलें. पण त्या वेड्यानें तें ऐकलें नाहीं, ब्रह्मदेवाचीहि बुद्धि तिरपी झाली आणि हिटलरनें १५ राष्ट्रें पचनीं पाडलीं. हिटलर हा राक्षस आहे असें आपल्याला वाटणें साहजिकच आहे.

## साधें दूध पचविण्याची शक्ति

आपल्या अंगांत नाहीं तेथें हिटलरनें अवघ्या वर्षाच्या आंत देश घशांत घातले, तर मग आपण त्याला दुसरें काय म्हणणार ! परंतु, कांहीं वर्षांपूर्वी याच पंधरा राष्ट्रांनीं जर्मनीविरुद्ध कट करून जर्मनीचीं छकलेंछकलें केली होतीं. त्या गोष्टीचा

सूड म्हणून त्यानें हीं १५ राष्ट्रं जिंकलीं आहेत. त्याला पत्र धाडण्याला तुम्हाला तोंड नाहीं. हिटलरला पाठविलेल्या पत्राचा उपयोग न झाल्यानें गांधींनी इंग्लंडला पत्र पाठविले व कळविलें कीं, आपलीं घरेंदारें शत्रूच्या स्वाधीन करून मोकळे व्हा. अशी अहिंसा इंग्लंडनें आचरली असती तर हिटलरचीं सारीं शस्त्रास्त्रें निरर्थक ठरलीं असतीं असें ते म्हणतात, आणि एका अर्थी त्यांचें हें म्हणणें बरोबरच आहे. हो, रेल्वेचा पास काढून हिटलरला इंग्लंड घेतां आलें असतें तर बरेंच झालें असतें.

## उधमसिंग पक्ष

हा झाला एक पक्ष आणि दुसरा पक्ष म्हणजे सरदार उधमसिंगांचा. मी पुण्याला यावयाला निघालों तेव्हांच ते फांशी गेल्याचें वाचलें.

पंजाबमधील २० वर्षांपूर्वींच्या ओडवायर यांच्या राज्यसत्तेच्या गोष्टी खरें म्हणजे हिंदूंनीं विसरून जायला पाहिजे होत्या. पण ह्यानें २० वर्षंपर्यंत हा सूड डोक्यांत ठेवून, इंग्लंडला जाऊन तेथें ओडवायर यांना मारलें.

## रोगी मृत्यूशय्येवर
## वाद डॉक्टर—वैद्यांचा

बाकीचे आम्ही सर्वजण या दोन पक्षांच्यामध्यें घोंटाळत आहोंत. अशा परिस्थितींत स्पष्ट कल्पना आल्यावांचून पुढचा मार्ग आक्रमितां येत नाहीं. खरं म्हणजे जिवावरचा प्रसंग आला असतांना अशा प्रकारची तात्विक चर्चा करण्याची पाळी यावी ही गोष्ट लज्जास्पद आहे. 'एकच प्याल्यां'तील तळीरामाचें उदाहरण मला येथें आठवतें. रोगी मृत्युशय्येवर पडला असतांना पाश्चात्य वैद्यक चांगले कीं आर्यवैद्यक चांगले असा डॉक्टर—वैद्य खल करीत बसतात. त्याचप्रमाणें सध्यां हिंसा कीं अहिंसा असा खल चालू आहे. ही वेळ खल करण्याची नसून प्राप्त आपत्तीला तोंड दिलें पाहिजे.

## एक घाव नि दोन तुकडे

करण्याची ही वेळ आलेली आहे.

## कसोटी

हिंसा—अहिंसेबद्दल कांहीं ठाम अशी सूत्रमय कल्पना आपल्यापुढें मांडावी हा माझा बऱ्याच दिवसांचा हेतु होता. हिंसा—अहिंसा, चांगलें वाईट, धर्म—

अधर्म, न्याय–अन्याय, नीति–अनीति हें सर्व ठरविण्याचा एकच सिद्धान्त म्हणजे ज्या योगें मानवजातीचें हित होईल तो धर्म. ही कसोटी तात्विक दृष्ट्या खरी आणि व्यावहारिक दृष्ट्या सुसंगत अशी आहे.

मनुस्मृति, मार्क्स, लेनिन, या सर्वांनीं हीच कसोटी धरली आहे. धर्माधर्माचें विवेचन या एकाच सूत्रावर केलेलें आहे. मनुष्य जातीच्या हिताला इष्ट ठरेल तो धर्म. सिंहानें माणसाला खाणें हा सिंहाचा धर्म. मग मनुष्यानें स्वतःला सिंहाला खाऊन यावें असा धर्म कां नाहीं ?

धर्म–अधर्म, नीति–अनीति या सर्व गोष्टी मानवाच्या दृष्टीनें ठरविलेल्या असतात.गाय पाळणें हा धर्म तर मग साप पाळणें हा देखील धर्म कां होऊं नये? गाय दूध देऊन मानवाचें पोषण करते म्हणून आपण गाय पाळतों. अशाप्रकारें

## सर्व नीतिशास्त्राचें केंद्र मानव

हा आहे. या सर्व गोष्टींची कसोटी, निकर्ष–पाषाण मानव जातीचें हित हाच आहे. या कसोटीवर कोठलेंहि तत्त्व घासून व पारखून घेतल्याखेरीज मानवाचें अंतिम कल्याण होणार नाहीं.

## विश्वारंभीं...

जग निर्माण झालें त्यावेळीं सुरुवातीस मानव प्राणी नव्हता. या जगाचे पहिले नागरिक म्हणजे सरपटणारे प्राणी सर्प होत. दोन दोन मैल लांबीचे देखील ते प्राणी असत. त्यांच्यांतहि हिटलर, मुसोलिनी असत.

## उत्क्रांतिचा पुढील टप्पा

म्हणजे झाडावर रहाणारी व झाडपाला ओरबडून खाणारी गोरीला सारखीं माकडें जन्माला आलीं. प्राणीशास्त्र दृष्ट्या बघितलें तर मानव जगायला अगदीं असमर्थ आहे.

शस्त्रांचे सहाय्य मानवानें घेतलें नसतें तर मानव हा पृथ्वीतलावर [illegible]लाच नसता, इतका मानव दुर्बल आहे.

आपण अगदीं गरीब मनुष्याला गाय म्हणून म्हणतो; पण गाय आणि मनुष्य यांची जर झोंबी लावली, तर गायीजवळ शिंगें असल्यानें ती त्याला शिंगानें भोंसकून ठार करूं शकेल. हो, मात्र त्या मनुष्याजवळ काठी अगर चरखासुद्धां असतां कामा नये. न जाणों जिवावर बेतलें म्हणजे तो चरखाच फेंकून मारावयाचा!

## शस्त्रसाधनेला आरंभ

शरीरदृष्ट्या मानवाजवळ जें नव्हतें तें त्यानें उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. मानवानें निर्माण केलेली तलवार ही त्याच्या नखांसारखी आहे. आणि तलवार हातांत घेतल्यावर तो सिंहालासुद्धां भारी झाला. माकडसुद्धां धोंडा मारायला शिकून सिंह-हत्ती यांपासून अरण्यांत आपला बचाव करतें. म्हणजे धोंडा हें माकडाचें शस्त्र झालें.

## माकड जर अहिंसक झालें असतें तर

साप–हत्ती–व्याघ्र–सिंहांनीं त्याचा केव्हांच फडशा पाडला असता. मग कोठला मानव-प्राणी निर्माण होता ? कारण मानव हा माकडापासूनच निर्माण झाला असें उत्क्रांतिशास्त्र म्हणतें. परंतु, त्या माकडाला कोणी आत्यंतिक अहिंसक भेटला नाहीं, हें मानवजातीचें भाग्यच होय. धोंड्यामुळें माकड संरक्षण करूं लागलें; परंतु, मानव हा प्रगतीचा नैसर्गिक भोक्ता असल्यानें त्यानें निरनिराळे शोध लावले. त्याला कच्चें मांस पचेना म्हणून त्यानें उखळ, मुसळ, अग्नि वगैरे निर्माण केलीं; हीं एकप्रकारें शस्त्रेंच होत. आपण जें अन्न खातों त्यामध्यें वनस्पतींची हत्या होतेच ना. म्हणून ब्राह्मणांनीं वैश्वदेव करावा. असा दंडक घातला गेला. कारण उखळ, मुसळ यांमध्यें कांडतांना अनेक जीवजंतूंची हत्या झाली असेल त्या पापक्षालनार्थ वैश्वदेव केला. परंतु वैश्वदेव करतांना अग्नि पेटविला त्यावेळींहि अनेक जीवजंतू मेलेच असतील ना ! तेव्हां निर्भेळ व आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे हेंच सिद्ध झालें.

अहो, ढेंकूण चावतात त्यांना मारल्याखेरीज गत्यंतर नाहीं. त्यांचेपुढें मनुस्मृति वाचून चालणार नाहीं. आत्यंतिक अहिंसा हें खूळ जगांत टिकणें अशक्य आहे असेंच सिद्ध होतें. हा प्रयोग गांधी नवीनच करतात असें नव्हे. अनेक महान् महान् थोर पुरुषांनीं हे प्रयोग केले; परंतु, ते त्यांनीं राष्ट्रावर केले नाहींत.

## जैनांचे दंडक

‘ अहिंसा परमो धर्मः ’ असा आदेश देणाऱ्या जैनांचींहि राष्ट्रें होतीं. त्यांच्यांत शूरपुरुष होते. त्यांनींहि अहिंसेला बंधन घातलें होतें. आणि व्यवहारांत राष्ट्ररक्षण व आत्मनाश टाळण्यासाठीं हिंसेला परवानगी दिली होती. त्या सर्वांना हेंच

आढळून आलें कीं, आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे. गांधींचा हा प्रयत्न पहिलाच नाहीं. त्यांच्या पूर्वीच्या लोकांनीं तो अशक्य म्हणून ठरविला होता. अशा स्थितींत गांधींचा हा प्रयत्न वेडगळपणाचाच आहे. चुलीवर भात शिजतो हें माहित असतांना, बुभुक्षित मनुष्य आला असतांना त्याला सांगावयाचें कीं, थांब चंद्रज्योतीमध्यें तांदूळ शिजतात कीं नाहीत याचा मी प्रयोग करीत आहें. त्यांनीं हे असले प्रयोग पाहिजेत तर स्वतःवर करावे.

## बुद्धि सुचते

परंतु, इतकें कशाला स्वतःवर प्रसंग आला म्हणजे बुद्धि सुचते. नुकताच वर्ध्यांच्या आश्रमांत कोल्हा पिसाळला तेव्हां त्याला गोळी घालण्यांत आली. याच वेळीं हिटलर पिसाळला म्हणून इंग्लंडला जें पत्र धाडण्यांत आलें त्यांत मात्र अहिंसापालनाचा उपदेश केला गेला.

साबरमतीच्या पांजरपोळांत एक कुत्रा पिसाळला त्या कुत्र्याला मारा असाच सल्ला गांधींना दिला म्हणजे येथें

## तारतम्य आलें.

दहा हिंसा टाळण्याकरितां एक हिंसा करणें योग्य ठरलें.

## प्रयोग-क्षेत्राची मर्यादा

आपण स्वतःवर हवे तेवढे प्रयोग करा; परंतु, प्रयोगाकरितां आपण जेव्हां एक राष्ट्र घेतां तेव्हां त्या गोष्टीचा समाचार घेतलाच पाहिजे. आपल्या प्रयोगाकरितां राष्ट्र निर्माण झालें नाहीं. तुम्हीं प्रयोगाकरितां राष्ट्र घेतां आणि तें हिंदुराष्ट्र घेतां, इंग्लंड किंवा इतर कोठलें राष्ट्र कां नाहीं घेत प्रयोगाकरितां.

> आपणाला प्रयोग करावयाचे असतील तर ते अवश्य करा. पण, त्याकरितां राष्ट्राचा खेळखंडोबा करूं नका. असल्या या साहसाचें कौतुक करण्यापेक्षां तीव्र निंदा करणेंच श्रेयस्कर ठरतें.

रोजच्या खाण्यांत आपण कितीतरी हिंसा करतो. पूर्वी श्राद्धाला मांस करावें अशी रुढि होती. पुढें ब्राह्मणांतही हिंसक आणि अहिंसक असे पक्ष पडले. आणि एक गोष्ट आहे कीं, एका अहिंसक ब्राह्मणानें श्राद्धाच्या दिवशीं हिंसक पक्षाच्या एका ब्राह्मणाला जेवायला बोलाविलें. पानावर मांस नाहीं असें पाहून

तो म्हणाला श्राद्धाला मांस कोठें आहे ? तेव्हां अहिंसक पक्षाच्या ब्राह्मणानें उत्तर दिलें 'आम्ही अहिंसक आहों! खीर केली आहे.' तो ब्राह्मण म्हणाला, 'बरें आहे तर खीर आणा. खीर वाढलीं गेली आणि त्यानें त्या खिरीवर पाणी त्याच्या शिंपडतांच तपःसामर्थ्यानें खिरीच्या प्रत्येक कणाकणांतून आळ्या बाहेर निघाल्या. व त्या ओरडून म्हणूं लागल्या 'आमची हिंसा होत आहे. आमची हिंसा होत आहे.'

## वनस्पतीच्या प्रत्येक कणांत चेतना व बीज आहे

त्या बीजाचें झाड होऊन त्याला फुलें यावींत हा निसर्गाचा हेतु आहे. आपण खातों तेव्हांदेखील काय थोडी हिंसा होत असेल. अन्न खात नसाल तर अरबस्थानांतील खजूर आणि काश्मिरची द्राक्षें खात असालच ना, पण तरी देखील हिंसा झालीचना.

आत्यंतिक अहिंसा पाळावयाची म्हणजे मला श्वासोच्छ्वास करतां येणार नाहीं. खातां येणार नाहीं, पितां येणार नाहीं, फार काय उभें राहतां येणार नाहीं, बसतां येणार नाहीं. सचेतन देहाची कोठलीहि हालचाल झाली तरी त्यांत हिंसा झाल्याखेरीज रहाणार नाहीं. इतकी ही आत्यंतिक अहिंसेची कल्पना हास्यास्पद आहे; इतकेंच काय पण पापण्या उघड्या ठेवुन जगणें देखील अशक्य होईल.

## एक दृष्टांत

देवळांत देवाकडे पाय करून एक संत निजले असतांना देवाचा पुजारी तेथें आला तो म्हणाला, 'अहो हें काय हा देवाचा धडधडीत अपमान आहे ' तेव्हां संतानें पूर्व दिशेकडे पाय केले. तेव्हां दुसरा म्हणाला अहो सूर्याचा अपमान आहे, त्यानें तिसऱ्या दिशेकडे पाय केले तेव्हां असाच तिसऱ्या एका देवाचा अपमान झाला. अखेरीस तो संत डोके खालीं करून पाय वर करून गरगरां चकरा मारूं लागला. तेव्हां सर्वच जण ओरडले ' आतां हा सर्वच देवांचा अपमान होत आहे ' अखेरीस तो संत म्हणाला, आतां माझे पाय कापून ठेवा. त्याखेरीज दुसरा उपाय मला दिसत नाहीं.

आपणाला काटेकोर अहिंसेनें चालण्याचा प्रयोग करावयाचा असेल, तर या पुणें म्युनिसिपालिटींत ठराव करा कीं, पुण्यांत वाघ, साप, विंचू कांहींहि मारा-

वयाचे नाहीं. हा प्रयोग केलात तर १ वर्षाच्या आंत पुण्यांत मनुष्य दिसणार नाहीं. सर्वत्र वाघ, सिंह, साप, विंचूच दिसतील आणि सांगतों, जर कां तुमच्या या ठरावाची माहिती एकाद्या वाघाला लागली तर तो येथें येऊन दिवसाला एक पेठ या हिशेबानें तुमच्या काय पेठा असतील तेवढ्या दिवसांत सारें पुणें साफ करून टाकील.

## सृष्टीचें स्वरूप

ईश्वरानें जगाची रचना करतांना निव्वळ हिंसेवर केली नाहीं कीं आत्यंतिक अहिंसेवर केली नाहीं. या दोघांची गुंफण घालून त्यानें सृष्टीची रचना केली आहे.

आत्यंतिक अहिंसा ही जगाची स्थिति नव्हे व तत्त्व तर नव्हेंच नव्हें.

आई मुलांला पाजते म्हणजे त्याला आपलें जीवन देतें. मूल आजारी असलें तर आपल्या जिवाची पर्वा न करतां त्या मुलाची जपणूक करते तेव्हां कांहीं तिला हा मुलगा पुढें मोठा होईल आणि आपलें पांग फेडील अशी कल्पना नसते. हें प्रेमतत्त्वहि जगांत असतें.

मी स्वतः सृष्टि कशी आहे याची पुढीलप्रमाणें कल्पना करतों. मीं जर चित्रकार असतो, तर मीं सृष्टीचें चित्र असें रंगविलें असतें.

हरीण बालकाचा वध करून रक्तानें माखलेल्या जिव्हेनें वाघीण आपल्या पिलाकडे येत आहे. तीं पिलें तिला बिलगून दुग्धप्राशन करीत आहेत, आणि वाघीण रक्तानें भरलेलें आपलें तोंड जिभेनें साफ करीत आहे. सृष्टि ही अशी आहे. एकीकडे ती वाघीण आपलें जीवन म्हणजे दूध पिलांना देतां यावें म्हणून दुसरीकडे हरीण—बालकाची हत्या करून त्याचें रक्त पीत आहे. एकावर प्रेम करतां यावें म्हणून दुसऱ्याची हिंसा करीत आहे. हिंसा व अहिंसा यांचा समन्वय साधणारें हें चित्र आहे.

## भ्रामक समजूत

कॉंग्रेस म्हणते गांधींना त्यांचा मार्ग आचरण्यासाठीं आम्ही मुक्त केलें आहे. पण, याचा अर्थ असा होतो कीं, आपण कांहीं तरी कमी आहोंत आणि ते कोणी तरी मोठे आहेत. जो अव्यवहार्य, जगापेक्षां कांहीं विपरीत सांगेल तो संत ही आपल्यांतील कल्पना, टाकून द्या.

हें असें सांगणारे लोक महात्मे तर नाहींतच नाहींत; पण ते दुरात्मे तरी असले पाहिजेत नाहींतर भ्रांतात्मे तरी असले पाहिजेत.

आज २० वर्षांत फांशीं गेलेल्या देशभक्तांबद्दल सहानुभूतीचा शब्द उच्चारण्याची यांना छाती झाली नाहीं. शिवाजी, प्रताप यांना त्यांनीं वाट चुकलेले देशभक्त म्हणून संबोधिलें.

## उंदीर कुरतडतील

या आत्यंतिक अहिंसेनें आम्हीं वागलों असतों तर घरांतील उंदीरांनीं आम्हांला कुरतडून नाहींसें केलें असतें. आत्यंतिक अहिंसा हें पाप ज्या कसोटीवर ठरतें त्याच कसोटीवर आत्यंतिक हिंसा ही पाप ठरणार आहे. तव्हां सूज्ञांनीं आत्यंतिक अहिंसेच्या व आत्यंतिक हिंसेच्या उपदेशाची वृत्ति आतां मारण्याची वेळ आली आहे. तुम्हीच हें इतके दिवस सहन करून गप्प बसलांत. यापुढें

## वाईटाला वाईट म्हणण्याची

धमक तुम्ही दाखविली पाहिजे.

ज्याप्रमाणें आत्यंतिक अहिंसा हें पाप आहे. त्याचप्रमाणें आत्यंतिक हिंसा हें देखील एक पाप आहे. आत्यंतिक अहिंसेनें मानवसमाजानें परस्पराला खाल्लें नाहीं तरी इतर वन्यपशू मानवजातीला खाऊन टाकतील, तर आत्यंतिक हिंसेनें मानव समाजच राहणें कठीण होईल.

## पुण्याला आल्यावर अक्कल सुचली

आतां राष्ट्राच्या रक्षणाकरितां अहिंसेचा त्याग करण्यास कांग्रेस सिद्ध झाली आहे. पूर्वी हिंदुस्थानला बाहेरचा कोणीच शत्रु नाहीं असें सांगत होते आणि आतां पुण्याला आल्याबरोबर हिंदुस्थानवर शत्रु तुटून पडायला लागलेले त्यांना दिसले. राजकारणांत आत्यंतिक अहिंसा हें वेड आहे हें त्यांना आतां पटूं लागलें आहे. आत्यंतिक अहिंसा हा धर्म नसून तो अधर्म आहे. माझ्या राष्ट्राच्या, समाजाच्या व मानव्याच्या नाशास जें कारणीभूत होतें तें कधींच धर्म्य होऊं शकत नाहीं.

## खरा धर्म

आत्यंतिक अहिंसेनें राष्ट्र जगूं शकत नाहीं हें एकदां मान्य केल्यावर, खऱ्या धर्माचें पालन करून अधर्म टाळतां येईल. माझ्या राष्ट्राच्या, हिंदुस्थानांतील हिंदूंच्या हितासाठीं करावी लागणारी हिंसा ही केव्हांहि अधर्म होऊं शकत नाहीं.

मनुष्यजातीला जो हितकारक तो धर्म व अहितकारक तो अधर्म. रामानें रावणाचीं दहा शिरें छाटलीं त्याला आपण रावण–वध म्हणतों ती हत्या नव्हे. हत्या ही गुन्ह्याच्या स्वरूपांतली आहे. कृष्णानें कंसाला सिंहासनावरून ओढून मारलें त्याला आपण कंसवध म्हणतो, ती कांहीं कंसहत्या नाहीं.

जेथें मरणें इष्ट असतें तेथें मारून मरावें हेंच योग्य.

## हें महात्मेपण नव्हे

आत्यंतिक अहिंसेची राष्ट्राला शिकवण देणें हें महात्मेपण नव्हे, हें मूर्तिमंत पाप आहे.

लो. टिळकांनीं गांधींना लिहिलेलें एक पत्र आतां प्रसिद्ध झालें आहे, या पत्रांत लो. टिळक म्हणतात कीं, व्यवहारामध्यें आत्यंतिक अहिंसा ही शक्य नाहीं; पण, मी म्हणतो याच्याहि पुढें गेलें पाहिजे. आत्यंतिक अहिंसा ही केव्हांहि इष्ट अशी अवस्था नाहीं, तें पाप आहे. आत्यंतिक अहिंसेचें खूळ पिकवून राष्ट्राला भ्रमांत ठेवणें हें महात्मेपण नव्हेच; त्यांना पाहिजे तर दुरात्मा किंवा भ्रांतात्मा म्हणा.

अहिंसक अशा बुद्धाला सुद्धां मृतमांस खाण्यास हरकत नाहीं अशी परवानगी आपल्या शिष्यवर्गाला देण्याची पाळी आली आणि याच मृतमांस खाण्याच्या कल्पनेचा अवशेष मुसलमानाच्या हातून कोंबडें खाण्याच्या प्रथेच्या रूपानें कायम आहे. आपल्याकडील संत तुकाराम यांनींसुद्धां अहिंसेचे फार गोडवे गायिले आहेत. पण त्यांनींसुद्धां 'सर्प विंचू नारायण परि वंदावें दुरून' असेंच सांगितलें आहे. तेसुद्धां विंचवांची दया करीत नाहींत. आपल्याकडचे विंचू काळे असतात; पण रशिया वगैरे पाश्चिमात्य राष्ट्रांतील विंचू कांहीं पांढरे, कांहीं तांबडे असतील. असा विंचू जर राष्ट्राच्या देव्हाऱ्यांत आला तर त्याच्याशीं तुकारामबुवा म्हणतात त्याच प्रमाणें

> विंचू देव्हाऱ्यासी आला देवपूजा नावडे त्याला ।
> तेथें पैजाराचें काम अधमासी व्हावें अधम ॥

या न्यायानें वागलें पाहिजे.

ता. २ ऑगस्ट १९४० पुणें.

---



मराठी ग्रंथ संग्रहालय

## खास उपयुक्त दोन वस्तू

उत्कृष्ट शिलाईच्या

सर्व तऱ्हेच्या घडीच्या

**★ टोप्या ★**

एकदां वापरून पहा.

देशी सेमि-स्टिफ

**★ कॉलर्स ★**

'प्रेसिडेंट'

घालून रुबाब वाढवा.

—: मिळण्याचें ठिकाण :—

**मे. एन्. व्ही. गोखले आणि कं.,**

प्रार्थनासमाजजवळ, मुंबई ४

---

सर्व प्रकारच्या जन्मपत्रिका, आयुष्यांतील प्रत्येक
विषयाचे फलादेश, धार्मिक संस्कार व इतर
हरएक कार्यास लागणारे मुहूर्त हीं
कामें ज्योतिषशास्त्रशुद्ध व
धर्मशास्त्रशुद्ध रितीनें

## ज्योतिषी-कृष्णाजी विठ्ठल सोमण

यांचेकडे करून मिळतील.

पत्ता :—वासुदेव बिल्डिंग नं. २, बरोज लेन, मुंबई नं. २

# राष्ट्ररक्षणासाठीं केली जाणारी हिंसा पुण्यकारक होय

ज्यांनीं मला वचन देऊन येथें आणलें तीं वचनें शतपटींनीं पुरीं झालीं आहेत असें मला वाटतें. सबंध हिंदुस्थानभर लक्ष लक्ष नागरिकांच्या सभा भरतात, कलकत्त्यासहि विराट सभा भरतात. पण आजचा समाज पाहून मला अतिशय आनंद झाला. आपण माझ्या कार्यांचा उत्साह वाढविला आहे. पैसे किती दिले हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. हिंदुमहासभेचा अध्यक्ष, हिंदु धर्मासाठीं नि भगव्या ध्वजासाठीं झुंजणारा एक सैनिक मी येथे आलो असतांना आपण माझें भाषण ऐकण्यास अगत्यपूर्वक आलांत यांतच मला लाखों रुपये मिळाल्यासारखे आहेत !

## काँग्रेसमध्यें तरी हिंदुत्व कां असूं नये ?

हिंदुस्थान हिंदूंचा राहिला पाहिजे व हें तत्त्व अढळ राहिलें पाहिजे असें मानणारेच लोक बव्हंशीं आजच्या सभेस उपस्थित राहिले आहेत. कारण तसें त्यांना तें पूर्णांशानें किंवा बव्हंशीं पटलें नसतें तर माझें तोंड पाहण्यास ते आलेच नसते. हिंदुत्वाचें नांव घेणें तीन वर्षांपूर्वीं पाप होतें. आज तें पुण्य आहे किंवा नाहीं हें जरी सांगतां आलें नाहीं तरी पाप तरी खास नाहीं. आज काँग्रेस ही राष्ट्रीय संस्था म्हणतात. पण त्यांत सुद्धां शेंकडा ७५ लोक असें म्हणणारे आहेत कीं हिंदुस्थानांत रहावयाचें तर हिंदु म्हणूनच राहूं नाहीं तर काँग्रेस सोडून जाऊं. मुन्शींचें उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें ताजें आहेच. तत्त्वाच्या दृष्टीनें गोष्टी अशक्य होऊं लागल्या म्हणून त्यांनीं सभासदत्वाचा त्याग केला. काँग्रेसमध्यें तरी हिंदुत्व कां असूं नये ? हिंदु कांहीं लोकसंख्येपेक्षां अधिक मागत नाहींत. पण आतां मात्र आम्हीं थोडेंहि सोडणार नाहीं. राष्ट्रीयत्व सोडणें म्हणजे नामर्दपणा आहे. हिंदुमहासभेचें दुसरें कांहीं म्हणणें नाहीं. काँग्रेस हिंदूंची आहे असें जिना म्हणतात, हें सत्य आहे. यांत लाजावयाची गोष्ट कोठें आहे ? काँग्रेसची

प्रतिष्ठा वाढविली हिंदूंनीं, सत्याग्रह केला हिंदूंनीं, स्वार्थत्याग केला हिंदूंनीं, तुरुंग भोगले हिंदूंनीं व आत्मयज्ञ केला हिंदूंनींच ! यावेळीं दुसरा कोणी आला नाहीं ! !

## हिंदुत्व असेल तरच सर्व ग्राह्य

आज नाहीं उद्यां आपण सर्व खांद्याला खांदा लावून लढूं असा आत्मविश्वास वाटतो. कॉंग्रेस ही संस्था आहे, ती जात नव्हे, धर्म नव्हे. पण हिंदुत्वाची गोष्ट निराळी आहे. हिंदुत्व म्हणजे आई, बाप, नद्या, जीवन, तत्त्व सर्व त्यांत सामावलेलें आहे. हिंदुत्व आणि कॉंग्रेस ही साहाय्यभूत झाली तर पुढेंहि कॉंग्रेस राहीलच. हिंदुत्वासहित आम्हांस कॉंग्रेस चालेल. हजारों कॉंग्रेसेस आम्हीं सोडूं, हजारों ब्रह्मदेव सोडूं, पण हिंदुत्व सोडणार नाहीं असा आमचा अढळ निश्चय आहे !

## हिंसा श्रेष्ठ कीं अहिंसा श्रेष्ठ ?

आजचा विषय करमणुकीचा किंवा तात्विक चर्चेचा म्हणून मी व्याख्यानासाठीं घेतलेला नाहीं. राष्ट्राच्या दृष्टीनें हा अत्यंत महत्वाचा असा विषय आहे. अहिंसेचा विचार जैनाचार्यांनीं व बुद्धांनीं सखोल रीतीनें केला व तो आचारांतहि आणला आहे. जपानपासून मेक्सिकोपर्यंत तीनचार हजार वर्षांपूर्वींपासून याचा अभ्यास चालला आहे. मी कांहीं नवीन सांगत नाहीं. विषय जुनाच आहे. सर्वांच्याच मतानें आत्यंतिक हिंसा ही निंद्य असल्यानें हा कांहीं गूढ प्रश्न नाहीं. पण हिंदुस्थानांत चांगल्या गोष्टींबरोबर वाईट गोष्टीही उत्पन्न होतात असा अनुभव आहे. अहिंसा सत्य कीं हिंसा सत्य हा प्रश्न आज आपणांस भेडसावूं लागला आहे. अर्जुनालाहि मागें हा प्रश्न पडला होता. पण ती भावाभावांची लढाई असल्यानें असा प्रश्न पडणें साहजिक तरी होतें. पण आजची स्थिती तशी नाहीं. ज्यांचा आपणांशीं कांहींच संबंध नाहीं अशा लोकांचा विचार करतांना 'हिंसा श्रेष्ठ कीं अहिंसा श्रेष्ठ' हा प्रश्न उत्पन्न करणें मूर्खपणाचें आहे. अनंतकाल याची चर्चा झालीच आहे. आज हिटलर, जपान हिंदुस्थानाजवळ येऊं पहात आहेत, इंग्लंड तर आलेंच आहे, आपल्या देशांतहि डाका, अहमदाबाद व मुंबईचे प्रकार होतच आहेत. आणि अशी स्थिती असतांना 'हिंसा श्रेष्ठ कीं अहिंसा श्रेष्ठ' हा प्रश्न आतां कां ? पूर्वी प्रभू रामचंद्राला असाच प्रश्न पडला होता पण वसिष्ठांनीं तत्त्वबुभुक्षिततेबद्दल त्याचा धिक्कार केला. 'तुझी पट्टराणी शत्रूनें पळवून नेली

असतां तुला हा भ्याडपणाचा विचार सुचतो कसा ?' असा वसिष्ठ मुनींनी प्रश्न केला. रामाला त्यामुळें चीड उत्पन्न झाली, त्याची वीरवृत्ती जागृत झाली व रावणाला मारून आल्यानंतरच योगवासिष्ठ सांगण्याविषयीं रामानें वसिष्ठाला सांगितले. ही योगवासिष्ठाची भूमिका आहे. आज हीच हिंदुस्थानची स्थिति झाली आहे. तरुण देखील हिंसा श्रेष्ठ कीं अहिंसा श्रेष्ठ याची चर्चा करूं लागले आहेत. रामाप्रमाणेंच आपल्यांतहि वीरवृत्ति जागृत झाली पाहिजे. अशा परिस्थितींत तात्त्विक नव्हे पण व्यावहारिक ठाम निश्चय केला पाहिजे.

## आत्यंतिक हिंसा अशक्य व पाप आहे

या बाबतींत माझा पहिला सिद्धान्त असा आहे कीं आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे. दुसरा सिद्धान्त असा आहे कीं आत्यंतिक अहिंसा पाप आहे. हा झाला माझा पूर्वपक्ष. आपल्या देशांतले तीनहि धर्मपंथ म्हणतात कीं सापेक्ष अहिंसा पुण्य आहे. निरपेक्ष अहिंसा हें पाप आहे. मनुष्यजातीच्या एकंदर हितास जें कारणीभूत होतें तें चांगलें व पुण्य आणि जें अहितास कारणभूत होतें तें पाप. या निकषावर आपण अहिंसा पुण्य कीं पाप हे पाहिलें पाहिजे व या दृष्टीनें आत्यंतिक अहिंसा हे पाप आहे असें आपणास सिद्ध करतां येईल.

## कृषि ही देखील हिंसाच आहे !

मनुष्य वन्य अवस्थेंतून पुढे कृषि--अवस्थेंत उन्नत झाला. दयेला वाव सांपडूं लागला. अहिंसेचे नियम होऊं लागले. पूर्वीच्या रानटी अवस्थेंत हिंसा योग्य झाली असती. पण या वेळीं हिंसा कां करावी असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. पण या अवस्थेंत देखील आत्यंतिक अहिंसा आपण पाळली असती तर आपला नाश झाला असता. कारण तसें पाहिलें तर कृषि ही देखील हिंसात्मक आहे. धान्य काढीपर्यंत ( नांगरणें वगैरे क्रियांमध्यें ) लाखों जीवांचा संहार आपण करतो व तेंच अन्न आपण खातों व म्हणूनच पूर्वींच्या ऋषींनी 'हिंसा प्रायां पराधीनां कृषिं यत्नेन वर्जयेत्' असेंहि सांगितले होते. मनुष्याच्या हिताला आवश्यक अशी हिंसा आपण केली म्हणूनच आपण जगूं शकलों. आत्महिंसा केली नाहीं.

## आत्महत्या करणें म्हणजे हिंसाच

आता आपण पुढच्या अवस्थेचा विचार करूं. मनुष्य असें म्हणेल कीं मी मठांत बसेन, कोणालाहि त्रास देणार नाहीं, माझा जीव गेला तरी मी कोणाला प्रतिकार करणार नाहीं. मग तरी अहिंसा तत्त्व अमलांत आणतां येईल किंवा नाहीं ? पण याला उत्तर असें कीं, जीव गेला हरकत नाहीं अशी प्रतिज्ञा करणें म्हणजेहि आत्यंतिक अहिंसा गेलीच. कारण तो आत्मघात आहे. म्हणून आत्यंतिक अहिंसा अशक्यच आहे. अहिंसेचा सूक्ष्म विचार करणारे जैन साधू आपल्याच हिंदुस्थानांत पूर्वी होऊन गेले. पण त्यांनीहि सापेक्ष हिंसेस परवानगी दिलीच आहे. आत्यंतिक हिंसा वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें देखील अशक्य आहे. शस्त्रक्रिया करणें किंवा औषध घेणें म्हणजेसुद्धां शरीरांतील कांहीं जंतूंचा नाश करण्यासारखेंच आहे. न्यायाच्या दृष्टीनें आपण क्रिश्चनांना काय उत्तर देऊं शकूं ? फक्त आम्ही मनुष्य आहो एवढेंच आपणास सांगणें शक्य आहे.

## राष्ट्ररक्षणासाठीं केलेली हिंसा पुण्यकारक

व्यक्तीव्यक्तींच्या हिंसा–अहिंसेचें हेंच तत्त्व आपणास राष्ट्राच्या हिंसा–अहिंसेबाबत लागू करतां येईल. दुसरें हें पहिलीचें वृद्धीकृत स्वरूप आहे. सज्जनाशीं आपण सज्जनपणानें वागणें हें पुण्यकारक आहे. पण आपल्या देशावर शत्रु चाल करून आला तर त्याचा सशस्त्र प्रतिकार करणें हें पाप नाहीं. आपणास स्वातंत्र्य मिळालें व तदनंतर आपण जर दुसऱ्याचा द्वेष केला नाहीं तर हिंसेचा प्रश्न येतो कोठें असें कांहीं लोक म्हणतील. असें म्हणणें म्हणजे शुद्ध घाबरटपणा होय. तुम्ही द्वेष केला नाहीं तर दुसरा करणार नाहीं हें कशावरून ? द्वेष केल्यानेंच तो उत्पन्न होतो असें समजणें चुकीचें आहे. स्वतः जगणें व राष्ट्र जगविणें हें आपलें कर्तव्य आहे. त्याकरितां हिंसा करावी लागली तरी ती पुण्यकारक होय. आजच्या स्थितींत अक्षरशः आत्यंतिक अहिंसा पाप आहे. आततायी मनुष्य आक्रमण करून आला तरी त्याला मारावयाचें नाहीं असें म्हटलें तर नाश होईल. आत्यंतिक अहिंसा व्यवहारामध्यें पाप आहे. याचा राष्ट्रीय दृष्ट्या विचार करावयाचा झाल्यास चोर–दरोडेखोर यांचा सुकाळ जास्त होईल. सत्प्रवृत्तांचा उच्छेद होईल. धार्मिक उपदेशानें चोर जात नाहींत, उलट सावाचा नाश होतो. जगांतील चांगलीं राष्ट्रें वाईटांकडून प्रथम मारलीं जातील व शेवटीं सर्व समाज उच्छिन्न

होतील. आज सर्व समाज एकत्रित राहिला आहे याचें कारण म्हणजे दंडाची भीति. आत्यंतिक अहिंसेनें हिंसा प्रबलतर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## तत्वांचा उपलक्षणात्मक अर्थ

श्री. मुनशींनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकाचा विचार करतां 'सत्यास्तेय ब्रह्मचर्य अपरिग्रह' हीं तत्त्वें अक्षरशः पाळणें पुण्यकारक आहे ही गोष्ट खरी. पण 'अपरिग्रह' कसा शक्य आहे, असा मी आमच्या मुलाखतींत त्यांना प्रश्न केला. कारण अपरिग्रह पाळणें झाल्यास इंग्रजांपाशी मागावयाचें तरी काय? सारांश वरील गोष्टी उपलक्षणेनें सांगितल्या आहेत. हा अर्थवाद आहे. आपल्याकडे सुद्धां गंगेच्या एका स्नानानें सात जन्मांचें पातक नष्ट होतें असें म्हणत नाहींत काय? पण ते सत्यार्थानें घेऊन कसें चालेल? आत्यंतिक अहिंसा ही योग्याना देखील अशक्य होईल. कारण त्यांना श्वासोच्छ्वासहि करतां येणार नाहीं.

## अहिंसा दुर्बलांना प्रिय

मनुष्यजातीला, राष्ट्राला उपकारक तितकी अहिंसा पुण्यप्रद होय. नाहीं तर आत्यंतिक अहिंसेनें देव मरतील, दैत्य तगतील व शेवटीं तेहि मरतील. आत्यंतिक अहिंसा दुर्बलांना प्रिय वाटते. ती दुर्बलता आज सुचली आहे म्हणून 'हिंसा कीं अहिंसा' हे प्रश्न उद्भवले आहेत. आत्यंतिक अहिंसेचा पुरस्कार करणारे बुद्धिभ्रष्ट किंवा दुष्ट असले पाहिजेत. पण आज आपल्या देशांत पहिलाच प्रकार दिसतो. शस्त्रांनी क्रांतीचें तत्त्व आम्ही शिकवितों तें कमी साधु म्हणून नव्हे तर त्यांच्यापेक्षां शहाणे म्हणून. आत्यंतिक अहिंसा पाप आहे हेंच आमचें तत्त्व आहे.

## शस्त्रधारी देव आमचे गुरु!

अहिंसेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या जैनांनीं देखील पूर्वी राज्यें केलीं आहेत. सापेक्ष अहिंसा हें पुण्य आहे असेंच जैनाचार्यांचेंहि मत आहे. आपण आततायी मनुष्याला मारलें तर त्याचा दोष आपणांकडे नसून तो आपल्या पापानें मरतो अशी शिकवण आहे. बुद्धानेंहि हेंच सांगितलें आहे. तुम्ही आपण होऊन कोणावर चालून जाऊं नका पण त्रास देणाऱ्याच्या जीवाविरुद्ध जा असाच त्यांच्या सांगण्याचा आशय आहे. हिंदूंच्यासंबंधीं तर बोलावयासच

नको. आमचा गुरु श्रीकृष्ण आहे. कोदंडधारी राम आहे. आम्हांला हिंसा-अहिंसेच्या शंकाच राहात नाहींत. आततायी माणसांचा नाश कर असेंच भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. ' यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः। धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ' असें म्हणणारा अर्जुन श्रीकृष्णाच्या उपदेशानें ' करिष्ये वचनं तव ' म्हणून एकदम युद्धास सन्नद्ध झाला. दशमुखी रावणाला मारणारा राम, वाघनखें खुपसून अफझुलखानाला ठार करणारा शिवाजी हेच आमचे गुरु आहेत. सर्व जगच जर पापावर जगतें तर आम्हीहि पापच करणार !

आततायाला विचार न करतां ठार मार हें वचन परंपरेनें वेदकालापासून चालू आहे. तो आपला धर्म आहे, त्यावर श्रद्धा ठेवा. ज्या देवांची पूजा करतां त्यांचीं उदाहरणें डोळ्यापुढें ठेवा. आपले देव सशस्त्र, आपले पूर्वज सशस्त्र मग आपण असे नादान कां ?

# पाकिस्तानरूपी रोगावर औषध योजना

हिंदुस्थानांत पाकिस्तानची चर्चा करण्याचा प्रसंग यावा ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे. व माझ्यासारख्या उच्छृंखल माणसास शांतपणा ठेवून ती करणें फार कठीण आहे. तथापि फार संयम राखून मी ती करणार आहे. पाकिस्तान हें कांहीं तरी दुर्लक्ष करण्यासारखे बुजगावणें किंवा धूम्रपटल खासच नाहीं. त्याचा समग्र अभ्यास करून संपूर्ण समाचार घेण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. कारण मुसलमानांच्या सर्व हिंदुत्वनाशक आशाआकांक्षांचें सार किंवा अर्कच पाकिस्तान या छोट्या शब्दांत सांठला आहे. हिंदुमात्राला नष्ट करणारें नागाचें विषच या पाकिस्तानच्या छोट्याशा नलिकेंत भरलेलें आहे असे समजा. मुसलमान कडवे व धर्मनिष्ठ असल्यामुळें ते प्रथम हिंदुस्थानांत आले तेव्हांपासूनच पाकिस्तानची विषवल्ली अंकुरित झाली आहे. मुसलमानी धर्म सोडून परधर्माचा जो स्वीकार करील त्याला बेलाशक देहान्त प्रायश्चितच द्यावें असे मुसलमानांच्या शरीअतांत सांगितलेलें आहे. आणि याप्रमाणें वागावयास मुसलमान आजच्या काळांतहि कसूर करीत नाहींत. मी म्हणतो ती त्यांची शूराची निष्ठा आहे. मग ती बरोबर वा चूक कशीहि असो. कांहीं वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानांत एका मुसलमानाला हिंदूची दीक्षा देण्यांत आल्यामुळें दुसऱ्या एका मुसलमानानें त्याचा खून पाडला. तेव्हां चाललेल्या खटल्यांत आज इंग्रज राज्यांतहि मुसलमान बॅरिस्टरांनीं मुसलमानी कायद्याप्रमाणें आरोपीनें केलें तेंच बरोबर केलें असें प्रतिपादन केलें होतें ! मुसलमान काफीर झाला तर दुरात्मा म्हणून त्याचा निःपात करावा व उलट काफीराचा जर मुसलमान झाला तर त्याचा पूतात्मा म्हणून गौरव करावा अशीहि त्यांची धर्माज्ञा असल्यामुळें पाकिस्तानचें मूळ किंवा खूळ आजकालचें नसून पुरातनचें आहे हें लक्षांत येईल. नुकतेच बंगाल्यांत जे भीषण दंगे व हत्याकांड मुसलमानांनीं केलें त्यावेळीं हिंदूंना त्यांनीं सक्तीनें कसें बाटविलें, स्त्रियांचे केस कापून त्यांना अर्धनग्न करून त्यांना विजारी चढवून लगेच कोणत्या ना कोणत्या मुसलमानाशीं निका लावून देऊन त्यांची कशी विटंबना केली तो प्रकार ताजाच आहे. शिवाय पाकिस्तानांत मुसलमानांप्रमाणें इंग्रजांचाहि म्हणजे राज्यकर्त्यांचाहि संबंध आहे हें लक्षांत ठेवा.

## कुराणांत पाकिस्तान

पाकिस्तान मुसलमानांनीं आजकाल निर्माण केलेलें नाहीं. तें जिनांनीं निर्माण केलेलें नसून त्यांच्या कुराणानेंच निर्माण केलें आहे. त्यांच्या कुराणांत तशी धर्माज्ञाच केली आहे. दारुल इस्लाम व दारुल हर असेच दोन निःसंदिग्ध भाग मानून दारुलहरचा निःपात करावा अशी त्यांत स्पष्ट आज्ञा आहे. दारुल इस्लाम म्हणजे इस्लामी जगत व दारुल हर म्हणजे काफीरांचें जगत. इस्लामेतर जो जो कोणी असेल तो तो काफीर दारुलहरचा समजून त्याचा निःपात करावा अशी धर्माज्ञा असल्यामुळें आणि मुसलमान हे कडवे असल्यामुळें ते त्या आज्ञेची अम्मलबजावणी केल्याशिवाय सोडीत नाहींत. कुणी शहाणे म्हणतात कीं, कॉंग्रेसनें केलेल्या छळामुळें प्रथम मुसलमानांनीं ही पाकिस्तानची कल्पना काढली. पण तें खोटें आहे. कॉंग्रेसनें उलट मुसलमानांचे वाटेल तसे लाडच केले. साप असतांहि त्याला जवळ जाऊन दूध पाजण्याचा अविवेकीपणा तिनें केला आहे.

## कृतघ्न होऊं नका

सारांश पाकिस्तानचीं बीजें फार जुनीं आहेत. पाकिस्तान हा शब्द अली-कडला नवा असला तरी मागणी किंवा आकांक्षा किंवा महत्वाकांक्षा पुरातन आहे व ती साध्य करण्यासाठीं पद्धतशीर प्रयत्न मुसलमानांनीं केलेले आहेत. १९३० सालीं महमद इकबल यांनीं आपल्या पुस्तकांत या योजनेचा विचार केलेला आहे. मुसलमान दंगे करतात ते तात्कालिक स्फूर्तीनें कांहीं तरी निमित्तानें करतात असें नसून त्यामागें शिस्त आहे. खरे दंगे गुंड करीत नसून त्यांचे पुढारी करतात ! मुसलमान मशिदींत जमावानें जमतात पण बाहेर पडतांच नेमके देवळेंच फोडावयास कसे जातात ? अर्थात अशा वेळीं त्यांना हिंदूंनींहि पद्धतशीरपणेंच प्रतिकार केला पाहिजे. अशा प्रतिकार करणाऱ्या लोकांना ' गुंड ' ही पदवी हिंदू वर्तमानपत्रकर्त्यांनीं लावावी ही शरमेची गोष्ट आहे. मुसलमानी आक्रमकांचा प्रतिकार करण्यासाठीं हिंदू ' गुंड ' जिवावर उदार होऊन पुढें सरला होता म्हणूनच वर्तमानपत्राच्या ह्या लेखकाला सुखानें आपल्या कचेरींत बसून ' गुंड ' ही शिवी त्याला देतां आली ! हे ' गुंड ' लढतात म्हणूनच इतर हिंदु जगतात ! म्हणून दंग्याच्यावेळीं तुमचें संरक्षण करणाऱ्यांना ' गुंड '

ही शिवी देण्याचा कृतघ्नपणा तरी करूं नका! डाक्यांत मुसलमानांनी कहर केला, नंतर अहमदाबादेंत केला तेव्हां हिंदूंचे डोळे उघडले. एखादा पाऊस झाल्याबरोबर जसें गवत वाढतें त्याप्रमाणें हिंदुसंघटनाची वृत्ति एकदम तेथें अंकुरित झाली. मी मुद्दाम गवताची उपमा देतों. कारण महाराष्ट्राप्रमाणें ती तेथें एखाद्या वटवृक्षासारखी चिरंजीव व प्रचंड अद्याप झाल्यासारखी नाहीं; कारण तो गांधीजींच्या गुजराथी लोकांचा प्रांत आहे. पण गुजराथी झाले तरी हिंदूच, आमचेच भाऊबंद आहेत. त्यांच्या संरक्षणासाठींहि हिंदूसभेनें कष्ट केले. त्यानंतर मुंबईस मुसलमानांनी दंगे केले. पण अभिमानाची गोष्ट आहे कीं एका हातांत पिनल कोड घेऊन व दुसऱ्या हातांत प्रतिकारार्थ शस्त्र धरून हिंदूंनी पिनलकोडाच्या मर्यादा न उल्लंघिताहि असा जोरकस प्रतिकार केला कीं नेहमीच्या उलट मुसलमानांनाच दंगा बंद होऊं द्या अशी सभा भरवून ठराव करण्याची पाळी आली! पठाण नुसता गुरकावून गेला तरी आसपास लोकांची पांगापांग व्हावयाची असा जुना दंडक. त्याच पठाणानी मुंबईत दंगा थांबूं दे, आम्हांला जगूं दे म्हणून सभा केल्या!

## संधिसाधू धोरण

आपल्या स्वार्थासाठीं मुसलमान वाटेल ती परस्परविरोधी मागणी प्रसंग पाहून करीत असतात. डिमॉक्रसीमध्यें बहुमताला किंवा बहुसंख्येला केव्हांहि मान असलाच पाहिजे. हिंदुस्थानांत मुसलमान बहुसंख्य कधीं तरी होणें शक्य आहे काय? पण मूठभर मुसलमानांना हिंदूंच्या बहुमताखालीं अल्पसंख्याकांचे योग्य ते हक्क घेऊन राहणें नको आहे. त्यांना मुजोरी करून स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहावयाचें आहे आणि म्हणून जिनांनीं डिमॉक्रसी हिंदुस्थानाला उपयोगीच नाहीं येथपासून सुरुवात केली आहे!

## पाकिस्तान शब्दच चीड आणणारा

पाकिस्तान हा शब्दच मुळी चीड आणण्यासारखा आहे. पाक म्हणजे शुद्ध आणि नापाक म्हणजे अशुद्ध! हे कृतघ्न मुसलमान आपलें पाकिस्तान स्थापून आम्हां बहुसंख्य हिंदूंस अशुद्ध ठरवूं पाहातात काय? जिनांनीं काढलेलें जें पाकिस्तान त्याची कल्पना अशी आहे कीं, वायव्य सरसीमाप्रांत, बलुचिस्तान, सिंध, पूर्व बंगाल, पंजाब यांचें स्वतंत्र मुसलमानी राष्ट्र व्हावें, त्यांना हिंदूंच्या सत्तेचा

संपर्कहि नसावा. आज इंग्रज जबरदस्त असल्यामुळें आपला इंग्लंडशीं संबंध तोडून टाकावा असें जिनांना म्हणतां येत नाहीं. म्हणून ते त्यांचें अधिराज्य मानावयास तयार आहेत इतकेंच. कारण तोफेपुढें मुसलमानांचें धर्मशास्त्रहि लटपटतें! जिनांना वरिष्ठ सत्ता इंग्रजांची असली तरी चालेल पण त्यांना हिंदूंचा संपर्कहि नको. शिवाय पाकिस्तानाच्या योजनेंत नुसतेच उत्तरेंतील प्रांत नाहींत. त्यांना खालीं दक्षिणेंत असलेलें निजामचेंहि संस्थान पाकिस्तानादाखलच हवें आहे. मुसलमानांची हरामखोरी अशी आहे कीं त्यांना नुसता प्रदेशच पुरेसा नाहीं. त्यांना समुद्रकांठचीं बंदरेंही हवीं. यासाठीं आसामहि त्यांना पाहिजे.

## परस्वापहाराची दुष्ट वासना

पूर्व बंगाल्यांत मुसलमानांची बहुसंख्या आहे म्हणून तो प्रदेश मुसलमानांना एक वेळ तर्कदृष्ट्या देतां येईल. परंतु आसामांत मुसलमानांचा कांहींएक हक्क-संबंध नसतां केवळ मुसलमानांना पूर्व समुद्राचें द्वार खुलें हवें म्हणून त्यांनीं त्याची मागणी करणें ही शुद्ध हरामखोरी आहे. हिंदूंनीं अशी गोष्ट कालत्रयींहि होऊं देतां कामा नये. मुसलमानांचें तर्कशास्त्र सोय पडेल तसें बदलतें. काश्मी-रांत राजा हिंदु आहे, पण बहुसंख्य प्रजा मुसलमान आहे. म्हणून त्यांना तेथें मुसलमान राजा हवा आहे. राजा हिंदु असला तरी संस्थान मुसलमानांचेंच आहे असें ते प्रतिपादितात. पण तोच न्याय दक्षिणेंतील निजामाला मात्र लावण्यास ते तयार नाहींत. निजाम राज्यांत बहुतेक सर्व प्रजा हिंदूंची असून राजा मात्र मुसलमान आहे. काश्मिरचा न्याय हैद्राबादेस लावावयास मुसलमान तयार नाहींतच. उलट निजामालाहि समुद्रद्वार नाहीं म्हणून आंध्र प्रांत निजामाला द्यावा अशी त्यांनीं मागणी सुरू केली आहे! येवढ्यानेंहि भागलें नाहीं. त्यांना हिंदुस्थानच्या मध्यावर अजमीरचेंहि एक स्वतंत्र पाकिस्तान निर्माण करावयाचें आहे. अजमिरास चिस्तीची कबर आहे. याच चिस्तीनें पूर्वी तेथें गुपचूप फकिरा-सारखे राहून महंमद कासिमाला माहिती पुरवून त्याच्याकडून सिंधवर स्वारी करविण्याचें पुण्यकृत्य केलें! त्या चिस्तीच्या निमित्तानें तेथें मुसलमानांचें एक यात्राक्षेत्रच निर्माण झालें आहे. तें अजमीर पाकिस्तानांतच रूपांतरित करावें अशीहि मुसलमानांची एक मागणी आहे. या सर्वांत त्यांचा हेतु हिंदुस्थानच्या

उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत मुसलमानी सेना वाटेल तशी खेळविण्या-सारखी ' कॉरीडर ' निर्माण करून ठेवावी असा आहे.

## उपाय काय ?

पण मुसलमानांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ही त्यांची योजना आम्ही कधींहि सफल होऊं देणार नाहीं. आम्ही हिंदु बहुसंख्य आहोंत. येथें आमचेच बहुमत राहणार. हिंदुस्थानांत दोन मेजॉरिटी पार्टीज आहेत, असें कोणी शहाणे म्हणतात. पण तें अशक्य आहे. हिंदुस्थानांत एक हिंदूंचींच तेवढी मेजॉरिटी पार्टी असूं शकेल. आज सातशें वर्षेपर्यंत मुसलमानांशी झगडून आम्ही हिंदूच बहुसंख्य राहिलों आहों. आणि अगदीं कमींत कमी आणखी सातपिढ्या तरी बहुसंख्यच राहूं येवढें तरी निश्चित. पाकिस्तानचा प्रश्न सुटण्याकरतां कोणी कांहीं आपा-पल्या बुद्धीप्रमाणें जो तो उपाय सुचवीत असतो. पण पाकिस्तानाचा हा रोग त्वग्रोग नसून रक्ताचा रोग आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. एकानें तर महा-राष्ट्रांतील पुढाऱ्यांनी गांधींकडे जाऊन सत्याग्रह थांबवावा म्हणजे पाकिस्तान चळवळ बंद पडेल अशी सूचना केली. त्याच्या विचाराच्या मौलिकतेची शिफारस करावी तेवढी थोडीच ! ! महाराष्ट्रांतील पुढारी राहूच द्या पण भिकारीहि अशी गोष्ट करणें अपमानास्पद समजेल.

## शाप तरी देऊ नका

पाकिस्तानावर उपाय एकच नि तो हा कीं, प्रचंड हिंदुसंघटना बनवून ती योजना खणून काढणें. आम्ही उदारपणानें मुसलमानाना सांगतों कीं, अल्पसंख्यांकांचे जेवढे रास्त हक्क आहेत, तेवढेच तुम्हास मिळतील. वेटेज्, स्पेशल रिप्रेझेन्टेशन यांचें नांवहि काढूं नका. पाकिस्तानचा प्रश्न तर्कानें तत्वज्ञानानें अथवा टीकेनें सुटणार नाहीं, तो फक्त हिंदुसंघटनेनेच सुटणार आहे. यासाठीं महाराष्ट्रांतील हिंदुमात्रानें प्रथम हिंदुसभेचे सभासद व्हावें व निवडणुकी येवोत, गोलमेज परिषदा येवोत तेथें हिंदूंचे हितरक्षण करणारे हिन्दुच पाठवावे. आज बंगाल किंवा इतर प्रांत बोलू शकत नाहींत ती गोष्ट महाराष्ट्र निर्भयपणें सांगत आहे. महा-राष्ट्रानें पडत्या काळांतहि भगवा ध्वज व हिंदुत्व यांची भावना धगधगत ठेवली होती. ती जागृति आता अखिल भारतांत पसरत आहे. कानाकोपऱ्यांत तिचा

प्रभाव दिसत आहे, पंजाबपासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुत्वाचे भावनेनें जनता बेहोष झाली आहे. यावेळीं मात्र एकच विनंति करावयाची आहे. तुम्ही कोठेंहि जा पण अंतःकरणातील हिंदुत्वाची जागती ज्योत पेटलेली घेऊन जा व प्रत्येक ठिकाणीं भगवा ध्वज डौलानें उंच फडफडत ठेवा. ज्यांना हें पटत नसेल त्यांनी आमच्या या कार्याला आशीर्वाद द्यावा, निदान शाप तरी देऊं नये ! महाराष्ट्राची जगांत प्रौढी झाली तर तुम्हांला कांहीं सुतक तर येणार नाहीं ना ? आजच्या या मंगल दिनी आपण प्रत्येकजण अशी शपथ घ्या कीं, " हिंदूंचें हित तेंच आमचें राष्ट्रीयत्व, तें आम्ही अभेद्य ठेवूं आणि प्राण पणाला लाऊन हा पूज्य भगवाध्वज आम्ही भरतखंडांत अखंड फडकत ठेवूंच ठेवूं.

केसरी, ५ ऑगस्ट, १९४१

# अखंड भारताच्या स्वातंत्र्यार्थ लढण्याचा आम्ही निर्धार केला आहे

मुस्लीम लीगचा कार्यक्रम, ध्येय आणि धोरण काय आहे, याविषयीं त्यांनीं अगदीं स्पष्टपणें आपली बाजू मांडावी असें जें आम्हांला वारंवार वाटत होतें ती गोष्ट मद्रास येथें भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनांत घडली असल्यानें आम्हांला फार समाधान वाटत आहे. यापुढें मुसलमानांच्या मनांत काय चाललें आहे, याविषयीं कॉंग्रेसभक्तांनाहि शंका रहाण्याचें कांहींच कारण उरलेलें नाहीं. आणि आगामी संकटाला तोंड देण्याच्या सिद्धतेनें त्यांनाहि सज्ज राहिलें पाहिजे.

बॅ. जिना यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत कॉंग्रेसवर जोराचे कोरडे ओढले असून करड्या वाणीनें त्यांनीं अखेर कॉंग्रेसला आज्ञा सोडली, ' अद्यापपर्यंत तुमच्या वर्किंग कमिटीनें आमच्या पाकिस्तानयोजनेचा विचार केला नसेल तर तिला तो करावयाला सांगा. ' कॉंग्रेसनेंहि जिनांचें समाधान करील अशा प्रकारची मुत्सद्देगिरी आचरण्यास आपण सिद्ध आहों असें दाखवून दिलें आहे.

## सिंहाचा निर्णय नि लांडग्यांची बकबक

हिंदुमहासभेच्या बाबतींत मात्र जीनाशहांना कोरडेहि ओढण्याचें साहस झालें नाहीं किंवा तर्कवाद करण्याचीहि भ्रांत उरली नाहीं. त्यामुळें अखेर निराशेनें ते उद्गारले, ' हिंदुमहासभा ही एक ताठर आणि सहआचार–विचारास निरुपयोगी अशी संस्था आहे व मला तिच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. ' या उद्गारांनी आम्हांला पुढील गोष्टीची आठवण होतें.

कोण्या एका वेळीं देववनांत राहणाऱ्या लांडग्यांना त्या वनांत आपला सवता सुभा उभारण्याची आकांक्षा उत्पन्न झाली. या सवत्या सुभ्यांत दुसऱ्या कोणाचेंहि बोट शिरकतां कामा नये, त्यावर सर्वस्वी लांडग्यांचीच अधिसत्ता चालली पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. म्हणून त्यांनी आपल्या प्रतिनिधींना त्याप्रमाणें सदर वनांत घोषणा करण्याविषयीं सांगितलें व आराधनेचें धोरण स्वीकारून किंवा धाकदपटशा दाखवून सर्वांची संमति या घोषणेला मिळविण्याविषयीं आज्ञा सुटल्या.

कांहीं काळानें पुनः सगळे लांडगे आपल्या योजनेचें काय झालें, याचा विचार करण्यासाठीं एकत्र जमले, तेव्हां त्यांच्या प्रतिनिधींनी अशी माहिती सांगितली कीं, देववनांतील बहुतेक सर्व पशूंनी त्या घोषणेला संमति दिली आहे.

बोकड, कोंबड्या आणि गाढवें यांनीं या योजनेला नुसती संमतीच दिली असें नाहीं तर या योजनेशीं सहकार्य करून लांडग्यांच्या सवत्या सुभ्याप्रमाणेंच स्वतःचाहि एकेक सवता सुभा करण्याचे संकल्प सोडले. पण 'गजराजांनीं काय केलें' असा एकानें सवाल टाकला.

प्रतिनिधी उत्तरले-' गजराज हे प्रचंड आणि शक्तिमान् पशु आहेत खरे. पण ते सहजसुलभ रीतीनें बनूं शकतात व त्यामुळें थोडीशी वळणें घेऊन किंवा थोडासा दम देऊन त्यांचेकडून ही योजना सहज मान्य करून घेतां येईल.'

'पण सिंहाचें म्हणणें काय आहे; कारण त्यांच्याच म्हणण्याला विशेष महत्व आहे' असा आणखी एक सवाल आला. तेव्हां आपले खांदे उठवून लांडग्यांचा प्रतिनिधि म्हणाला, 'सिंहांचा प्रश्न काढूंच नका. देववनांतील सगळ्या पशूंत हा प्राणी अगदीं असहिष्णु आणि सहकार्याला किंवा सहविचाराबाबत निरुपयोगी आहे. तो आपल्या योजनेच्या तत्त्वालासुद्धां मान्यता देणार नाहीं. आराधना किंवा लपंडाव यांना तो केव्हांहि दाद देणार नाहीं, म्हणून त्याचा विचारच करावयाचा नाहीं असें मी ठरबिलें आहे.'

'पण त्याचा विचारच करायचा नाहीं असें तुम्ही ठरविलेंत तरी जर सिंहानें याबाबत उदासीन राहण्याचें नाकारलें तर?' पण या प्रश्नाला मात्र कोणालाहि उत्तर देतां येईना.

या गोष्टींपासून घ्यावयाचा बोध अगदीं स्पष्ट आहे. आपलें पाकिस्तान सिद्ध करून घेण्यासाठीं लीगनें हिंदुमहासभेला तोंड देण्याचें नाकारण्याचें कितीहि ढोंग केलें तरी अंतर्यामी लीगनें हें ओळखलें आहे कीं, हिंदुस्थानचें भवितव्य ठरवितांना अखेर केवळ हिंदुमहासभेचाच विचार करणें त्यांना भाग पडेल. कॉंग्रेस ही मुसलमानांची प्रतिनिधी नाहीं हें जीनांनीं मान्यच केलें आहे, उलट ती हिंदूंचीही प्रतिनिधी नाहीं. त्यामुळें आतां कॉंग्रेस हें एक राष्ट्रीय सामर्थ्य म्हणून गणले जाऊं शकणार नाहीं आणि तिची मान्यता म्हणजे राष्ट्राची मान्यता किंवा निदान हिंदूंची मान्यता असें तरी खचित होणार नाहीं.

लीगला असें वाटूं लागलें कीं, लौकरच पाकिस्तानच्या योजनेला काँग्रेसची मान्यता मिळवितां येईल आणि म्हणूनच बॅ. जीना यांनी हिंदुमहासभेवर वर उद्धृत केलेला ठपका ठेवला आहे. पण हा छाप मारण्यानेंच हिंदुमहासभेच्या निर्मळ आणि निर्दोष अशा राष्ट्रीय भूमिकेविषयीं आपण एकप्रकारें मान्यता देत आहों, ही गोष्ट बॅ. जीना यांच्या ध्यानांत आली नाहीं. आपला ' जन्मसिद्ध हक्क ' विकण्यास काँग्रेस सिद्ध होवो अगर न होवो, पण जोंपर्यंत हिंदुमहासभा अस्तित्वांत आहे तोंपर्यंत त्या हक्कांचें संरक्षण ती करीलच करील. तिचा तो अधिकारच आहे. सिंधूपासून तो समुद्रापर्यंत पसरलेल्या भरतभूचें स्वातंत्र्य आणि अविभाज्य सार्वभौमत्व रक्षिणे हा हिंदुराष्ट्राचा, हिंदुत्वाचा ' जन्मसिद्ध हक्क ' आहे. ही गोष्ट लक्षात घेऊनच सिंध, बंगाल, मुंबई किंवा मद्रास ज्या ठिकाणीं अलीकडे मुस्लिम लीगच्या बैठकी झाल्या त्या त्या ठिकाणीं त्यांनी असा दम भरला कीं, जर हिंदुसंघटनवादी लोक दातीं तृण धरून आमच्या या योजनेला मान्यता देणार नाहींत तर अंतर्गत यादवीचा धोका आल्याशिवाय राहणार नाहीं. मद्रासला जीनांनीसुद्धां सांगितलें कीं, हिंदूंनीं हिंदुमहासभेचें नेतृत्व सोडून द्यावें नाहीं तर त्याचे भयंकर परिणाम त्यांना सहन करावे लागतील.

## ठीक तर आता हिंदूंचें हृद्गत ऐका

या शब्दांनी आम्हांला मुसलमानांचीं हृदयें स्पष्टपणें कळून आलीं ही फार चांगली गोष्ट झाली. आम्हीहि आतां त्यांना थोड्याफार प्रमाणांत आमचें हृद्गत स्पष्ट करून सांगूं इच्छितों. मुसलमानांना आपल्या मर्जीप्रमाणें भरतभूचे तुकडे पाडतां आले नाहींत तोंपर्यंत ज्याअर्थी अंतर्गत यादवीची धमकी ते आम्हांला उघडपणें देत आहेत. तोंपर्यंत मुसलमान हें अंतर्गत युद्ध आमच्यावर केव्हा, कोणत्या स्वरूपांत लादतील याविषयीं आम्ही आपसांत मोकळेपणानें चर्चा करण्यास मुक्त आहोंत. या संभाव्य यादवीबाबत मुस्लीम लीगच्या छावणींतील कांहीं उमदे वीर जर आम्हांला थोडेसें सहाय्य करतील तर तें आम्हांला उपयोगीच आहे. अर्थात् त्यांना स्वतःला त्याविषयीं कांहीं कल्पना असेल तर ! मुसलमान सत्वरच हें युद्ध पुकारूं इच्छितात तर मग त्या युद्धासाठीं लागणारें सैन्य आहे तरी कोठें ? लहर लागेल तेव्हां हिंदुस्थानांतील अनेक नगरांत

शांततांभग करणारे मुसलमान गुंड आणि मवाली येवढेच या सैन्यांत असूं शकतील काय ? तर मग त्यांची हीं स्वप्नें फोल आहेत असें म्हणावें लागेल. शिवाय ठिकठिकाणच्या हिंदूंत आतां स्वसंरक्षणाची जागृति इतकी उत्पन्न झाली आहे कीं, त्यामुळें अनेक ठिकाणीं दंग्यांतसुद्धां मुसलमानांना हिंदूंपेक्षां अधिक किंमत द्यावी लागली आहे. कांहीं प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळें असतांना हे दंगेखोर त्यांना नमवूं शकले असतील कदाचित्. पण लवकरच अनेक प्रांतांत हिंदुसंघटनवाद्यांचीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ झालीं म्हणजे त्यांची काय वाट ?

किंवा कदाचित् असें तर नसेल, कीं कांहीं जागतिक धक्क्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता संपुष्टांत येईल व मगच हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें अंतर्गत यादवी व अराजकता माजल्यानंतर मुसलमान हे युद्ध पुकारून हिंदुराष्ट्राला नमविण्याचे मनोरे रचीत असतील. तसें जर असेल तर तुमच्या नुसत्या पाकिस्तानच्या प्रस्तावानें थोड्याच वर्षांत हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य नाहींसें होईल असें मानणें हें फाजील विश्वासाचेंच नाहीं का ? आणि समजा कीं, या वर्षांच्या आंतच तशी अवस्था प्राप्त झाली तरी जर हिंदी मुसलमानांच्या साहाय्याला बाहेरच्या एखाद्या प्रबल राष्ट्राचा पाठिंबा मिळाला नाहीं व हिंदुस्तानांतील मुसलमानांना हिंदूंशींच एकाकी सामना द्यावा लागला तर आपलीं स्वप्नें खरीं करतां येतील अशी अपेक्षा मुसलमान बाळगतात काय ?

तुमचा हुकमी एक्का म्हणजे फार तर हैद्राबादचा निजाम व सरसीमेवरचे टोळीवाले. पण तशी अवस्था येईल तर हिंदूंच्या बाजूला निर्विवादपणें प्रबळ असे पांचपन्नास हिंदु संस्थानिक खास एकत्र उभे राहूं शकतील. शिवाय या सर्वांच्यावर स्वतंत्र आणि सामर्थ्यवान् असें नेपाळचें राज्य आहे तें वेगळेंच. तसा प्रसंग आलाच तर आपल्या सहस्रावधी शिस्तींत वाढलेल्या अशा सशस्त्र सैनिकांसह हिंदुत्वाच्या रक्षणास नेपाळ केव्हांहि उभे ठाकेल. म्हणून अशा परिस्थितींत जरूर ती लढाई हिंदु राष्ट्रावर लादण्याचीं स्वप्नें मुसलमान पहात असतील तर आम्ही हिंदुसंघटनवादी लोक त्यांना असें आश्वासन देतों कीं, असा प्रसंग येईल तर घाबरून न जातां हिंदुराष्ट्राच्या इतिहासांत जन्मोजन्मीं न मिळणारी अशी सुवर्णसंधि आली असें म्हणून आम्ही त्या संग्रामाचें स्वागतच करूं व परत गेलेलें हिंदुराष्ट्राचें वैभव आम्ही परत मिळवूं.

## हिंदु-बुद्ध संघटना दूर नाहीं

खिलाफत चळवळीच्या वेळीं हिजरातच्या बाबतींत कडू अनुभव आला असतांहि तुम्हीं कदाचित् असें मानीत असाल कीं, तुम्हां हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या साहाय्याला बाहेरच्या स्वतंत्र मुसलमान राष्ट्रांतील मुसलमान धांवून येतील. पण ज्या राष्ट्राला स्वतंत्र आणि लष्करीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न राष्ट्र म्हणतां येईल, असें एक तरी मुसलमान राष्ट्र उभ्या जगतांत दाखवितां येईल काय ?

आणि घटकाभर वादविवादासाठीं अशी मुस्लिम राष्ट्रांची फळी हिंदुत्वावर घाला घालण्यासाठीं उभी करतां आली असें मानलें तरी या फळीचा प्रतिकार करण्यासाठीं हिंदूंची नि बुद्धांची एकजूट निर्माण होण्याचाहि बराचसा संभव आहे. तसा एखादा संधि घडवून आणतां येईल अशीहि शक्यता निर्माण झालेली आहे. मुसलमानांना जर भरदिवसा इस्लाम राष्ट्रसंघाच्या फळीचीं स्वप्नें पहातां येत असतील तर उलट जम्मूपासून तों जपानपर्यंत त्यांच्याविरुद्ध हिंदु-बुध्द एकजुटीचीं स्वप्नेंहि आपणाला पहातां येणार नाहींत काय ? मुसलमान जर आपलीं स्वप्नें सत्यसृष्टींत आणण्याची अशी अपेक्षा करीत असतील तर हिंदुबुध्दयुति घडवून आणण्याचा विचार करण्यास आम्हांस तरी प्रत्यवाय काय ? पहिली योजना जर अस्तित्वांत येणार असेल तर दुसरी घटना घडून येणेंहि अशक्य नाहीं व दुसरी संघटना ही पहिल्या संघटनेला चिरडून टाकण्यास समर्थ होईल.

अशा प्रकारें स्वप्नसृष्टींत वावरण्याचें सोडून देऊन मुसलमान जर वस्तुस्थितीचा विचार करतील तर पाकिस्तानयोजनेनुसार हिंदुस्थानांत वेगवेगळीं लहान मुसलमान राष्ट्रें प्रस्थापित करणें हें अहिताचें आहे हें त्यांच्याहि लक्षांत येईल. मुसलमानांच्या विश्वासघाताचीं प्रतीकें म्हणून राहाणाऱ्या या लहान राष्ट्रांच्या भोंवतीं असणाऱ्या प्रबळ हिंदुराष्ट्राचें सामर्थ्य एकाच दिशेनें संघटित होत राहून त्यांच्या दडपणापुढें या राष्ट्रांना किती काळ व कशा प्रकारें तग धरतां येईल ? घटकाभर तुमचें पाकिस्तान आलें तरी त्याचें चित्र कसें राहील पहा.

## आणि हें पाकिस्तानचें चित्र पहा !

तिकडे पंजाबांत शिखांचें कृपाण सदैवच तुमच्या छातीवर रोखलेलें राहील, बंगाल्यांत चोहोंबाजूंनीं आसामपासून बिहारपर्यंत कोट्यवधि हिंदूंकडून तुम्हीं घेरले जाल, भोपाळच्याभोंवती प्रबळ हिंदुसंस्थानिकांचें कडे राहील आणि दक्षिणेंत

सदैव लढवय्ये मराठे, आंध्र आणि तामीळ हे निजामावर झेंप घालण्याचा क्षण येण्याची वाटच पहात राहातील.

अशा स्थितींतील अवस्था हिंदूंच्यापेक्षां मुसलमानांच्या संरक्षणाच्या दृष्टीनेंच अधिक तापदायक ठरणार नाहीं काय? नकळतपणें बॅ. जीना यांनी आपल्या मद्रासच्या अध्यक्षीय भाषणांतच हें चित्र रेखाटलेलें दिसतें.

पाकिस्तानचीं ही घटक राष्ट्रें जणू काय लौकरच अस्तित्वांत येणार आहेत, असें भासवून आपल्या श्रोत्यांना चढविण्यासाठीं बॅ. जिनांनीं, जर्मनांनीं निर्माण केलेल्या क्रोट राष्ट्राचा दाखला दिला. येवढेंच नव्हे, तर पुढें जिनांनी ब्रिटिशांनाहि इषारा दिला कीं, ते जर पाकिस्थान राष्ट्राची प्रस्थापना करणार नाहींत तर दुसरें कोणीतरी येऊन तें कार्य करतील!

जिनांनीं आपल्या पाकिस्तानाला क्रोट राज्याचा दाखला देऊन आपलीच बाजू लंगडी करून घेतली. आपल्या विशाल राष्ट्रीयत्वाला विसरून सवत्या सुभ्याचीं स्वप्नें उराशीं बाळगल्यानेंच शेजारच्या प्रबळ राष्ट्रांच्या सामर्थ्याखालीं त्यांना सदैवच चिरडावें लागलें हेंच नेमकें जिनाशहा विसरले.

अशा प्रत्येक लहान जमातींनें क्रोट लोकांच्या पासूनच हा धडा घ्यावयास हवा कीं, जोंपर्यंत हीं लहान लहान राष्ट्रें आपल्या शेजारच्या प्रबळ राष्ट्रांत तादात्म्य पावत नाहींत, तोंपर्यंत त्यांच्या दैवीं सदैव वनवास आणि पारतंत्र्यच ठेवलेलें आहे! जर्मनांची पाठ फिरतांच दुसऱ्या प्रबल साम्राज्यानें जोंपर्यंत धाड घातली नाहीं तोंपर्यंतच आजचें जर्मनदत्त स्वातंत्र्य क्रोट लोकांना उपभोगतां येईल. हिंदुस्तानांत येणाऱ्या पाकिस्तानाच्या योजनेच्या कपाळीं क्रोट जमातीचेंच भवितव्य येईल, ही गोष्ट बॅ. जिना यांनीं नकळत सांगून टाकलेली आहे.

शिवाय असल्या पाकिस्तानाच्या पावसाळी छत्रीप्रमाणें असणारे जन्म हे कांहीं हिंदुराष्ट्राला नवे नाहींत. गेलीं १०००० वर्षें हिंदुराष्ट्रानें आपलें संघटन आणि संवर्धन करतांना अशा अनेक शकस्थानांना व हूणस्थानांना आपल्या बळकट मगरमिठींत कवटाळून नामशेष केलेलें आहे! तुमचें अगदीं जवळचे असें मोंगली साम्राज्यसुद्धां मराठ्यांनीं हां हां म्हणतां स्थानभ्रष्ट केलें. काय घडतें आहे हें लक्षांत येण्यास पुरेशी उसंतसुद्धां त्या साम्राज्याला मराठ्यांनीं दिली नाहीं. तुमची पाकिस्तानची कल्पना यदाकदाचित प्रत्यक्षांत आली

तरी अल्पकालीन जीवनानंतर तिचीसुद्धां वरीलप्रमाणेच गति झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## अशीं छपन्न पाकिस्तानें आम्ही पचविलीं आहेत

जिवंत इतिहास हीच गोष्ट उद्घोषित करीत आहे कीं, अशीं छपन्न पाकिस्तानें येतील आणि जातील पण हिंदुस्थान हें कायम आहे आणि राहीलहि.

म्हणून हिंदुस्थानांतील मुसलमानांना आपली जाति टिकवून शांतता व सुबत्ता उपभोगण्याचा, अखंड हिंदुराष्ट्रांत समाविष्ट होऊन नांदण्याचा, हा एकच मार्ग आहे आणि त्यालासुद्धां पुढील शर्ती आहेत.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य त्यांना मान्य असलें पाहिजे; भरतखंडाचें व हिंदुराष्ट्राचें अविभाज्यत्व त्यांनी मान्य केलें पाहिजे; लोकसंख्येच्या प्रमाणांतच प्रतिनिधित्व स्वीकारण्यास त्यांनी सिद्ध असलें पाहिजे; सरकारी नोकऱ्या या केवळ गुणनिविष्टच राहाव्यात हें त्यांनी मान्य केलें पाहिजे; व पूजास्वातंत्र्य, भाषा व लिपिस्वातंत्र्य हे सर्व नागरिकांना सारखेच उपभोगिण्यास मिळावयाचे मूलभूत अधिकार आहेत याला त्यांची मान्यता मिळाली पाहिजे.

हिंदुस्थानची भावी घटना याच मूलभूत तत्त्वांचा आधार घेऊन मग रचली गेली पाहिजे. भावी भारतीय शासनसंस्थेची हीं मूलभूत तत्त्वें होत. तीं सर्वांना सारखींच न्याय देणारींहि आहेत.

केवळ या आणि याच अटींवर आम्ही हिंदुबांधव आपल्या मुसलमान बांधवांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं व प्रबळ एकसंघ भारतीय राष्ट्राच्या प्रस्थापनेसाठीं आमच्या खांद्याला खांदा लावून लढण्यासाठीं आमंत्रण देत आहोंत.

केवळ या आणि याच अटींवर मुसलमान येणार असतील तर त्यांच्यासह, ते येत नसतील तर त्यांच्याशिवाय, आणि ते आडवे येतील तर त्यांचा प्रतिकार करून हिंदुस्थानच्या–एकसंघ अशा हिंदुस्थानच्या–स्वातंत्र्यासाठीं झगडण्याचा निर्धार हिंदूंनीं केला आहे ! !

केसरी, ५ मे, १९४१

# वामन हरी पेठे

हिऱ्या-मोत्यांचा व सोन्या-चांदीचा उत्तम व खात्रीलायक तयार माल व फॅन्सी प्रेझेंटिंगशन आर्टिकल्स मिळण्याचें जुनें दुकान—

**शो रूम**—पेठे बिल्डिंग, मुंबई, नं. ४

टेलिफोन नं. ३०३८५

# के. बी. रेळे

गजकर्ण मलम

के. बी. रेळे कंपनी,
गिरगांव, मुंबई

नाताळांत

कोल्हापुरी

संगीत

# चिवडा

वापरून पाहुण्यांना
खुष ठेवा.

रत्तलास १ रुपया

एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड मुंबई.

# सावरकरांचा दक्षिणसंचार

माझ्या दक्षिणेकडील दौऱ्यांत मी पाहिलेल्या सामाजिक व राजकीय परिस्थितीची तुम्हांस माहिती करून देण्याचा माझा विचार नाही. मला जे गमतीदार अनुभव आले ते सांगणार आहे. त्यांत येईल तितकेंच राजकारण !

यापूर्वी मी मद्रासला गेलों नव्हतों, नाहीं एकदा गेलों होतों खरा. तो म्हणजे सुमारें ३५ वर्षांपूर्वी. अंदमानाच्या यात्रेस जातांना आमचा मुक्काम मद्रासच्या तुरुंगांत पडला होता. तेव्हां एवढाच माझा व मद्रासचा पूर्वीचा संबंध होता खरा. मद्रासहून मदुरेस गेलों. मद्रासपासून मदुरेपर्यंत मधल्या प्रत्येक स्टेशनवर लोकांची प्रचंड गर्दी माझ्या सत्कारार्थ जमत असे व मदुरा येथून दौऱ्यास खरी सुरुवात झाली. तेथें कॉंग्रेसचे वजन दांडगें तर हिंदुसभेचें नांवसुद्धां परवांपर्यंत कुणास माहीत नव्हतें. स्टेशनमध्यें गाडी शिरली तों आजूबाजूस प्रचंड जनसंमर्द पाहिला. तो पाहून मला वाटलें हे लोक माझा निषेध करण्यासाठीं आले आहेत कीं काय ? मदुरा हें कॉंग्रेस प्रतिष्ठेचे आगर आणि मी तर हिंदुसभेच्या कार्यांचे 'पातक' करीत असलेला !

## सत्यमूर्तींची धमकी वाया गेली

पण गाडी उभी रहातांच हिंदुसभेच्या जयजयकाराने सर्व प्रदेश दुमदूमून गेला. महाराष्ट्रांतसुद्धां दिसला नाहीं इतका उत्साह तेथें माझ्या नजरेस आला.

तेथें जमलेल्या लोकांना हिंदुसभेची व तिच्या कार्याची फारशी माहिती नव्हती. त्यांना इतकेंच ठाऊक होते कीं हिंदूंचा कोणी तरी कैवारी येत आहे.

**माझ्या पूर्वी एकच आठवडा सत्यमूर्ति तेथे जाऊन आले होते. या मुक्कामांत त्यांनी हिंदुसभेविरुद्ध शक्य तेवढी हाकाटी केली होती व त्या संस्थेशीं संबंध ठेवणाऱ्या अगर माझ्या सभा-समारंभांत भाग घेणाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाईल अशी धमकीहि दिली होती. तरी पण हा सर्व खटाटोप व्यर्थ गेला.**

मदुरा हें क्षेत्र असून त्यास ' दक्षिण–काशी ' म्हणतात; यावरून त्याचें स्वरूप तुमच्या लक्षांत येईल.

अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाविरुद्ध झालेल्या सत्याग्रहामुळे तेथे हिंदु समाजांत बरीच अंतर्गत तेढ निर्माण झाली होती. सनातनी, अस्पृश्य, कॉंग्रेस, जस्टिस आणि मध्यम अशा अनेक पक्षांत तेथील हिंदु समाजाची फाळणी झालेली. माझ्या स्वागतास आलेल्या व नंतर निघालेल्या माझ्या मिरवणुकींत सामील झालेल्या मंडळींत कोणकोणत्या पक्षाचे लोक आहेत असें मी डॉ. वरदराजलु नायडु यांना विचारले. तेव्हां त्यांनी सांगितलें कीं,

**कितीहि तीव्र मतभेद असले तरी सर्व हिंदु समाज त्या दिवशीं सत्कारांत एक दिलाने सामील झाला होता. कॉंग्रेस-पक्षीय आमदारसुद्धां त्यांत होते. उत्तरेपेक्षांहि तेथे हिंदु धर्माचा अभिमान अधिक जाज्वल्य आहे हें पाहून मला संतोष वाटला.**

## मदुरा येथील सत्कार

तीन चार मैल मिरवणूक झाली. ती संपली. पण स्नान व भोजन करण्यासाठी देखील फुरसत देण्याची लोकांची तयारी नव्हती, इतका त्यांचा उत्साह. मिरवणुकींत उतरतों तोंच मीनाक्षी–मंदिराचे पुजारी आले. ( हें मंदिर अस्पृश्यांना खुलें करण्यांत आल्यामुळें तेथें ब्राह्मणांनीं अन्नसत्याग्रह केला होता. ) या पुजाऱ्यांचें सोंवळें फार कडक. इतकें कीं ते मला भेटावयास आले ते देखील सोंवळीं नेसून ! मी अस्पृश्यता न मानणारा व जातपात तोडक व ते एक पुरातन मंदिराचे विजयनगरच्या साम्राज्यापासून पिढीजात पुजारी. पण त्यांनी माझा कोण प्रेमानें सत्कार केला व मंदिरांत चलण्याचें आमंत्रण केलें. **मंदिरातर्फे आचार्यांना द्यावयाचा जो सन्मान तो त्यांनी मला दिला. त्याबाबतचे पीठावर बसवणें समंत्रक जलसिंचन वगैरे सर्व विधि केले. याचें कारण मी हिंदु समाजाचा एक कैवारी म्हणूनच. सनातन्यांनी हा सत्कार केला म्हणून मला अभिमान वाटला. मी सद्‌गदित झालों.**

## मराठ्यांच्या मर्दुमकीची स्मृति

मी मंदिरापाशीं गेलों. माझ्यामागें हजारों लोक होते. प्रवेशद्वाराशीं मंदिराच्या दोन हत्तींनी आपल्या सोंडा जुळवून माझ्यावर कमान केली. हा सत्कारदेखील फक्त आचार्यांनाच देण्यांत येतो. मी मंदिरांत प्रवेश केला. माझ्यामागें हजारों लोक घुसले. त्या मंदिराचें वैभव काय वर्णावे. हिंदु शिल्पाचा अत्युत्कृष्ट नमुनाच तो. त्याचा विस्तारहि तितकाच प्रचंड. कित्येक स्तंभावर पुराणांतील भव्य चित्रें कोरलेलीं. तेथील एकेक अंतर्गत मंदिर आपल्या इकडील मोठ्या मंदिराहून मोठें. पण मुख्य मंदिराची भव्यता काय सांगावी ! **तीन शतकांपूर्वी मराठ्यांनीं छातीचा कोट करून मुसलमानांची लाट थोपवून धरली म्हणून हें व दक्षिणेंतील इतर मंदिरें शाबूत राहिलीं. नाही तर सोरटीसोमनाथ अगर काशी विश्वेश्वराच्या मंदिरासारखी त्यांची गति झाली असती, त्यांच्या मशिदी झाल्या असत्या.** महागणपति पार्वती वगैरे अंतर्गत मंदिरांतसुद्धां मी नुसता नमस्कार करून भागलें नाहीं. तेथे आरती वगैरे झालीच.

## लिंबांचा वर्षाव

सायंकाळीं सभा झाली. तेथेंहि कोण प्रचंड उत्साह ! सभेस जातांना वाटेंत पाहुणा म्हणून जो तो मला लिंबें देऊं लागला. कोंकणांत ज्याप्रमाणें गुळपाणी देण्याची पद्धति असे त्यांतलाच हा प्रकार. उन्हामुळे श्रान्त होऊन येणाऱ्या पाहुण्यास थंड पेय करतां यावे म्हणून हें लिंबू द्यावयाचें. माझ्या मोटारींत लिंबांचा खच पडत असे. दोन वेळा मोटार उभी करून लिंबें बाहेर काढून टाकावीं लागलीं; त्याचप्रमाणें चंदनाच्या उटीचें व गुलाबपाण्याचे बंब आणण्यांत आले व हें सर्व माझ्या अंगावर चोपडण्यांत अगर ओतण्यांत येत होतें.

## त्रावणकोर कीं कोंकण ?

मदुरेहून मी त्रावणकोरला गेलों. तो प्रदेश पाहून कोंकणची आठवण झाली. परशुरामाची कथा कोंकणाप्रमाणेंच त्रावणकोरबद्दलहि तिकडे सांगण्यांत येते. समुद्र हटविण्याची कल्पना आज 'रेक्लमेशन' या नांवानें आपल्याला परिचित आहे. तेंच परशुरामानें त्या वेळीं केलें असावें व प्रदेश लोकवस्तीला व शेतीला

लायक बनविला असावा. परशुरामाची म्हणून जी कथा आपण वाचतों तें अर्थात् रूपक होय. पण अशा वीरपुरुषाला अवतार म्हणणें सयुक्तिकच आहे.

कोंकण व त्रावणकोर यांत निसर्गाचें साम्य फार. सृष्टीचें सौंदर्य, तसेच केळी, नारळी, पोफळी यांचीं बनेच्या वनें. परंतु त्रावणकोर स्वकीयांच्या हातीं असल्या-मुळें तेथील निसर्गाचें सौंदर्य टिकवून ठेवण्यांत आलें आहे. तर कोंकण परकीय सत्तेखाली. तेथील शोभा गेली आहे. आपल्या हितासाठी म्हणून का असेना, पण त्रावणकोरच्या अधिकाऱ्यांनी तेथील नैसर्गिक सौंदर्य राखलें आहे. तो निसर्ग व्यवस्थित होता. त्रावणकोरमध्ये जंगलें तोडण्यांत येत असलीं तरी तीं लावण्यांतहि येतात व वनश्रीची शोभा कायम राहते; तर कोंकणांत उपऱ्या लोकांनी सर्व विकलित करून टाकलें आहे. मी गेलों होतों तेव्हां तेथें नुकताच पावसाळा सुरू झाला होता. तेथील मनोहर दृश्यें पाहून हिंदुस्थानांत पूर्वी कालिदास कसे निर्माण झाले याचें कोडें सहजीं उलगडतें.

## ' दरबारी ' पाहुणा–तेव्हां आणि आतां

क्विलॉनला आल्यापासून राजकीय दौऱ्यास प्रारंभ झाला असें म्हणतां येईल. तेथील स्टेशनवर माझ्या स्वागतार्थ प्रचंड गर्दी जमली होती. स्टेशनच्या बाहेर पडतांच एक पोलीस तुकडी माझ्या रोखानें आली व तिने मला सलामी दिली. माझ्या त्या मुक्कामांत मी दरबारी पाहुणा म्हणून रहावे अशी महाराजांची इच्छा असल्याचें मला एका अधिकाऱ्याने सांगितलें. यावर डॉ. नायडू विनोदाने म्हणाले, " पहा, तुमचा केवढा सन्मान होत आहे तो !" मी म्हणालो, " अहो, यांत काय आहे ? दरबारी पाहुणचाराला मी नवखा थोडाच ? ब्रिटिश साम्राज्याच्या बादशहाचा पाहुणचार मी पुरा चोवीस वर्षे भोगला आहे."

बाकी या व विलायतेंतील त्या वेळच्या सत्कारांत एक साम्य होतें. या वेळीं पोलिस अधिकारी ' ते पाहा सावरकर ' असें म्हणत माझ्याकडे आला. त्या पूर्वीच्या वेळींहि मला पकडण्यासाठी स्टेशनवर थांबलेले पोलीस मला पाहतांच ' There he is ' असें म्हणत माझ्यावर तुटून पडले होते. पण येथे माझ्या हातांत गुच्छ पडले तेथे बेड्या पडल्या !

क्विलॉनचें तें दृश्य पाहून माझ्या मनांत एक विचार आला. संस्थानांत चळवळ कमी असा समज आहे; परंतु कांहीं संस्थानांतून अशी जागृति आहे कीं जरा अक्कल दाखविली तर केवढें तरी प्रचंड कार्य होतें.

## महाराष्ट्राबद्दलची भावना

यापुढे मी चेंगनबेरीपर्यंत पन्नास मैल मोटारीने प्रवास केला. वाटेंत दरदोन मैलांवर गांवें लागत व प्रत्येक खेड्याच्या अलीकडे अर्धा मैल व पलीकडे अर्धा मैल अशी दुतर्फा गर्दी माझ्या स्वागतार्थ उभी असे. लोकांचा हा उत्साह अपूर्व होता. **मला विशेष अभिमानाची गोष्ट वाटली ती ही कीं, हे सर्व लोक महाराष्ट्राकडे डोळे लावून बसले आहेत. शिवाजीमहाराज व लोकमान्य टिळक ज्या महाराष्ट्रांतून आले तेथून आपण आलांत अशी भावना त्यांनी व्यक्त केली.**

## स्त्रीप्रधान देश

पुराणांत आपण ज्या स्त्री राज्याविषयी गोष्टी वाचतों तें अंशतः तेथे अस्तित्वांत आहे. आपल्याकडे वारसा मुलाला जातो तसा तिकडे मुलीला जातो. त्रावणकोरच्या गादीचा वारसा पाहा. तेथे राजाचा मुलगा त्याच्यामागून गादीवर येत नाही तर भाचा येतो. म्हणजे राजाची बहीण ही स्वामिनी समजली जाते, तिचा मुलगा हा केवळ कार्यकर्ता होय. स्त्रियांना पुष्कळ स्वातंत्र्य व अधिकार आहेत, तिकडे लग्नाला ' संबंधम् ' म्हणतात. म्हणजे स्त्रीला वाटेल तेव्हा हा संबंध तोडतां येतो. पण आपल्याकडील पुरुषप्रधान पद्धतींत तरी काय स्थिति आहे ? आपल्याकडे ' यशवंती ' विवाह होतात तिकडे ' यशवंत ' विवाह होतात ! समाजाची संख्या घटत चालली आहे. तिकडील अस्पृश्यांना एझवा अगर एरवा म्हणतात. त्यांच्यांतहि जातिभेद आहेतच आणि ते तीव्र स्वरूपाचे आहेत. एक अस्पृश्य जाति दुसऱ्या अस्पृश्य जातीशीं संबंध ठेवीत नाही इतके ते तीव्र आहेत.

## त्रावणकोरमधील सुधारणा

त्रावणकोरचे महाराज हे हिंदुत्वाचे कट्टे अभिमानी आहेत. महाराणी थोर मनाच्या आहेत. दिवाणांचें कर्तृत्वहि थोर आहे. हें संस्थान प्रगतीच्या अत्युच्च

शिखरावर पोंचलें आहे. हे अर्थात सापेक्ष बोलावयाचें. इतर संस्थानांच्या मानानें त्रावणकोर फार पुढें गेलें आहे. सबंध हिंदुस्थानांत साक्षरतेचें प्रमाण दहा टक्के सुद्धां नाहीं तर या संस्थानांत ते पाऊणशें टक्क्यावर आहे. दुय्यम शिक्षणाची प्रगति अशीच आहे. सध्यांचे महाराज व दिवाण हे सुधारणेचे प्रयत्न अहर्निश करीत असतात.

मागें केलेलीं पापें आज निस्तरावीं लागत आहेत. सध्याचे महाराज व दिवाण नसते तर त्या संस्थानांत सर्व कांहीं ख्रिस्तमय झाले असतें. ख्रिश्चनांची वस्ती चाळीस टक्के आहे. तिची वाढ होण्यास जर वेळींच प्रतिबंध करण्यांत आला नाहीं तर थोड्याच काळांत हिंदु तेथे अल्पसंख्य होतील व पुढें नाश पावतील.

## उपकारांचे फळ

ख्रिश्चन समाजानेहि माझा आदरसत्कार केला. हिंदु लोक आपल्याला चिरडून टाकतील म्हणून आपण महाराजांविरुद्ध चळवळ करीत असल्याचें ते सांगतात. काय कोटिक्रम हा ? मी त्यांना विचारलें, 'तुम्ही या ज्या गोष्टी बोलतां ते काय तुम्हीं आमचे जेते म्हणून येथे आलांत ?' या लोकांना आमच्या पूर्वजांनीं अनाठायीं औदार्य दाखवून आसरा दिला. हे मूळचे सारियन ख्रिश्चन्स. तेथे छळ होऊन त्यांस पिटाळून लावण्यांत आलें. तेव्हा ते त्रावणकोरच्या किनाऱ्यास येऊन लागले व त्यांनी आसऱ्याची भिक्षा मागितली. त्या वेळच्या राजाने त्यांना वसाहतीला जागा दिली व त्यांना प्रार्थना करतां याव्यात म्हणून आमच्या खर्चाने चर्चसुद्धां बांधून दिले. त्यांना ग्रामपंचायतींत प्रतिनिधीत्व दिलें। तसा ताम्रपट दिला. इंग्लंडमध्ये ख्रिस्ती धर्माचा छळ झाला त्याच्या आधीपासून त्रावणकोरमध्ये ख्रिस्ती लोक आहेत हें ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल! मी तेथील ख्रिश्चन लोकांना विचारलें, 'ज्या हिंदूंनीं तुम्हाला आसरा दिला व इतकीं वर्षे राहूं दिलें ते काय आतांच तुमच्यावर कुरघोडी करणार आहेत काय ? त्या वेळीं जे हिंदु तुम्हाला ठार करूं शकते पण ज्यांनी तुम्हाला आश्रय दिला तेच हिंदु काय आता तुमचा सत्यानाश करणार आहेत ?'

## निदान कृतज्ञता तरी दाखवा

यावर ख्रिस्ती समाजाचे पुढारी म्हणाले, 'तुम्ही हिंदूंना उठावणी देतां म्हणून आम्हाला भीति वाटते.'

त्यांचा हा कोटिक्रम पाहून मी थक्कच झालों. मी त्यांना स्पष्ट विचारलें: "सत्तावीस कोटी हिंदूंना तुम्ही तीस लाख ख्रिस्ती विरोध करणार काय? तुम्हाला त्यांत काय मिळेल? त्यापेक्षां दोस्ती का करीत नाहीं. आम्ही चिरडून टाकूं शकूं या भीतीने तरी सरळ वागा. तुम्ही निदान कृतज्ञता तरी दाखवा. सर्पाला दूध घातल्यासारखा प्रकार होऊं देऊं नका." आणि म्हणूनच हिंदु परिषदेंत मी प्रतिनिधींना विनंति केली कीं **कांहीं झालें तरी ख्रिस्ती समाजाला इतकें देतों तितकें देतो असें कबूल करून त्यांची विनवणी करीत राहूं नका.**

## अस्पृश्यांची प्रगति

संस्थानांतील एरवा म्हणजे अस्पृश्य समाजासाठीं महाराजांनीं पुष्कळच केलें आहे. संस्थानचीं देवालयें अस्पृश्यांना खुलीं करण्यांत आलीं आहेत. इतकें झालें तेव्हां अस्पृश्यांचे पुढारी म्हणूं लागले, 'मंदिरप्रवेशाचा अधिकार मिळाला आतां आम्हांला मंदिरांची आवश्यकता नाहीं. आम्हांला राजकीय हक्क हवेत. कारण त्यायोगे आम्हाला आर्थिक स्थिति सुधारावयाची आहे.'

मी त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, दारिद्र्याचा प्रश्न अस्पृश्यतेचा नाहीं, तो स्वतंत्र आर्थिक प्रश्न आहे. फक्त अस्पृश्यच दरिद्री आहेत हा समज चुकीचा आहे. स्पृश्यांत-ब्राह्मणांतसुद्धां-दारिद्र्य आहे. अस्पृश्यता या संस्थानांतून गेलीच आहे. अस्पृश्य लोक बी. ए. एम्. ए. वगैरे पर्यंत शिक्षण घेऊन कांहीं बाबतींत स्पृश्यांच्याहि ते पुढें गेले आहेत.

## विनवणी करूं नका

एरवा लोक ख्रिश्चन होण्याची भीति घालतात. हा त्रास सात वर्षे चालू आहे. मी हिंदूंना सांगितलें, कीं परधर्मांत जाऊ नका अशी त्यांची विनवणी मुळीच करू नका. या गोष्टींना कधींच अंत नाहीं. शुद्धीचीं द्वारें मात्र हिंदूंनीं खुलीं ठेवावींत. हे अस्पृश्य परधर्मांत जाऊन मग परत हिंदु धर्मांत येतील तेव्हां ते खरे हिंदु म्हणून येतील.

## अछुतस्थान कीं हिंदुस्थान

आणि ख्रिस्तन होऊन तरी हे अस्पृश्य काय मिळवणार. तेथील चर्चमध्येंहि अस्पृश्य ख्रिश्चनासाठीं बसण्याची निराळीं बाकें असतात व स्पृश्यांसाठीं राखून

ठेवलेल्या बाकावर अस्पृश्य बसला म्हणून तेथें मारामाऱ्या व रक्तपात झाले आहेत. खिश्चनहि म्हणे स्वतंत्र राष्ट्र मागणार. त्यांची संख्या मोजकी. येथे एक घर तर दहा मैलांवर दुसरें. नॉर्वेसारख्या देशांचें काय झालें तें पहा. मग या विखुरलेल्या अच्छुत स्थानाचें काय होणार ? बहुतेक मृत्युस्थानच ! अशा गोष्टी अस्पृश्यांपुढें मांडल्या कीं त्यांना वस्तुस्थिति व भविष्यकाळ यांची जाणीव होते व आम्ही मरेपर्यंत हिंदुच रहाणार असें ते आपण होऊन बोलूं लागतात.

त्रावणकोरमध्ये अस्पृश्यता अक्षरशः नाहीशी झाली. हें सर्व कोणी केलें ? अहमदाबादेंत अगर नासिकासारख्या ठिकाणीं जें शक्य झालें नाहीं तें कुणीं केलें ? तर आपल्याचपैकीं मातीमोल, लोक ज्यांना अगदीं टाकाऊ समजतात अशा एका महाराजानें केलें ! आपली हिंदु संस्थाने ही एक शक्ति आहे. दारूचें कोठार तेथे आहे. ठिणगी टाकण्याचीच जरूरी आहे कीं केवढे तरी कार्य होऊं शकतें.

## शुद्धीचें प्रचंड कार्य

महाराजांनीं अस्पृश्यता नष्ट केली खरी, पण जे अस्पृश्य परधर्मांत गेले त्यांचें काय ? त्यांना हिंदु धर्मांत आणण्याचे प्रयत्न झालेच पाहिजेत. आनंदाची गोष्ट ही कीं, असे नेटाचे प्रयत्न त्रावणकोरमध्ये होत आहेत; गेल्या तीन वर्षांत पन्नास हजार एझवा शुद्ध होऊन हिंदु धर्मांत परत आले आहेत. त्रावणकोर संस्थानांत हिंदु मिशन नांवाची संस्था आहे. या संस्थेला संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकांत वीस हजार रुपयांची दरसाल देणगी देण्याची तरतूद दिवाण सर सी. पी. रामस्वामी यांनीं केली. हिंदुधर्माच्या प्रसारासाठी ही देणगी देण्यांत येत आहे असें त्यांनी स्पष्ट नमूद केलें. त्याबद्दल त्यांच्यावर गहजब झाला. परंतु ते आपल्या निश्चयापासून ढळले नाहींत.

## मुसलमानांचा चांगुलपणा

त्रावणकोरमध्ये मुसलमानांचा प्रश्न नाही असें सांगण्यांत येतें. तेथील मुसलमान फार चांगले वागतात असेंहि म्हणतात. पण तें खरें असल्यास मुसलमान तसे कां वागतात ? कारण ते फक्त शेंकडा दोन टक्के आहेत. **परवांच बंगालचे मुख्य मंत्री ना. हक हे मलबारला जाऊन**

**आले. मलबार हा मुसलमानांचा प्रदेश आहे. तो अरबस्थानाचा भाग आहे अशी मुक्ताफळें त्यांनी काढलीं. त्यांना उत्तर इतकेंच कीं, मलबार हा जर अरबस्थानचा भाग असेल तर आम्ही जाऊन अरबस्थान घेऊं.** ही प्रवृत्ति पाहून मी धोक्याची सूचना देऊन ठेवतो कीं हिंदु जर वेळींच जागे झाले नाहीत तर मोपल्यांचें बंड फिरून झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

मुसलमानांच्या पाय पसरण्याच्या कल्पना अवश्य लक्षांत घेतल्या पाहिजेत. प्रथम ते रहावयास जागा मागतील, मग मशिदींकरिता जागा मागतील, मग एक मिनिटपर्यंत वाद्यें बंद करण्याची विनंति करतील नि पुढें चोवीस तास बंदी झाली पाहिजे असा हट्ट धरतील; मग वस्ती वाढली म्हणून जादा व राखीव प्रतिनिधीत्व मागतील. हा अनुभव लक्षांत घेऊन मी त्रावणकोरच्या हिंदूंना सांगितलें कीं मुसलमान चांगले वागत असतील तर तुम्हीं त्यांच्याशीं तसेंच वागा. पण ते सदैव तसेंच वागतील यावर विश्वासून राहूं नका.

## मुसलमान दिवाणांचें वेड

सर महंमद हबीबुल्ला हे दोनच वर्षें त्रावणकोरचे दिवाण होते. आमच्या हिंदु महाराजाचें जणुं मुसलमान दिवाणाखेरीज चालतच नाहीं. मुसलमान संस्थानिकांनी मात्र हिंदु दिवाण नेमला असें सहसा दिसत नाही. सर महंमद हबीबुल्ला यांनी आपल्या जातवाल्यांना जादा व राखीव प्रतिनिधित्व देऊन टाकलें ! सर सी. पी. रामस्वामी अय्यर हे दिवाणपदावर येतांच त्यांनी हें सर्व साफ तोडून टाकलें. प्रत्येक मनुष्याला एक मत व सर्वांनी एकत्र मतदान करावयाची पद्धति त्यांनी सुरू केली. ख्रिश्चनांच्या करितां मात्र त्यांनी फक्त दोनच जागा तूर्त राखीव ठेवल्या आहेत. त्रावणकोरचा व महाराष्ट्राचा संबंध तसें पाहतां जुनाच आहे. टिपूने स्वारी केली तेव्हा तेथील शिष्टमंडळ पुण्यास पेशव्यांकडे आलें व ब्राह्मणांचें राज्य रहाणार काय असें त्यानें गाऱ्हाणें घातलें. पुढें श्रीरंगपट्टणाचा वेढ्याच्या वेळीं जो जय मिळाला तो मराठ्यांच्या मदतीवरच. मराठा लष्कर सर्व साधनसामुग्रीसह अगदी आणीबाणीच्या वेळीं येऊन पोचलें.

## हिंदुसमाजाची धारणाशक्ति

**आज शतकेंच्या शतकें आम्हा हिंदु लोकांवर हल्ले होत आहेत. पण हिंदु लोक नाना संकटांना तोंड देऊन वर येतात. भोपळा पाण्यांत कितीहि दाबला तरी जसा वर उसळी मारतोच तशांतलाच हा प्रकार आहे. याचें कारण आमच्या अंगीं टिकून रहाण्याची शक्ति आहे. ज्या दिल्ली शहरांत मुसलमानांचें राज्य इतकी शतकें होते तेथें देखील आज शेंकडा पाऊणशें हिंदू आहेत. ही स्थिति काय दर्शविते ?** अत्याचार झाला तरी हिंदु त्याला तोंड देईल व आपलें स्वत्व टिकवून धरील !

## हिंदुस्थान हिंदूंचाच

आज मुसलमानांच्या भरमसाट मागण्या पुढें येत आहेत. जर्मनींत ज्यू अल्पसंख्य आहेत त्यांनीं राखीव व जादा जागा मागितल्या नाहींत. इंग्लंडमध्येंहि मुसलमान आहेत म्हणून जर त्यांनीं इंग्लंडच्या निशाणावर एका कोपऱ्यांत आमचा चांद असला पाहिजे, पार्लमेंटांत निदान ब्रिटिश रेडियोवर दरमहा दोन भाषणें तरी उर्दूत झाली पाहिजेत, अशा मागण्या केल्या तर त्यांची काय गत होईल हें ते जाणून आहेत. पण हिंदुस्थानांत मात्र ते तोंडास येईल तें मागत सुटले आहेत. त्यांनीं हें लक्षांत ठेवून असावें कीं, हिंदु हें राष्ट्र ( Nation ) आहे. कारण ते बहुसंख्य आहेत. मुसलमान व ख्रिश्चन हे दोन जातीय गट ( Communities ) आहेत इतकेंच. **हा देश हिंदूंचा आहे व त्याचें भवितव्य हिंदूंच्याच हातीं राहणार. मग कोणी कितीहि व कसलीहि ओरड करो.**

दादर, १ मे १९४०

# हिंदुस्थानांत अराजकता माजली तर?

" हैद्राबाद " या मथळ्याखालीं गांधीजींनी ता. १३ ऑक्टोबर १९४० च्या ' हरिजन ' मध्ये एक लेख लिहिला आहे. खऱ्या अथवा कल्पित अशा कोणा एका पृच्छकाला ' ब्रिटिश सरकारने आपल्याकडे घेतलेल्या वऱ्हाड, उत्तर सरकार वगैरे प्रांतांवर निजामाचा अधिकार काय पोंचतो ? ' यासंबंधी आपले विचार गांधीजींनी कळविले आहेत. वस्तुतः या लेखाकडे विशेष लक्ष जाण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. परंतु यांतील लिखाणामुळें मुसलमान समाजाला पाकिस्तान चळवळीसंबंधीं जी अधिक चेतना दिली गेली आहे, नि त्याचा जो हिंदूंना त्रासदायक परिणाम त्या समाजावर निश्चितपणें होणार आहे, त्याकडे हिंदु समाजाचें लक्ष वेधविणें व या खोडसाळ लिखाणाचा निषेध करणें, हें आवश्यक नि क्रमप्राप्त आहे.

मुसलमानांनीं अधिकतर आत्मविश्वासाने आपली पाकिस्तानची चळवळ जोरावत न्यावी आणि योग्य त्या क्षणीं जर करता त्या समाजाने हिंदुस्थानांत इस्लामी साम्राज्य स्थापण्याची उचल केली तर तो प्रयत्न यशस्वी होण्याची बहुतांशीं शक्यता आहे; एवढेंच नव्हे तर त्या कृत्याचें नैतिक नि राजकीयदृष्ट्या आपण समर्थनच करीत राहूं, असा गांधींच्या या उपरोल्लिखित लिखाणावरून आधीच धर्मवेड्या असलेल्या मुसलमानांचा दृढ समज होईल; आणि त्या लेखाच्या एकंदर सुरावरून तो त्याच सद्धेतूने (?) लिहिला असावा असें स्वच्छ दिसतें.

## तोच तो घातकी डाव

१९१४ त अँग्लो-जर्मन युद्धाच्या कालांत याच गांधींनी मुसलमानी पुढाऱ्यांच्या वतीने अफगाणिस्तानच्या अमीर अमानुल्लाला हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठी पाचारण करण्याचा घातकी डाव रचिला होता. ही गोष्ट स्वामी श्रद्धानंदासारख्या परम विश्वसनीय नि अधिकारी पुरुषानेच पुराव्यानिशीं सिद्ध केलेली आहे. आणि " केसरी " नि " मराठा " या पत्रांत उताऱ्यांमागून उतारे देऊन **श्री. अ. ज. करंदीकर** यांनी त्याची सत्यता जगाला सप्रमाण पटवून दिली आहे.

गांधीजी नि त्यांचे कॉंग्रेसी भक्तगण यांनी वारंवार असें बोलून दाखविलें कीं, मुसलमानांना जर या भारताचीं शकलें करून त्यांतील कांहींमध्ये निर्भेळ मुसलमानी राज्य निर्मावयाचें झालें तर त्यांना तसें करण्यापासून कोणतीही शक्ति थांबवूं शकणार नाही. याहिपुढे जाऊन हे कॉंग्रेसी देशभक्त पाकिस्तानच्या योजनेला मान तुकवून त्याला ' हिंदी सत्ता ' म्हणून मानावयास सिद्ध आहेत.

याच वेळीं आपल्या सरसीमेवरील टोळीवाल्या भाईबंदांशीं गांधीजींनी गेलीं अनेक वर्षें लगट करण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तोहि अवश्य विचारांत घ्यावा लागेल. मिराबेन, पेरीबेन, भुलाभाई, आसफभाई हे आणि अशा इतर अनेक ' ताई ' नि ' भाई ' गांधींचे विश्वासू वकील म्हणून या पठाणांची मनधरणी करण्यासाठीं तेथे पाठविले जात असतात. कशासाठी, तर त्यांचा हृदयपालट करण्यासाठीं ! ह्या ' ताई ' नि हे ' भाई ' या पठाण-टोळ्यांबद्दल मोठ्या सहानुभूतीने सांगत असतात कीं, या ' देवभीरु ' ( इति गांधी ) लोकांचा आर्थिक नि नैतिक दृष्ट्या कोंडमारा झाल्यामुळेंच केवळ त्यांना तसले ' वैध ' मार्ग आचरावे लागतात. त्यांच्या या बिकट परिस्थितीमुळेच केवळ सीमाप्रांतांतील हिंदु पुरुष नि स्त्रिया यांचे क्रूरपणें खून करणें, त्यांना बळानें धर्मांतर करावयास लावणें, त्यांची लूटमार करून त्यांना पळविणें नि असेच अनेक पाशवी अत्याचार करणें त्यांना भाग पडतें ! गांधीवाद्यांचे पूर्वीचे नि आतांचे हे चाळे लक्षांत घेऊन जर गांधींचा तो ' हरिजन ' मधील लेख वाचला तर कोणाहि स्पष्टदर्शी हिंदु वाचकाला असें दिसून येईल कीं, स्वतः गांधी नि त्यांचे कॉंग्रेसवादी हिंदु अनुयायी गेल्या अँग्लो-जर्मन युद्धांत खेळलेला तोच आत्मघातकी डाव पुनः एकदा खेळण्याच्या प्रयत्नांत आहेत.

## खड्गाची धारच राज्याच्या सीमा ठरविते

ब्रिटिशांच्या दडपणाखालीं पाकिस्तानच्या धर्तीवर एखादी राज्यघटना घडवून त्यांत हिंदूंना चेपून टाकणें, अथवा दैवगतीने ब्रिटिशांना या जागतिक युद्धांत पराजयाचा जीव घेणारा तडाखा बसून त्यांना हिंदुस्थान सोडून जावें लागलें तर येथे सशस्त्र क्रांति माजवून आपलें वर्चस्व स्थापणें, यांपैकीं कोणत्या तरी एका मार्गाने हिंदुस्थानांतील मुसलमान हिंदुस्थानावर इस्लामी सत्ता प्रस्थापूं पाहात आहेत. मुसलमानांनी अगोदरच प्रारंभिलेल्या या घातकी पाकिस्तान

योजनेला साहाय्य करण्यासाठी हेच गांधीवादी केव्हांहि मागेंपुढें पाहाणार नाहींत हेंहि निश्चित समजा.

गांधीजींना प्रश्न विचारणाऱ्या त्या पृच्छकाला जर असें वाटलें असेल कीं निजामचा खालसा झालेल्या प्रदेशावर अधिकार आहे असा शेगांवच्या न्यायालयांत निर्णय लागला म्हणजे लगेच ब्रिटिश सरकार ते प्रांत निजामच्या पदरांत टाकील, तर अशी समजूत असलेला तो मनुष्य अगदींच भाबडा असला पाहिजे. राज्यांच्या सीमा नि अधिकार खड्गाची तिखट धार नि तोफांचे भयानक गोळेच ठरवीत असतात ! परंतु या कशाकडेहि लक्ष न देतां हा मूर्खपणाचा प्रश्न जितक्या गंभीरपणाने विचारला गेला असेल तितक्याच गंभीरपणाने गांधीजीहि यावर चर्चा करीत करीत अखेर निर्णय देते झाले कीं, ' ज्या अर्थी इंग्रजांनी ते प्रांत आपल्याकडे हिसकून घेतले आहेत त्या अर्थी त्यांवरील अधिकार इंग्रजांकडे राहात नाही. '

गांधींचा भारतीय इतिहासाशी परिचय रटफ इतकाच आहे, हें सत्य लक्षांत घेतलें तरी ज्या प्रश्नावर ते लेख लिहितात, त्यासंबंधीं त्यांना एवढें तरी माहीत असलें पाहिजे कीं, इंग्रजांकडे निजामने जे हे प्रदेश दिले ते इंग्रजांनीं विजिगीषु मराठ्यांपासून निजामचें संरक्षण करावें याचा मोबदला म्हणून. मराठ्यांनी खड्यांला निजामचें कंबरडें जवळ जवळ मोडून टाकलें होतें नि त्यामुळें पुण्यांतील पेशव्यांच्या प्रवेशद्वारापाशीं बंदिवान म्हणून उभे राहाण्याची पाळी आपल्या वजिराप्रमाणें आपल्यावरहि येईल हें समजूनच तो इंग्रजांकडे संरक्षणाची याचना करीत होता. याशिवाय बाकीचा प्रदेश इंग्रजांनीं आपल्या तलवारीच्या अधिकारावर जिंकून घेतलेला होता.

## गांधींचे अनृतापेक्षांहि विघातक अर्धसत्य

तथापि, खड्गाचा विजय हा अधिकार म्हणून मानावयासच जर गांधीजी कदाचित् सिद्ध नसतील, तर त्यांनीं इंग्रजांना निजामशहाकडून जिंकून नि करारानें मिळविलेले प्रांत सोडावयास सांगण्याऐवजीं प्रथम निजामालाच उपदेशावयास हवें कीं, तूं आपला सारा प्रदेश सोडून चालता हो; त्याला कारण सरळच आहे नि तें हें कीं, मोगल सम्राटाने तुला आपल्या एका प्रांताचा सुभे-

दार म्हणून नेमला असतां तूं आपल्याच धन्याविरुद्ध सशस्त्र बंड करून त्याचा सारा प्रांतच बळकावून बसला आहेस.

आणि, खड्गानें जिंकलेला अधिकार मानावयाचाच नाहीं असें ठरलें तर निजामच्या हातीं सांप्रत असलेला सारा प्रदेश नि ब्रिटिशांच्या सत्तेखालीं गेलेलेहि प्रांत या सर्वांचाच खरा स्वामी म्हणजे विजयानगरचे महाराज! कारण त्यांचेच वाडवडील त्या राज्याचे न्यायतः धनी होते नि त्यांच्यावरच मुसलमानांची "कणखर मनगटाची टोळधाड आली नि तिने आमच्या पूर्वजांपासून ही भूमि हिसकावून घेतली."

परंतु हा 'अधिकारा'चा प्रश्न बाजूला सारून गांधीजी पुढें लिहितात, "जर मला कोणी न्यायबुद्धीचा विचार करा असें म्हटलें तर मी एवढेंच म्हणूं शकेन कीं, वऱ्हाड, उत्तर सरकार नि कर्नाटक इ. प्रदेशांतील त्या त्या लेकांना त्यांची स्वतःची निवड करावयास लावावी. एवढीच न्यायबुद्धि मी जाणतों." आतां या सूचनेला कोणीच अडथळा करणार नाहीं. परंतु पूर्ण सत्य सांगण्याचा धोका टाळण्यासाठीं काढलेली ही एक पळवाट आहे, हें मात्र विसरतां येणार नाहीं. अशा तऱ्हेच्या प्रकरणांत जनतेची निवड कोणती हें ठरविणें यांतच खरी मख्खी असते.

गांधीजींच्या मनांत खरोखरच जर लोकशाही तत्त्वाला पाठिंबा द्यावयाचा असता, तर त्यांनी आपली ही रडकथा अर्धवटच न सोडतां जनतेची निवड बहुमतानेंच ठरविली पाहिजे असें म्हटलें असतें. परंतु गांधीना हें कटु सत्य माहीत आहे कीं, खालसा प्रदेशांतच काय परंतु प्रत्यक्ष निजामच्या राज्यांतही हिंदूच बहुसंख्यांक असल्यामुळें सार्वजनिक मतनोंदणी करविणें म्हणजे निजामला आपलें संस्थान सोडून सारेंच चंबुगवाळें तेथून हालवावयास सांगण्यासारखें आहे. आणि अर्थातच त्यामुळें मुसलमान गांधींवर रुष्ट होतील हें दिसत होतें. म्हणूनच गांधीजींनीं आपल्या त्या लेखाच्या दुसऱ्या भागांत विशेषतः मुसलमान 'भाईंना'च प्रसन्न करून घेण्याची खटपट केली आहे.

## भारताचें सम्राटपद गांधीजी निजामाला देणार

या कोणा तथाकथित पृच्छकाच्या प्रश्नाला उत्तर देण्यावरच समाधान न पावून गांधीजींनी या लेखांत कशाचा कांहीं संबंध नसता, एक निराळाच मुद्दा

उपस्थित केला आहे. हिंदुस्थानचें भवितव्य कोणकोणत्या मार्गांनी ठरण्याची शक्यता आहे, यासंबंधी बरीचशी राळ उडवून झाल्यानंतर त्यांतून त्यांनी निष्पत्ति काय दाखविली–तर हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता युद्धामुळें उलथून पडली आणि दुसऱ्या कोणाहि अहिंदी जागतिक सत्तेने ब्रिटिशांचें तें स्थान लगेच घेतलें नाहीं, तर हिंदुस्थानांत अर्थातच अंतर्गत अराजकता माजेल. त्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्वांत बलाढ्य असलेली सत्ताच हिन्दुस्थानावर आपलें वर्चस्व स्थापील नि ती सत्ता गांधींच्या मतें दुसरी तिसरी कोणी नसून 'हैद्राबाद' हीच आहे ! ते म्हणतात, "इतर सारे लहानथोर संस्थानिक अखेरीला या निजामाच्या बलाढ्यतम सत्तेला शरण जातील नि निजाम हिंदुस्थानच्या सम्राटपदावर विराजमान होईल !"

पण या वेळीं स्वतः गांधी व कॉंग्रेस यांची भूमिका कोणती राहील ? गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणें "बिचारी कॉंग्रेस जर आपल्या अनत्याचाराच्या ध्येयाशी अव्यभिचारी राहील तर तिचा मृत्यु ठरलेलाच आहे."

आणि यापेक्षा दुसरें कोणतें नशीब अशा ध्येयाशीं एकनिष्ठ असलेल्या संस्थेच्या वांट्याला यावयाचें ! अगदीं बरोबर आहे गांधींचें भविष्य ! स्वतः-संबंधीं 'मी श्रद्धाळू माणूस आहे नि श्रद्धाळू माणसाला जगांत कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं' असें सांगणारे गांधीजीच स्वतः कॉंग्रेसचा भविष्यकाळ अंधारमय आहे हें मान्य करतात ! "चालू परिस्थितीचा विचार करतां आशादायी असें कांहींच दिसत नाहीं." हे त्यांचेच उद्‌गार आहेत.

परंतु कॉंग्रेसचे तीन तेरा वाजले नि अशा प्रकारची अराजकता देशांत उत्पन्न झाली तरी गांधीजी स्वतः स्वस्थ बसतील अशांतला भाग मुळींच नाहीं.

कारण ते म्हणतात, "देशावर ब्रिटिशांचे किंवा कोणाहि परक्याचें सुव्यवस्थित असलेलें राज्य चालण्यापेक्षां मला येथें अराजकता माजलेली अधिक परवडेल. समजा, या देशांतील संस्थानिकांनीं निजामची मांडलिकी पत्करून किंवा निजामाला सरसीमेवरील मुसलमानी टोळ्यांनीं पाठिंबा देऊन जर हिंदुस्थानांत निजामचें राज्य स्थापन होत असेल, तर तसल्या अराजकतेचें मी स्वागत करीन." आणि आपण असे कां करूं, याचें कारण गांधीजी देतात तें नीट लक्षांत घेण्यासारखें आहे– "या देशांतील साऱ्या हिंदु संस्थानिकांना सर-

सीमेवरील टोळ्यांच्या साहाय्यानें आपले मांडलिक बनवून निजाम जर हिंदुस्थानचा सम्राट होत असेल तर तें राज्य शेकडा शंभर टक्के स्वराज्यच आहे, तें 'होमरूल'च होय!"

आणि या सर्वांच्या शेवटीं गांधीजी लिहितात, "पण हें सारें (ॲकॅडमिकल) तात्त्विक आहे!!"

## स्वतंत्र हिंदुस्थानचे सम्राट 'हिज हायनेस दि निझाम' नव्हेत-तर 'हिज मॅजेस्टी दि किंग ऑफ नेपाल' होत

ही गांधीवाद्यांची जशी तात्त्विक चर्चा झाली तसेंच तात्त्विक भविष्यकथन आम्हा हिंदुसंघटकांनाहि करतां येईल. कारण काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेले लक्षावधि हिंदु 'हिंदु तेवढा एक' या तत्त्वानें प्रस्फुरित झाले आहेत हें हिंदुसंघटक विसरत नाहींत. मुसलमानी संस्थानिकांनीं जर एखादें राष्ट्रव्यापी यादवी युद्ध आरंभिलें तर त्याप्रसंगीं हिंदु संस्थानिकांचें रक्त मेलेलेंच राहील असें समजण्याचें कारण नाहीं. प्रमुख हिंदु संस्थानिकांना हें आतां कळून चुकलें आहे कीं, हिंदुत्वाच्या नाशाबरोबरच आपलाही विनाश ठेवलेलाच आहे. हिंदु धर्माचें नि हिंदूंच्या मानाचें संरक्षण करण्याकरितां म्हणून उभ्या असलेल्या हिंदु संस्थानिकांच्या या हिंदु जगांतील राखीव शक्ति, हें एकवटित हिंदु सामर्थ्य आजहि एखादें हैद्राबाद्र किंवा भोपाळ यांना सहज पुरून उरण्यासारखें आहे. एकटे शिंदे एका बाजूला नि निजामाच्या साऱ्या शक्ति एका बाजूला, असें झालें तरी एखाद्या नव्या उदगीरच्या किंवा खड्यांच्या रणांगणावर एकटे शिंदेच निजामाचा खुर्दा उडवितील. जेव्हां उदेपुरापासून कोल्हापुरापावेतोंचे सर्व हिंदु राजे आणि दक्षिणेंतील म्हैसूरपासून कोचीनपर्यंतचे अवघे हिंदु नरेश एकवलानें मुसलमानी आक्रमणावर तुटून पडतील, तेव्हां दक्षिण समुद्रापासुन तहत उत्तरेंतील यमुनेपावेतों मुसलमानी सत्तेचा अंशहि शिल्लक उरणार नाहीं.

## मोगली साम्राज्य स्थापिण्याची कल्पना फोल ठरेल

आतां राहिला प्रश्न सरसीमेवरील टोळ्यांचा नि भारताबाहेरील इस्लामी राज्यांचा. परंतु युरोपीय युद्धाच्या वणव्यांत अफगाणिस्तान, अरबस्तान किंवा

तुर्कस्थान यासारखीं राज्यें जिवंत राहिली तरी पुष्कळ झालें! नादीरशहा नि अहमदशहा यांना जें साधलें नाहीं तें आतां त्यांच्या क्षुद्र वंशजांकडून घडेल ही आशाच सोडा. त्यांनी हिंदुस्थानांत येऊन मोंगली साम्राज्य स्थापण्याचें स्वप्न केव्हांच उराशीं बाळगूं नये. आणि टोळीवाल्यांनी रावी ओलांडण्यापूर्वीच त्यांचा समाचार घ्यायला आमचे शूर शीख समर्थ आहेत!

यखेरीज नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्याचा विचार न करून कोणाचेंच चालणार नाहीं; कारण भारतामध्यें तशा तऱ्हेचें अराजक माजलें तर त्यांतून हिंदूंचें उज्वल भवितव्य निर्मिण्याची शक्ति सहस्रावधि नेपाळी हिंदूंच्या शिस्तींत रोखलेल्या बंदुकांतच वसत आहे. आणि नेपाळच्या हिंदु राजाचें राज्य हें तर गांधींच्या व्याख्येप्रमाणेंहि स्वराज्य आहे, ती स्वायत्तताच आहे! आणि तात्त्विक विवेचन करावयाचें तरी असेंच म्हणतां येईल कीं, भावी भारताचा स्वतंत्र सम्राट हा 'हिज एक्झाल्टेड हायनेस' निजाम नसून 'हिज मॅजेस्टी दि किंग ऑफ नेपाल' हाच असेल.

कोणीहि मुसलमान हिंदस्थानावर राजकीय वर्चस्व प्रस्थापिण्याच्या आकांक्षेनें सरसावला नि त्यानें उत्तर, दक्षिण किंवा सीमाप्रांत यांपैकीं कोठेंहि उठाव करण्याचा यत्न केला तरी त्याला विरोधिण्यासाठीं धर्मसंरक्षक नि हिंदूंच्या सैन्याचे सरसेनापति म्हणून नेपाळनरेश पुढें आल्याखेरीज कदापि रहाणार नाहींत. निदान स्वतःसाठीं तरी नेपाळ सरकार अशा तऱ्हेची हालचाल करून सार्वभौम सत्तासंपादनाची आयती चालून आलेली सुवर्णसंधि कधींहि वायां दवडणार नाहीं. आहे हीच परिस्थिती कायम राहिली तर, गुरख्यांच्या पलटणी पूर्वेकडे बिहार, बंगालपासून आसामकडे नि पश्चिमेकडे सिंधुपर्यंत सहज चालून जाऊं शकतील. या अखिल हिंदुस्थानांतील लक्षावधि हिंदु संघटकांचा पाठिंबा असणाऱ्या अद्यावत् संघटनेच्या स्वतंत्र नेपाळी सैनिकांचा लोंढा थोपवून धरण्यास मि. हक यांचे नवखाली गुंड किंवा खांद्यावर नुसते फावडेच टाकून भटकणारे खाकसार असमर्थ आहेत. खवळलेल्या महासागराच्या तुफानी लाटा वाळूचा ढीग कधीं परतवूं शकतो काय?

नेपाळच्या स्वतंत्र राज्याचें महत्व हिंदुस्थानांत किती मोठें आहे, यासंबंधीं पर्सिव्हल लँडनसारखा इतिहासकार काय लिहितो हें निदान हिंदूंना तरी अवश्य माहीत पाहिजे. तो म्हणतो:

The fact is that the communal strife from one end of *India to the other invests Nepal with* an importance that it would be foolish to overlook. Englishmen should attempt to understand the high position which Nepal holds in the Southern Asiatic balance and the great and growing importance which she will possess in the future in the solution of the problems which beset the present state of India. Nepal stands today on the threshold of a new life. Her future calls her in one direction and one only It is not impossible that Nepal may even be called upon to control the destiny of India itself.

### आणि स्वतंत्र हिंदु साम्राज्याचें हें स्वप्न लवकरच प्रत्यक्षांत दिसेल !

पण आम्हीही पुनः सांगतो कीं, हें सारें तात्त्विक आहे. तथापि, जर हिंदूंनी हिंदी मुसलमानांच्या मानाने त्यांच्या हातीं केवढें सामर्थ्य एकत्रित होण्याची शक्यता आहे हें पॅन-हिंदु या दृष्टिकोणांतून निरीक्षिलें नि तीं सारीं केंद्रे वेळींच हातीं घेतलीं तर आजचीच ही तात्त्विक चर्चा मूर्तिमंत प्रत्यक्षांत निर्माण होऊं शकेल. संघटित, बलाढ्य नि स्वतंत्र हिंदु साम्राज्याचें हें स्वप्न हिंदु कल्पना करावयासहि धजणार नाहींत, इतक्या अल्पावधींत खरें झालेलें दिसेल !

---

'मराठा' दिवाळी अंक

# हिंदु राष्ट्राच्या उज्वल भवितव्याचें स्फूर्तिदायक गान

' राष्ट्र स्वतंत्रता ध्येयम् '
' यथा साध्यंच साधनम् '
' अभ्युत्थानाय हिंदूनाम् '

हीं लोकमान्यांची तीन सूत्रें होतीं. लोकमान्यांची शिकवण म्हणजे त्यांनी तेव्हां जें सांगितलें त्याचप्रमाणें अगदीं तसेंच आपण आतां करणेंही नव्हे. लोकमान्यांनीं उच्चारलेला प्रत्येक शब्द न् शब्द आज आचरणांत आणतां येणें शक्य नाहीं आणि तें इष्टहि नाहीं. मनुस्मृति ही आम्हांला कितीहि जरी पूज्य असली तरी त्यांतील प्रत्येक श्लोकाचें बंधन आम्हांला त्रिकालाबाधित राहिलेंच पाहिजे असें नाहीं. आपणाला देशकाल परिस्थितीप्रमाणें आचारविचारांत फरक करावा लागतो व हीच गोष्ट राजकीय आचारासहि लागू आहे.

लोकमान्यांच्या व आजच्या राजकीय परिस्थितींत फार अंतर पडलें आहे. त्यावेळीं होमरूल हा शब्द उच्चारणें देखील गुन्हा होता म्हणून तेव्हां लोकमान्य असें म्हणत " आम्हांला इंग्रजांविषयीं प्रेम आहे पण, येथील पद्धत वाईट आहे "

आजहि आपण तसेंच म्हणूं लागलों तर, त्यामुळें लोकमान्यांच्या आत्म्याला शांति मिळणार नाहीं. त्याचा अर्थ

## लोकमान्यांची शिकवण

आपल्याला समजली नाहीं असा होईल. परिस्थितीप्रमाणें नवे डाव हे काढावेच लागतात. आपणांला जें स्वराज्य मिळवायचें आहे तें हिंदु राहून व हिंदु म्हणवूनच मिळवायचें आहे. माझ्या हिंदु शब्दाबद्दल कित्येकांना विषाद वाटतो;

पण, त्याला इलाच नाहीं. मला भूक कां लागते याला शास्त्रीय कारणें असोत वा नसोत; पण भूक लागते म्हणजे लागते. लहान अर्भकाला भूक लागते त्याला भूक काय हें समजत नाहीं, त्या वयांत आईच्या अंगावर जें दूध तें बालक पितें त्या दुधालादेखील दूध म्हणून तें ओळखत नाहीं. पण, त्याला भूक लागते आणि त्या दुधानें त्याचें समाधान होतें; त्याचप्रमाणें

**मला हिंदु म्हणवून घ्यावेसें वाटतें म्हणून मी हिंदु आहे.**

तुमच्यातल्या ज्यांना हिंदु म्हणून रहाण्याची इच्छा आहे, ज्यांना हिंदुस्थानचें स्वातंत्र्य म्हणजेच हिंदूंचें स्वातंत्र्य असें वाटत असेल त्यांनीं आतां मी जें बोलणार आहें त्याचा

**खोलवर विचार करून कार्यास लागावें.**

तुमच्यातल्या ज्यांना हिंदु म्हणून राहिलों काय किंवा नाहीं राहिलों काय किंवा ज्यांना हिंदु म्हणून रहाणेंच नको असें वाटत असेल अशा अहिंदूंनीं

**आमचे म्हणणें तरी काय आहे**
**हें समजून घेण्याच्या दृष्टीनें**

माझें भाषण ऐकावें.

गेल्या वर्षाच्या देशाच्या राजकीय परिस्थितींत गांधीजी, बाबूजी आणि भाईजी असे तीन पक्ष उत्पन्न झाले आहेत. गांधीजी म्हणजे गांधीवाद, बाबूजी म्हणजे सुभाषबाबूंचा फॉरवर्ड ब्लॉक व भाईजी म्हणजे रॉय. या तिघांचा उल्लेख हा व्यक्तिवाचक नसून तत्त्वनिदर्शक आहे हें लक्षांत ठेवा. त्यांच्यावर मी टीका करतों तेव्हां ती

**व्यक्तींवरील टीका नसून तत्त्वावरील टीका आहे**

हें स्पष्ट करून सांगितलेलें बरें. गांधी, सुभाष व रॉय हे देशभक्त आहेत व त्यांच्याबद्दल मला आदर आहे. प्रथमच सांगितलेल्या

**टिळकांच्या सूक्तीप्रमाणें**

तुमच्यांतल्या ज्यांना हिंदु म्हणून रहावें असें वाटतें त्यांनीं टिळकांच्या तीन तत्त्वांच्या कसोटीवर या पक्षांना लावून पहावें व यांतल्या कोठल्या पक्षांत आपल्याला शिरतां येईल, का यांतला कोठलाच पक्ष आपल्याला घेतां येणार नाहीं, हें ठरवावें.

या पक्षांतला पहिला पक्ष म्हणजे गांधीवाद. या पक्षाशीं आमचें मुळींच जुळणार नाहीं. गांधीवादाचें मुख्य तत्त्व अहिंसा; पण, हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, शस्त्राचार म्हणजे हिंसा नव्हे. All force is not violence, force aggressive only is violence.

> आमचें हिंदु तत्त्वज्ञान फार प्राचीन काळापासून गीतेपर्यंत हेंच सांगत आलें आहे कीं, शस्त्राचार हा सदाचार किंवा दुराचार असूं शकेल.

सत्कारणासाठीं केलेला शस्त्राचार हा सदाचार आहे, आणि दुराचरणासाठीं केलेला शस्त्राचार हा दुराचार आहे; आणि या गोष्टींच्यासाठीं रामकृष्णांपासून शिवाजीपर्यंतच्या काळांतील अनेक दाखले देतां येतील. म्हणून या मूलभूत तत्त्वांतच गांधीवादाचं व आपलें जमण्याजोगें नाहीं.

## गांधीवादाचें दुसरें तत्त्व सत्य.

सत्य म्हणजे जसें आहे तसें बोल. यथास्थित तें सत्य; पण, त्यांच्या या सत्याच्या व्याख्यांना तर सीमाच नाहीं.

पृथ्वीसिंहासारखा १५–२० वर्षें ब्रिटिशांच्या हातावर तुरी देणारा क्रांतिकारक भेटीस आला असतां मॅजिस्ट्रेटला दूरध्वनि करून त्याला त्याच्या स्वाधीन करणें हें सत्यच, आणि व्हाईसरॉयांच्या बंगल्यावर वाटाघाटी करून आल्यावर वृत्तपत्रप्रतिनिधींना ‘ कांहीं नाहीं आम्हीं वायुमानाच्या गोष्टी केल्या ’ हें सांगणेंहि सत्यच.

शूर शीख क्रांतिकारक थोर मनुष्य म्हणून विचारावयास आले असतांना

## सत्याची व्याख्या शौर्य हीच करण्यांत येऊन

तुम्ही खरे शूर असाल तर पोलिसांच्या स्वाधीन व्हा, म्हणून गांधींनीं काहीं शीखांना सांगितलें आणि त्यांना वाटलें खरेंच, निसटून जाण्यांत आपण भ्याडपणा करीत होतों व ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. त्यांना २०–२० वर्षांच्या शिक्षा होऊन ते अंदमानांत येऊन गांधींना दोष देऊं लागले. मी त्यांना सांगितलें, यांत गांधींचा दोष नाहीं. तेव्हां गांधींना तें सत्य वाटलें आज त्यांना दुसरें कांहीं सत्य वाटेल आणि आज तसें घडत आहे.

चरखा हें सत्य, आश्रमांत घडलेल्या गोष्टी लपवून ठेवणें, हेंहि सत्यच; आणि मौन धरून नैसर्गिक साधनांनीं न बोलतां कृत्रिम साधनांनी बोलणें हेंहि सत्यच. आपल्या सत्याच्या व्याख्येशीं ही व्याख्या जमण्याजोगी आहे कीं नाहीं हें आपणच पहा. न्याय्य सत्यापेक्षां गांधींच्या सत्यांत नेहमीं सत्यापलापच असतो.

त्यांचें जें निशाण आहे त्या

## निशाणावर चरख्याचें चिन्ह

आहे. आमच्या म्हणून असणाऱ्या ध्वजावर चरख्याचें चिन्ह असायला, हिंदुस्थान काय कोष्ट्यांचा देश आहे ?

आजचें हें यंत्रयुग आहे. ह्या युगांत आम्हीं एका गिरणीला चार गिरण्यांनीं तोंड देऊं इच्छितों, तोफेला तोफेनें, विमानाला विमानानें, यंत्राला यंत्रानें तोंड देण्याचें आजचें युग आहे ! या युगांत हे आम्हाला मागें नेऊं इच्छितात. शत्रु आगगाडीनें चालला तर आम्ही बैलगाडींतून जावें, त्यांनीं विमान काढलें तर रेल्वेच्यांच्या गाडींतून जायचें काय ?

चरख्यानें दिग्दर्शित होणाऱ्या या प्रतिगामी आर्थिक कार्यक्रमालाहि आपल्याला मान्यता देतां येणार नाहीं.

देशांतला दुसरा पक्ष सुभाषबाबूंचा. त्यांचा आपण नुकताच महाराष्ट्रांत गौरव केलातच. त्यांत माझाहि भाग होताच; या पक्षाशीं आमचें दोन बाबतींत जुळत आहे. तें म्हणजे ‘ स्वातंत्र्य ’ व ‘ यथा साध्यंच साधनम् ’ या सूत्रांबाबत; पण.

या पक्षांत गेल्यानें हिंदूंचें स्वातंत्र्य, हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य, हिंदूंचा अभ्युदय साधेल काय ?

गांधीजी जीनांच्या दाराशींच जाऊन परत आले. पण, बाबूजीनीं जीनांच्या खोलींत जाऊन वाटाघाटी केल्या आहेत व त्यांत त्यांनीं गांधींनीं मुसलमानांना देऊं केलेल्या गोष्टींपेक्षांहि जास्त गोष्टी देण्याची तयारी दर्शविली असली पाहिजे.

He went to outbid Gandhiji. सुभाषबाबू जीनांना जें द्यायला तयार झाले तें हिंदूंच्याच खिशांतून ना ? आम्ही हिंदु म्हणून आमच्यासाठीं कांहीहि जास्त मागत नसून न्याय्य तेंच मागत आहों व आम्ही आमच्या खिशांतून कोणालाहि अवास्तव देण्यास तयार नाहीं.

तेव्हां हिंदुत्वाच्या दृष्टीनें गांधींपेक्षांहि सुभाषांचा पक्ष जास्त अस्वीकार्य आहे.

सुभाषबाबूंच राष्ट्रसभेचे अध्यक्ष असतांनाच हिंदुमहासभेचे सभासद होण्यास बंदी झाली. ते मुंबईत आले असतांना फॉरवर्ड ब्लॉक–परिषदेस हजर रहाण्याबद्दल मला बोलावणें आलें होतें. मी कळविलें कीं,

फॉरवर्ड ब्लॉकचे सभासद होण्यास कॉंग्रेस–सभासदत्वाची अट नसावी व होणाऱ्या स्वातंत्र्यांत दर डोई एक मत या गोष्टी कबूल असतील तर, मी यायला तयार आहे, पण त्या गोष्टी मान्य झाल्या नाहींत.

तिसरा पक्ष भाई मानवेंद्रनाथ रॉय यांचा. पहिल्या दोन सूत्रांच्या बाबतींत याहि पक्षाशीं आमचें जमत आहे. माझ्यापासून रॉय यांना स्फूर्ति झाली असें ते स्वतः सांगतात. रॉय यांचा आर्थिक कार्यक्रम आम्हांला पुष्कळसा मान्य आहे व हिंदुमहासभेतर्फे लवकरच तयार होणाऱ्या

**हिंदुमहासभेच्या आर्थिक कार्यक्रमांत**

त्याचा योग्य तो समावेश होईल.

त्यांनीं मुसलमानी धर्माबद्दल एक पुस्तक लिहिलें असून, त्यांत अशी ग्वाही दिली आहे कीं, 'मी मुसलमानी ग्रंथ वाचले असून, मी सांगतों हें सत्य आहे.' त्यांनीं या ग्रंथांत मुसलमानधर्म सर्व मानवांना बंधुभावानें वागविणारा, समानता देणारा आहे असें सांगितलें आहे व मुसलमानी धर्माचा प्रसार शस्त्रानें केव्हांहि झाला नाहीं, असें प्रमेय ऐतिहासिक सत्य म्हणून त्यांनीं मांडलें आहे. मीहि कांहीं वाचलेलें आहे.

मुसलमानी धर्म बंधुभावानें वागविणारा आहे! पण कोणाला? मुसलमानी धर्म मुसलमानांना बंधुभावानें वागविणारा, मुसलमानांना समानतेनें वागविणारा आहे, मुसलमान नाहींत त्यांना नाहीं. त्यांच्या ग्रंथांत मुसलमानी जगत् व बिनमुसलमानी जगत् असे दोन भाग पाडलेले आहेत.

बिनमुसलमानी जगताला ते तरवारीचें जगत्, म्हणजे ज्यांची गांठ तरवारीनेंच घ्यावी असें जगत्–शत्रूंचें जगत् म्हणून मानतात.

मी सांगतों हें खरें आहे व मुसलमानी धर्मांतहि असेंच सांगितलेलें आहे. मला हें सांगतांना ऐकून आतां जर येथें एखादा मौलवी असेल तर तो म्हणेल

'वा रे सावरकर तूं कुराण जाणतोस !' व तो मी कदाचित् मुसलमान होईन म्हणून प्रतीक्षाहि करीत असेल. रॉय यांचें म्हणणें तर मुसलमानांना इतकें द्यावें कीं, आतां काय मागूं याचीच त्यांना पंचाईत पडावी. तेव्हां

हिंदु राष्ट्राच्या दृष्टीनें बोसांपेक्षांहि रॉय यांचा पक्ष आपणाला मुळींच स्वीकारतां येणार नाहीं.

याच दृष्टीनें गांधींपेक्षा बोस वाईट व बोसांपेक्षांहि रॉय वाईट.

जवाहर, हे बाहेरदेशीं जातात तेव्हां हिंदी प्रतिनिधी म्हणून बोलतात. तुम्हांला जर सर्वच मानव जात सारखी तर मग उठून ॲबिसिनियांत कां हो कार्याला जात नाहीं? तेथली जनताहि अशीच गुलामगिरींत, दारिद्र्यांत पडलेली आहे.

तर्कपद्धतीला ताणून, आरोपीला जसा कायद्याचा जास्तींत जास्त फायदा द्यावा, त्याप्रमाणें त्यांना तर्क पद्धतीचा जास्तींत जास्त फायदा दिला तरी ते या प्रश्नाला काय उत्तर देतील? ते म्हणतील मी येथें जन्मलों म्हणून मला हिंदुस्थानबद्दल जास्त आपलेपणा वाटतो !

## जन्मस्थानावरून राष्ट्रीयत्व ठरण्यासंबंधीं

परवांच माझें एका गृहस्थाशीं बोलणें झालें. ते नागपूरचे गृहस्थ होते.

मीं त्यांना म्हटलें तुम्हीं नागपुरांत जन्मलांत तर तुम्हांला सबंध हिंदुस्थानची आपुलकी कां वाटावी? नागपूर म्हणजे कांहीं हिंदुस्थान नव्हे आणि जन्मस्थानावरून आपुलकीची भावना ठरवावयाची तर, नागपुरांतल्या ज्या घरांत तुमचा जन्म झाला त्या घराबद्दलच नव्हे, त्या घरांतलि ज्या खोलींत कुंची घालूनतुम्ही पाळण्यांत झोंपला होता त्या पाळण्याबद्दलच फक्त तुम्हांला आपुलकी वाटली पाहिजे. तेव्हां आपुलकी ही जन्मस्थानावर नाहीं, ती भाषेवर, आचारावर, संस्कृतीवर निर्माण झालेली असते. येथले लोक माझी भाषा बोलतात, त्यांचे माझे आचार-विचार, संस्कृति सारखी आहे म्हणून आपुलकी वाटते. लहानपणापासून या देहाला जी शिकवण मिळते, ज्या परिस्थितींत तो वाढतो त्या सर्वांचा नकळत परिणाम होऊन ज्या भावना उत्पन्न होतात, ज्या भावना वंशपरंपरा रक्तांत येतात, ज्या रक्तारक्तांत नी हाडाहाडांत सळसळत असतात त्या भावना म्हणजे आपुलकी. एका देशांत राहिल्यानें

एक राष्ट्र होत नाहीं. माझ्या घरांत वाघ, डुक्कर, साप [illegible] म्हणून मी त्यांना भाऊ मानावें काय? दोघांची

## एकी व्हावयाची म्हणजे

दोघांचीहि एकीची इच्छा असली पाहिजे. एकाचीच एकीची इच्छा आहे म्हणून तो जर दुसऱ्याच्या गळ्यास लपेटून बसूं लागला तर, तो दुसरा एक तर त्याला लाथाडून तरी देईल; नाहीं तर, त्याला आपला दास म्हणून बरोबर वागवील. साप चावतो म्हणून त्याला शिव्या देण्यांत अर्थ नाहीं. त्यांत सापाची चूक नाहीं.

एक तर आपण सापाचा दांत तरी पाडला पाहिजे किंवा आपण भिऊन पळून तरी गेलें पाहिजे.

कराचीला मुस्लीम लीगनें उघड उघड दोन फेडरेशन्स करण्याचा ठराव केलेला आहे. तुम्ही स्वतःला राष्ट्रीय म्हणवतां पण, त्या ठरावाचा तुम्हीं निषेध केलेला नाहीं, तो निषेध हिन्दुमहासभेनें केला आहे, आणि तरी ती जातीयच.

ज्याच्या डोक्यावर मुसलमानाची लाठी बसते तो हिंदु अशी हिन्दूची सोपी व्याख्या झाली आहे.

## राष्ट्रीय म्हणविणारी कॉंग्रेस सरकारेंच [illegible] वृत्तीचीं आहेत !

मी हें पुराव्यानिशीं बोलत आहे.

ना. पंत यांनीं खास मुसलमानांकरतां म्हणून उर्दूत पत्रक छापवलें होतें. हें पत्रक हिन्दूत वाटलें जाऊं नये अशी खबरदारी घेण्यांत आली होती. कारण त्यांना निवडून यावयाचें तें हिन्दूंच्या मतांवर व मनधरणी करावयाची ती मुसलमानांची.

हिंदुमहासभेनें हें पत्रक मिळवून त्याच्या हजारों प्रती संयुक्त प्रांतांत वाटून टाकल्या.

या पत्रकांत मुसलमानांना आपलें

## राष्ट्रीयत्व पटवून देतांना

पंत म्हणतातः संयुक्त प्रांतांत १२ टक्के मुसलमान असतांना सरकारी नोकरींत त्यांचें प्रमाण कोठेंहि ३० टक्यांखालीं नाहीं व पोलिस खात्यांत तर ७५ टक्के

त्यांचेंच प्रमाण आहे. पहा, आहों कीं नाहीं आम्ही राष्ट्रीय ! कोठल्याशा गांवीं मुसलमानांनीं मोहरम म्हणून हिंदूंनीं वाद्यें वाजवूं नयेत असा अर्ज केला. आठ दिवसपर्यंत त्या गांवीं आम्हीं हिंदूंना वाद्यबंदी केली. पहा, आहों कीं नाहीं आम्हीं राष्ट्रीय ! एका गांवीं तर लग्नांत बायकांनीं ढोल बडवावयाची चाल आहे. मुसलमानी अर्जावरून त्या बायकांवर ढोल न वाजविण्याबद्दल आम्ही नोटीस बजाविली. पहा, आहों कीं नाहीं आम्ही राष्ट्रीय ? बनारस शहरांत तर मुसलमानांनीं दंगा केला असतांना यांनीं कर्फ्यू ऑर्डर काढून हिंन्दूना ४८ तासपर्यंत घराबाहेर पडण्यास बंदी केली होती आणि मुसलमान लाठ्या घेऊन रस्त्यांत धुमाकूळ घालीत होते.

हें तुमचें राष्ट्रीयत्व ! आणि हिन्दु नोकरांचें प्रमाण आम्हीं काढलें कीं लगेच आम्ही जातीय ठरतों !

१२ टक्के मुसलमानांना ७५ टक्के जागा पोलिसांत आणि ३० टक्के जागा इतरत्र तुम्ही देतां, ह्या कोणाच्या जागा तुम्हीं देतां, हिंदूंच्या हिरावूनच ना, तितक्या हिंदूंना बेकार ठेवूनच ना ?

तुम्ही राष्ट्रीय म्हणवितां तर, मग तुम्ही जातच ओळखतां कामा नये. तुम्ही राष्ट्रीय तर ही मुसलमानांची गणतीच ठेवण्याची काय जरूर होती ? तुम्ही जर राष्ट्रीय असतां तर, बनारसमध्यें हिंदूंवर कर्फ्यू ऑर्डर बजावण्याऐवजीं ती तुम्ही मुसलमान दंगेखोरांवर बजावली असती. तुम्हीं दुबळ राष्ट्रीय असतां तर निदान-पक्षीं ही कर्फ्यू ऑर्डर तुम्ही हिंदु व मुसलमान या दोघांवरही बजावली असतीत. अशीं पुष्कळ उदाहरणें मी देऊं शकेन.

> ही राष्ट्रीयता नव्हे तर ही अत्यंत विकृत अशी जातीयता आहे. या अशा विकृत जातीयतेपेक्षां मी साधी जातीयता पत्करीन. मुसलमानांशीं जर या प्रकारानें एकी व्हावयाची असेल तर आम्हांला अशी संशयास्पद मैत्रीच्या एकीपेक्षां बेकीच जास्त फायदेशीर होईल.

**कोठल्याही पक्षाशीं सहकार्य करावयाचें कीं नाहीं, हें ठरविण्याचें आमचें मुख्य सूत्र हिंदुत्व हेंच आहे.**

त्या दृष्टीनें या तीनहि पक्षांचा आपल्याला उपयोग नाहीं. त्या पक्षांचे जे कार्यक्रम चांगले असतील त्यांत आम्हीं सहकार्य करूं; पण, हिंदुत्व रक्षण्याकरितां म्हणून हिंदुमहासभेची जरूरी आहे व स्वातंत्र्य मिळालें तरी हिंदुसभा ही पुढेंहि कायम रहाणें भाग आहे.

जीना कॉंग्रेसला हिंदुसंस्था म्हणतात म्हणून कॉंग्रेसमध्यें कसे तरी ४ मुसलमान आणण्यांत येतात. बी अम्मा या कॉंग्रेसच्या अध्यक्ष केवळ मुसलमान म्हणूनच नाहीं का झाल्या ? नाहींतर टिळकांच्या पत्नी कॉंग्रेसच्या अध्यक्ष कां होऊं नयेत ?

आज कॉंग्रेसमध्यें असे आणलेले मुसलमान असल्यामुळें तेथें हिंदूंचा प्रश्न हिंदु म्हणून बोलतां येत नाहीं; कारण, आम्हांला जरूर म्हणून आम्ही त्यांना आणले. त्यांना जरूर म्हणून ते आले असते तर कांहींच हरकत नव्हती. पण आतां कॉंग्रेसमधल्या हिंदूंचीं तोंड दाबून बुक्यांचा मार अशी स्थिती झालेली आहे. स्वातंत्र्य मिळालें तरी देखील त्या घटनेंत जे राष्ट्रद्रोही लोक जातील त्यांच्यावर नजर ठेवायला आमचे विश्वासाचे लोक हवेत. मुसलमानांच्या डोक्यांत अजून पाकिस्थानची कल्पना घोळत आहे व हिंदुमहासभेचे लोक नसतील तर झेकोस्लोव्हाकियाच्या जर्मन नागरिकांनीं जी गोष्ट केली तशी गोष्ट घडण्याचा संभव आहे.

तुम्हांला हिंदुध्वजाखालींच असलेलें असें हिंदुराष्ट्र स्थापावयाचें आहे काय असें कोणी मला विचारतील.

होय !

गटेच्या काळीं प्रशियाचे तुकडे तुकडे होऊन प्रशियाच्या राजवाड्यांत गादीवर नेपोलियन बसला होता. तेव्हां गटेनें कविता केली कीं :—

या सिंहासनावर माझा राजा परत बसलेला पाहीपर्यंत व हा परका राजा जाईपर्यंत मी असाच भीक मागत हिंडेन.

गटेची ती वल्गना—

आज चार पांच पिढ्यानंतर सत्य ठरली आहे.

आज हिटलरच्या नेतृत्वाखालीं सारें जर्मन राष्ट्र, सारे जर्मन लोक, एका निशाणाखालीं एकत्र झालेले आहेत.

वटवृक्षाचें बीज मोहरीहूनहि लहान असतें; पण, त्या बीजांत जी स्फूर्ति असते जी वल्गना असते ती वाढतां वाढतां तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्याखालीं गाईचीं खिल्लारें विसावा घेतात, उन्हानें श्रांत झालेल्यांना तो वटवृक्ष सांवली देतो.

मलाही एक वल्गना करूं द्या ! माझें गाणें मला गाऊं द्या !

या जगांत आपणाला जर हिंदुत्वाचें मानाचें राष्ट्र म्हणून जगावयाचें असेल तर, तसा आपला अधिकार आहे आणि तें राष्ट्र हिंदुध्वजाखालींच स्थापन झालें पाहिजे. या नाहीं तरी पुढल्या पिढीत ही वल्गना खरी ठरेल.

माझी ही वल्गना खोटी ठरली, तर वेडा ठरेन मी.

माझी ही गल्गना खरी ठरली तर मी प्रॉफेट ठरेन.

माझा हा वारसा मी तुम्हाला देत आहे.

पुणें, ऑगस्ट १९३९

---


## —: रंगभूषा :—

## MAKE - UP

※ फिल्म कंपन्या

※ नाटक कंपन्या

※ अमॅच्युअर्स व इतर उत्सवाचे प्रसंगीं होणाऱ्या नाटकांकरितां लागणारे रंग, पावडर्स व इतर रंगभूषेचें सामान.

तयार करणार : **मेक—अप् सर्व्हीस,**

पोर्तुगीज चर्च नाका, मुंबई ४.

# तामीळनाड हिंदु परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें भाषण

मी या प्रांतांत जेव्हां पहिल्याने आलो तेव्हां मला असा प्रश्न विचारण्यांत आला कीं, दक्षिण हिंदुस्थानामध्यें हिंदूंवर कोणत्याहि तऱ्हेचें आक्रमण होत नाहीं; मग हिंदुसभेची येथें आवश्यकता काय? हा प्रश्न मुसलमान नि ख्रिश्चन विचारत नाहींत; तर आमच्या हिंदुमधीलच कांहीं, विशेषतः कॉंग्रेसवादी विचारीत असतात. हा प्रश्न बरोबर आहे असें तात्पुरतें गृहीत धरून मी उत्तर देतो. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदूंवर जसें आक्रमण होतें तसें येथें होत नाहीं असें म्हणण्यांत ते उत्तर हिंदुस्थानांतील हिंदूंवरील आक्रमणाची जाणीव ठेवतात, इतकेंच नव्हे तर अप्रत्यक्ष रितीनें हिंदुसभेच्या स्थापनेचें महत्त्व उत्तर हिंदुस्थानापुरतें कां होईना कबूल करतात. जे वरील प्रश्न विचारतात ते कधीं पायाला बोंचलें तर डोक्याला कां वेदना होतात याचें उत्तर देतील काय? ज्याप्रमाणें हें शरीराचें त्याप्रमाणेंच हिंदुसमाजाचें आहे. जर जगाच्या कोणत्याहि भागांत हिंदूंवर हल्ले झाले तर दुसऱ्या भागांत ताबडतोब कळ उठलीच पाहिजे. उत्तर हिंदुस्थानांतच काय पण उत्तर ध्रुवावर जरी हिंदूंचा छळ होऊं लागला तरी दक्षिण हिंदुस्थानांतूनच नव्हे तर दक्षिण ध्रुवावरसुद्धां सहानुभूतीची संवेदना निर्माण झाली पाहिजे. जालियनवाला बागेंत अत्याचार झाल्याबरोबर तुम्हीं दक्षिण हिंदुस्थानांतील लोक जालियनवालाबाग दिन पाळतांच कीं नाहीं? तुमची सहानुभूतीची संवेदना—फक्त उत्तर हिंदुस्थान पुरतीच मर्यादित राहिली नाहीं. तुम्हाला तुर्कस्थानची कींव आली. स्पेनमध्यें कोणी परकी राष्ट्र आक्रमण करीत नव्हतें. राष्ट्रांतलेच दोन पक्ष आपापसांत लढत होते. परंतु तुम्ही त्यांतल्यात्यांत जो दलितांचा पक्ष वाटला त्याला तेथें धान्याच्या बोटी भरून पाठविल्यात. चीनवर आक्रमण झाल्याबरोबर थोड्याशा डॉक्टरांना त्यांच्या मदतीला पाठविलेत, तेव्हां हे दयाळू आत्म्यांनों, आपल्या उदार हृदयाला जर या गोष्टी करणें आवडते तर त्यांतल्या सहानुभूतीचा अल्पांश तरी हिंदूंकरितां कां राखून ठेवीत नाहीं?

## सिंधमधील अत्याचार

सिंधमध्यें काय चाललें आहे पहा ! या गोष्टी मी माझ्या पदरच्या सांगत नाहीं. किंवा तुमच्या भावना क्षोभ पावाव्यात म्हणून तिखटमीठ लावीत नाही. तर सत्य आणि जें अल्लाबक्षासारख्या मुसलमान मुख्य प्रधानाच्या तोंडून निघालें आहे तेवढेंच सत्य मी येथें सांगतो. दहा हिंदु पेट्रोल ओतून जाळण्यांत आले. १५० हिंदूंचे मुडदे पाडण्यांत आले. लाखो लोकांची मालमत्ता लुटण्यांत आली. तुम्ही आज जर हा उत्तर हिंदुस्थानचा प्रश्न आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष केलें तर आणखी शंभर अथवा दीडशें वर्षांनी मद्रासवरहि तीच पाळी आल्यावांचून राहणार नाही. 'मला काय त्याचें ' ही मनोवृत्ती आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली आहे. मुसलमानांनी सिंधवर स्वारी केली, पंजाबवर हल्ले केले, विंध्य पर्वत ओलांडला तरी आपण गप्प बसलों आणि आजहि उत्तरेंतील हिंदु व दक्षिणेंतील हिंदु असा भेद माजवीत बसलों तर पुनः मागच्या इतिहासाची पुनरावृत्ति झाल्याशिवाय रहाणार नाही. शेजाऱ्याचें घर जळत असलें तर आपण तें शेजाऱ्याचें म्हणून कधी गप्प बसतों कां ? तीच गोष्ट हिंदुधर्माची. आपण जर ही गोष्ट चांगल्या रीतीने ओळखली तर आपलें आस्तित्व कधींहि नाहीसें होणार नाही. एका भागाला इजा झाली तर सर्व जीव कळवळतो. आपलेंहि तसेंच झालें पाहिजे. आपल्या दाराशीं संकट येईपर्यंत आपण गप्प राहून चालणार नाही. ही चूक आपण वेळींच ओळखली असती तर आपली आज शक्तिमान साम्राज्यें दिसलीं असती आणि अल्पसंख्यांकाचा प्रश्न कधीहि उपस्थित झाला नसता.

## हिंदुस्थान हिंदूंचाच

हिंदु नसेल तर हिंदुस्थानची काय किंमत ? इंग्रज नसतील तर इंग्लंडची काय किंमत ? जर्मन नसतील तर जर्मनीची काय किंमत ? इंग्लंडमध्यें अल्पसंख्यांक आहेत म्हणून कोणीही इंग्लंडचे तुकडे करण्याची मागणी करीत नाहीं. जर्मनीमध्यें जर्मन बहुसंख्यांक आहेत व ज्यू अल्पसंख्यांक आहेत म्हणून ज्यू कांहीं अल्पसंख्यांकांच्या हक्कांची मागणी करूं शकत नाहींत. आणि जर एखादवेळीं तो प्रश्न उपस्थित करण्यांत आला तर तो कसा सोडवण्यांत येतो हें तुम्हांला माहीत आहेच. आमच्या अंगांत तशी शक्ती आली तर मग आम्हीहि अल्पसंख्या-

कांच्या प्रश्नाच्या भ्रमाचा भोंपळा सहज फोडूं. हिंदूंची प्रचंड बहुसंख्या ज्या अर्थी येथें आहे त्या अर्थी हें राष्ट्र हें हिंदुराष्ट्रच–हिंदुस्थानच–रहाणार.

मोपल्यांचें बंड मलबारमध्यें दक्षिण हिंदुस्थानांतच झालें. नुकताच गेल्या वर्षी भागानगर निःशस्त्र प्रतिकार चालू होता. त्या भागानगरशीं–हैद्राबादेशीं–तुमचा संबंध नव्हता काय ? आंध्र प्रांताचा एक भाग या हैद्राबाद संस्थानांतच आहे. पंजाब, बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रांतांतून १५००० निःशस्त्रप्रतिकारकांनीं या संग्रामांत भाग घेतला. तो 'हिंदु तेवढा एक' या भावनेनेंच नाहीं काय ?

## एकी कोणाची होते ?

एकीच्या गोष्टी सांगण्यांत येतात, खुनी नि खुनाला पडलेला बळी यांची कधीं एकी होऊं शकते काय ? चोर जर न्यायाधिशाला म्हणूं लागला कीं, ' हं मला शिक्षा देऊं नका, त्यामुळें राष्ट्रिय एकी बिघडेल, राष्ट्राला स्वराज्य पाहिजे. म्हणून मी चोरी केली असली तरी तुम्ही मला शिक्षा देऊन एकी बिघडवतां कामा नये. जर शिक्षा दिलीत तर माझें आणि या फिर्यादीचें वांकडें येईल व राष्ट्रीय एकी होणार नाहीं.' तर तुम्ही त्या चोराला मोकळा सोडूं इच्छाल काय ?

## निजामाला स्वातंत्र्य हवें

नुकतीच हैद्राबादमध्यें हजारों मुसलमानांची जाहीर सभा भरली. निजामाला ' हिज एक्झाल्टेड हायनेस ' म्हणण्याचे ऐवजीं ' हिज मॅजेस्टी ' म्हणावें असा एक ठराव पास झाला. खाकसारांचे पुढारी नबाब यारजंग बहादूर या सभेचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपणांस इंद्र म्हणवून घेतलें तरी मला त्यांत कांहींच वाटणार नाहीं. नुसतें म्हणविण्यांत काय आहे ! या म्हणण्यांत मूर्खपणा असो वा गांभीर्य असो, मुसलमानांची मनोवृत्ति मात्र त्यावरून कळून येते. या मागणीचे मागें कोणत्या गोष्टी दडलेल्या आहेत त्या पहा. निजामला 'हिज मॅजेस्टी' ही पदवी मिळाली म्हणजे तो स्वतंत्र होईल. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र झालें म्हणजे त्याचें स्वातंत्र्य अबाधित राहण्याकरितां त्याला बंदर पाहिजे आणि तें बंदर म्हणजे मद्रास अगर मच्छलीपट्टण. पुन्हां त्या बंदराला जाण्याकरितां कॉरिडॉर पाहिजे. डँझिग व त्याचा कॉरिडॉर यांचा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर आहेच. तुम्हाला यांची पुनरावृत्ती पाहिजे काय ? त्यांची दुसरी मागणी अशी आहे कीं ज्या अर्थी अर्धा आंध्रप्रांत निजाम हद्दींत आहे त्याअर्थी उरलेला

अर्धा प्रांतहि निजाम हद्दींत सामील करावा. मी म्हणतों की जर अर्धा आंध्र निजामचे बाहेर आहे नि अर्धा निजाम संस्थानांत आहे तर निजामचा अर्धा आंध्र प्रांत काढून बाहेरच्या मद्रास इलाख्याला कां जोडीत नाहीं ?

## परोपदेशे पांडित्य

ज्या म्हैसूरचे मुख्य प्रधान सर मिर्झा इस्माईल यांनी एक संदेश पाठवून तुम्हांला एक उपदेशाचा घुटका पाजला त्या म्हैसूर संस्थानमध्यें ज्या सुधारणा देण्यांत आल्या आहेत त्यांतील आंकडे मी तुम्हांस दाखवितों. तिकडे आपण अवश्य लक्ष पुरवा. टिपू आणि हैदर यांनी राज्य केलें आणि हिंदूंचा छळ केला. तरीसुद्धां हिंदूंची लोकसंख्या तेथे ९३ टक्के आहे. परंतु त्यांना कौन्सिलमध्ये अवघ्या ८१ टक्के जागा मिळालेल्या आहेत ! आणि मुसलमान ६ टक्के असूनसुद्धा त्यांना १० टक्के जागा मिळाल्या आहेत. वरिष्ठ कौन्सिलमध्ये तर हिंदूंना ४१ टक्के व मुसलमानांना १० टक्के जागा आहेत. ही हिंदु संस्थानची गोष्ट झाली. आता निजामची, एका मुसलमान संस्थानची गोष्ट पहा. चांगल्या असोत वा वाईट असोत त्यांनी ज्या सुधारणा दिल्या आहेत—नव्हे ज्या देणें त्यांना भाग पडलें आहे, त्यांचा मसुदा छापतांना सुरुवातीलाच त्यांनी असें स्पष्टपणें घोषित केलें कीं, ज्याअर्थी हें मुसलमानी राज्य आहे त्याअर्थी राज्यकारभारांत मुसलमानांचेंच बहुमत राहणार ! आणि ज्याअर्थी हिंदु मुसलमान यांना मी सारखें मानतो त्याअर्थी हिंदु जरी ९० टक्के असले तरीसुद्धा कौन्सिलमध्ये दोघांनाहि सारखेंच म्हणजे ५० टक्के प्रतिनिधित्व देणार. हिंदूंना बाटवून हिंदु व मुसलमान यांची लोकसंख्या सारखी करून समानता दाखविण्याची घोषणा त्यांनी केली नाहीं याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आता नोकऱ्यांकडे पहा. म्हैसूर संस्थानांत मुसलमानांना सैन्यांत ६५ टक्के नोकऱ्या आहेत. पोलिसमध्यें ५५ टक्के आहेत. आणि इतर नोकऱ्यांत कमींत कमी ५० टक्के मिळाव्यात अशी त्यांची चळवळ चालू आहे. म्हैसूरचे महाराज, हैदरअली या सैन्यांतील एक शिपाई होता हें विसरलेले दिसतात. वास्तविक म्हैसूरच्या महाराजांनी ज्या अर्थी हैदरने आमच्याशीं दगलबाजी केली त्याअर्थी आम्ही तुम्हाला सैन्यांत मुळीच जागा देणार नाही, असें मुसलमानांस सांगावयास पाहिजे होतें.

एखाद्या संस्थानाचा मुख्य प्रधान मुसलमान असला तर लगेच जिना त्याला भेटावयास जातात. मुस्लीम लीगचें अधिवेशन असलें तर शिकंदर हयातखान व फझलूल हक्क त्यांत उघड रीतीने भाग घेतात. ते राजे असोत, प्रधान असोत वा पुढारी असोत, उघड रीतीने भाग घेण्यास त्यांस दिक्कत वाटत नाही. कॉंग्रेसचे हल्लींचे राष्ट्रीय म्हणविणारे मुसलमान अध्यक्ष पहा. ते परवाच्या अध्यक्षीय भाषणांत स्पष्ट म्हणतात कीं, या हिंदुस्थानांत मुसलमानांच्या हितसंबंधांना धक्का लागणार नाही याची काळजी मी घेणार आहे. मुसलमानांना कोणी दुखावणार नाही ना याची चिंता वाहणार आहे. तुमचा एखादा राजा, प्रधान अशी भाषा बोलतांना तुम्हास कधी दिसतो का ?

## स्वतंत्र हिंदुस्थान हें ध्येय

हिंदूंच्या बाबतींत मात्र प्रत्येक गोष्ट उलट झालेली दिसून येईल. हिंदु संस्थांकडे तिरस्कृत रीतीने पाहण्यांत येईल. त्यांना जातीय म्हणून कॉंग्रेसवाल्यांकडून हिणवण्यांत येईल.

कॉंग्रेसवालेहि देशभक्त आहेत. मी त्यांना मान देतों. परंतु त्यांचें धोरण चुकीचें आहे. मी त्याचा निषेध करतो. पण तेवढ्याकरितां त्यांच्याशीं भांडत बसूं नका. हिंदूंनी यापुढें हिंदु म्हणवून घेण्यांत, हिंदुत्वाची वकिली करण्यांत लाज वाटून घेऊं नये. हिंदुस्थान स्वतंत्र झालाच पाहिजे; मात्र तो जसा जॉर्ज व एडवर्ड यांचे हातून सुटला पाहिजे तसाच औरंगजेब नि टिपू यांचेहि हातांत राहतां कामा नये.

‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ’ असा मंत्र लोकमान्यांनी आपणास दिला. आपण तो ऐकला. आता स्वराज्य म्हणजे काय हें पाहिलें पाहिजे. स्वराज्य म्हणजे समानता. या स्वराज्यांत हिंदूना इतरांइतक्याच मानाने नि हक्काने वागविण्यांत आलें पाहिजे. ‘ एक मनुष्य एक मत,’ हाच न्याय अंमलांत आला पाहिजे. तीन हिंदूना एक मत व एका मुसलमानाला तीन मतें असला अन्याय होतां कामा नये !

हिंदुस्थान हा अभंग राहिला पाहिजे. हिमालयाला आग लागली तर दक्षिण महासागराने ती आग विझविण्यास गेलें पाहिजे.

## समानता व लायकी ध्यानीं घ्या

जिनांनी कॉंग्रेस ही हिंदूंची संस्था आहे असें म्हटल्याबरोबर कॉंग्रेसवाल्यांना कोण राग आला ? परंतु त्यांत खोटें काय आहे ? हिंदूंनीच कॉंग्रेस जगविली नी वाढविली. मुसलमानांनीं तिच्या वाढीकरितां कांहींहि कष्ट केलेले नाहींत. आजच पाहा, निवडणुकीला कॉंग्रेसच्या तिकिटावर उभा राहिलेला मुसलमान पडतो व लीगच्या तिकिटावर उभा राहिलेला हटकून निवडून येतो. मुसलमानांची कॉंग्रेसबद्दल ही भावना आहे.

जर कॉंग्रेसला खरी राष्ट्रीय संस्था व्हावयाचें असेल तर तिनें आजपर्यंत अवलंबिलेलें चुकीचें धोरण सोडून खरें राष्ट्रीय धोरण स्वीकारावें. निवडणुकींत एक मनुष्य एक मत ही घोषणा करावी. कोणी नोकरी मागण्यास आला तर त्याला तुझी लायकी काय हा प्रश्न विचारावा. जर तो बी. ए. असेल तर त्याला बी. ए. लायकी लागणारी नोकरी द्यावी. पण जर एखादा मुसलमान म्हणूं लागला कीं, मी मुसलमान आहे म्हणून मला नोकरी दिली पाहिजे, तर तुला या राज्यांत केवळ मुसलमान म्हणून नोकरी मिळणें शक्य नाहीं असें सांगावें.

## हा पाहा पक्षपात

बंगालमध्यें मुसलमान फक्त शेंकडा ५० असून त्यांना कायद्यानें शेंकडा साठ नोकऱ्या राखून ठेवल्या गेल्या आहेत. बुद्धिमत्ता फक्त हिंदू लोकांच्या अंगीं वसत असल्यामुळें तेथें या राखून ठेवलेल्या नोकऱ्यांना लायक मुस्लिम उमेदवार मिळत नाहींत. त्यामुळें हिंदु व मुसलमानांच्या प्रश्नपत्रिकांत फरक केला जातो. जर बी. ए. ची परीक्षा असली तर हिंदूंना एम्. ए. चा पेपर त्या परीक्षेकरितां घातला जातो व मुसलमानांना मॅट्रिकच्या लायकीचा पेपर घातला जातो !

जे आर्थिक प्रश्नांवर भर देतात व आर्थिक बाबतींत धार्मिक मतभेद आड येत नाहीं असे मानतात त्यांनीं रेल्वे वर्कर्स युनियनची गोष्ट लक्षांत घ्यावी. सर्व मजुरांची रेल्वे वर्कर्स युनियन असतांना मुसलमानांनीं एक मुस्लीम रेल्वे वर्कर्स युनियन काढली. त्यामुळें हिंदूनाहि एक हिंदु रेल्वे वर्कर्स युनियन काढणें भाग पडलें.

## पाकिस्तान होणार नाहीं

आतां आम्हीं मुळींच माघार घेणार नाहीं. अजिबात सवलती देणार नाहीं. जर आम्ही ९० टक्के असूं तर ९० टक्के जागा आम्ही घेणार. आमच्या हक्कां-करितां आम्ही एकही इंच माघार घेणार नाहीं. जर ते मित्र म्हणून राहणार असतील तर त्यांनीं तसें राहावें; पण त्यांना जर दुसरा कोणताहि मार्ग चोखाळा-वयाचा असला तरी त्यालाहि आमची तयारी आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. आम्ही हिंदुस्थान हें आंग्लिस्थान होऊं देणार नाहीं, पाकिस्तान तर नाहींच नाहीं.

मुसलमान ज्याप्रमाणें कट्टर मुसलमान निवडून देतात त्याप्रमाणें हिंदूंनीं आतां कट्टर हिंदूलाच निवडून दिलें पाहिजे. हिंदु उमेदवारानें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे कीं, मी हिंदूंच्या मतावर निवडून आलों आहे, मी त्यांचेंच म्हणणें आपल्यापुढें मांडणार आहे. यापुढें एवढें लक्षांत ठेवा कीं जें जें हिंदूंच्या हिताचें आहे तेंच खरें राष्ट्रीय. यापुढें प्रत्येक गोष्टीची ही कसोटी लावून परीक्षा करा. ही भूमिका घ्या नि पांच वर्षांत काय चमत्कार होतो तें पाहा.

## धाकट्या भावाचा कान उपटा

म्हणे मुसलमान हे धाकटे बंधु आहेत त्यांना पाहिजे तें द्या. ते मागतात म्हणून वरची माडी दिली, खालचा सोपा दिला, स्वयंपाकघर दिलें, माजघर दिलें. पण आईचेच तुकडे करा असें ते सांगू लागले तर तें मी कधींहि मानणार नाही. ते जर आमचे धाकटे भाऊ असतील तर त्यांचे कान उपटण्याचा थोरले भाऊ म्हणून आम्हांला हक्क आहे ! भाऊ असतील तर त्यांनी असला फाजील-पणा करू नये व शत्रु असतील तर शत्रुत्व फार गरम पडेल हें त्यांनी लक्षांत ठेवावें.

आमचें बहुमत कांहीं कोणाच्या उपकारामुळें राहिलें नाही; आम्ही प्राण पणाला लावून तें टिकविलें आहे. टिपू, हैदरी, अल्लाउद्दिन नि औरंगजेब यांनी तें नाहीसे होण्याकरिता फार प्रयत्न केले. हूण गेले, शकही गेले. ज्याप्रमाणे हिरण्य-कश्यपूने चोरलेले वेद आम्ही परत आणले त्याप्रमाणेच आम्ही आपलें बहुमतहि टिकवून धरलें आहे. आणि माझी खात्री आहे कीं, आपल्या चुकीच्या धोरणाने जर हिंदु आत्मघात करून घेणार नसतील तर जगांतील कोणतेहि शस्त्र त्यांचा नाश करूं शकणार नाही."

## समारोपाचें भाषण

ता. २४ रोजीं सायंकाळीं समारोपाचें भाषण करतांना स्वातंत्र्यवीर **सावरकर** म्हणाले, " डॉ. वरदराजलू नायडू यांनीं या हिंदुसभेच्या कार्यांत पुढाकार घेतला त्यांचे आभार मानणें माझें आद्य कर्तव्य आहे. मद्रास इलाख्याचे सुपुत्र श्री. विजय राघवाचारिअर यांनी आपलें तनमनधन या कार्याकरिता वाहिलेलें आहे. हिंदुमहासभेच्या अकोला येथें भरलेल्या अ. भा. अधिवेशनाचे ते अध्यक्षच होते. मी स्पष्ट बोलतो क्षमा करा, परंतु मद्रास इलाख्यांत गेल्या वीस वर्षांत हिंदुमहासभेचें एकहि अधिवेशन भरूं नये किंवा एखादी हिंदु सभेची शाखाहि असूं नये ही खरोखरच मद्रास इलाख्याला काळीमा लावणारी गोष्ट आहे. ह्या दृष्टीने डॉ. वरदराजलू नायडू यांनी घेतलेल्या पुढाकाराचें फारच महत्त्व आहे. डॉ. नायडू हे पंजाब, बंगाल किंवा भारताच्या इतर दुसऱ्या कोणत्याहि प्रांतांत जन्मास आले असते त्यापेक्षा मद्रास इलाख्यांत ते जन्मास आले याचें आमच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. हिंदु सभेचे कार्य मद्रास इलाख्यांत सुरू करणारे तेच पहिले पुढारी आहेत. ते ब्राह्मणेतर आहेत याचें आमच्या दृष्टीने फारच महत्त्व आहे. हीच संस्था जर एखाद्या ब्राह्मणाने स्थापली असती तर खोटा का होईना पण ही सभा ब्राह्मणांची आहे असा आळ आला असता. परंतु डॉ. नायडू हे समोर आल्याकारणानें मी त्यांच्याकडे बोट दाखविलें कीं माझें काम संपलें. ते अननुभवी नाहींत किंवा शाळेंत पढणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणें एकांगी विचारसरणीचे नाहींत. त्यांचें आजपर्यंतचें चरित्र उज्वल आहे. त्यांनीं ट्रेड युनियन्स चालविल्या आहेत, अस्पृश्यता दूर करण्याकरितां त्यांनीं परिश्रम घेतले आहेत, मद्रास प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष होते व त्या राजकारणाचाहि त्यांनीं पुष्कळ अनुभव घेतला आहे.

तुरुंगांत जाणें यालाच केवळ मी देशभक्ति समजत नाहीं; परंतु देशभक्तीचा तोहि एक मार्ग त्यांनीं आक्रमिला आहे. ते अजून कौन्सिलमध्यें गेलेले नाहींत. परंतु येत्या निवडणुकींत हिंदु सभेच्या तिकिटावर आम्ही त्यांना कौन्सिलांत धाडूं. वरील सर्व कार्यांचा अनुभव घेऊन ते आतां आपल्या पन्नाशीच्या पोक्त वयांत हिंदू सभेला येऊन मिळाले आहेत. अनेक वर्षांचा राजकारणाचा अनुभव

घेऊन त्यामध्यें भाग घेऊन नि त्याकरितां नानाविध कष्ट सोसून त्यांनीं हिमालयावर प्रथम फडकलेलें, पंजाब, बंगाल यांनीं उभारलेलें, महाराष्टानें शौर्याची कमाल करून रक्षिलेलें हिंदु निशाण—हिन्दूंचा परमप्रिय भगवा ध्वज येथें फडकविला आहे.

## धमक्यांना आम्ही भीत नाहीं

तुम्ही कॉंग्रेसमध्यें गेलांत तरी तुमचें हिन्दुत्व नष्ट झालेलें नाहीं. तुम्ही आपण होऊन त्याचा त्याग करूं नका. कॉंग्रेस जर त्याचा त्याग करावयास सांगत असेल तर हिंदु रहाण्याकरितां असल्या शेंकडों कॉंग्रेस संस्थांना धिक्कारा.

आज तुम्ही वृत्तपत्रांत जिनामहाशयांचें वक्तव्य वांचलें असेलच. जिनामहाशयांनी एक नवीन शोध लावला आहे. आतां त्यांचें अल्पसंख्यांकांचें तुणतुणें जाऊन मुसलमान हे बहुसंख्य आहेत असा त्यांचा नवीन शोध आहे. एकाच देशांत दोन जाती बहुसंख्य असूं शकतात असें त्यांचें म्हणणें आहे! नुकतेच 'हरिजन' मध्यें मुसलमान हे हिंदी आहेत म्हणून त्यांच्या सत्तेखालीं नांदण्यांत मला कमीपणा वाटणार नाहीं असें लिहिलें गेलें आहे! ब्रिटिश लोक हेसुद्धां मानव कोटींतील असल्याकारणानें मनुष्य धर्माला जागून गांधी त्यांच्या वर्चस्वाखालीं राहण्यास कां तयार नाहींत? माझा या चुकीच्या तत्वाला मूलभूतच विरोध आहे. जर गांधी, मुसलमान हे हिंदी आहेत म्हणून जिनांच्या सत्तेखालीं नांदूं इच्छितात तर मीहि हिंदी असल्याकारणानें जीनांनीं माझ्या सत्तेखालीं


दररोज स्नान करतांना

**डायमंड खस ( वाळ्याचा ) साबूच वापरा.**

मंद वाळ्याचा सुगंध येत राहिल्यामुळें मन प्रफुल्लित राहील. तीन वड्यांच्या एक पेटीची किं. १० आणे. मोठमोठ्या व्यापाऱ्यांकडे मिळेल.

**डायमंड सोप कं.** २ री भटवाडी, लिमये बिल्डिंग, मुंबई ४

स्टॉकिस्टस्—विठ्ठलदास नारायणदास, जुम्मामशीद, मुंबई.

पी. आर. जोशी ब्रदर्स, गिरगांवरोड, मुंबई.

कां नांदूं नये ? मी मुसलमानांना बजावतों कीं, या धमक्यांनीं तुम्ही कॉंग्रेसवाल्यांना घाबरवाल पण आम्हां हिंदु सभावाद्यांवर या धमक्यांचा मुळींच परिणाम होणार नाहीं.

### जशास तसें हें आमचें धोरण

आमच्यावर आजपर्यंत मुसलमानांनी कांहीं थोडे अत्याचार केले नाहींत. नादिरशहा आले नि गेले. अहमदशहा अब्दालीला आम्ही हात दाखविला. दिल्लीच्या बादशहाचें तख्त फोडलें. जीनामहाशय इतिहासाच्या गोष्टी सांगून त्याच मार्गाचा अवलंब करू इच्छितील तर आम्ही त्यांना बजावतों कीं, त्यांच्याशीं आम्हीहि '**जशास तसें**' असेंच वागूं.

केवळ हिंदुस्थानांत मुसलमान जन्मले म्हणून त्यांचें राज्य आपणांवर चालू द्यावयाचें ही कल्पनाच चुकीची आणि गर्हणीय आहे. हिंदुस्थानचे स्वराज्य हें असलें बेगडी राज्य नव्हे तर हिंदु हा ज्यामध्यें अत्यंत महत्त्वाचा घटक गणला जाईल तेंच खरें आपलें हिंदूंचें स्वराज्य.

हिंदुसभा असलें शिवाजीप्रणित स्वराज्य आणूं इच्छिते. आता सर्व युगें मागे पडून हिंदुयुग चालू झालें आहे. त्याची प्रभा दिसू लागली आहे. आपण या सुवर्णयुगाचें स्वागत करण्याची सिद्धता केलीच पाहिजे.

सेलम, ता. २३-३-४०

---


# दांत काढूं नका

**पायोरिया म्हणजेच दंतरोगावर अत्यंत गुणकारी औषध**

किं. १ डबीस ७ आ. ३ डब्यांस रु. १८= दांताचे वरचें मांस सडणें, पू व रक्त येणें, दाढ सुजून ठणका लागणें, दांत शिवशिवणें यांजवर वस्ताद. एकवेळ अनुभव पहावा.

**मोरेश्वर मुकुंद मोगरे**

आयुर्वेदिक फार्मसी, गिरगांव बॅंकरोड, मुंबई नं. ४

# वैभवशाली हिंदु राष्ट्र

[“ हिंदूंचें जिणें हें आजच केवळ नव्हे तर सदा सर्वदा अखंडित शरणागतीचें व एकसारख्या पराभवांचेंच होतें. हिंदु अजूनही ज्या पद्धतीनें जगत आहेत ती पद्धत हिंदुस्थानास लाजीरवाणी आहे ” असे आरोप डॉ. आंबेडकर यांनीं पंजावच्या जातपात.–तोडक–मंडळाच्या परिषदेंतील होऊं घातलेल्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत केले होते त्याला स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर सावरकर यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण पद्धतीनं उत्तर दिलें आहे,

There is not a petty state in Rajsthan that has not its Thermopale and scarcely a city that has not produced its Leonidas.

**--Todd's Rajsthan.**

कर्नल टॉडसारख्या परकीय इंग्रजी लेखकानें राजपुतान्याविषयीं जें वरील वाक्यांत म्हटलें आहे कीं, तेथें ज्यांत एकेक थर्मापिली नाहीं असें संस्थान नाहीं एकेक लिओनिडास निघाला नाहीं असें नगर नाही, तेंच या आसिंधुसिंधु विस्तारलेल्या अखिल हिंदुराष्ट्रासंबंधीहि म्हणतां येईल !

परंतु हें ऐतिहासिक सत्य डोळयाआड करून हिंदुराष्ट्राचे शत्रूही जे सहसा लावीत नाहींत तें दूषण डॉ. आंबेडकर आजकाल येतां जातां हिंदुराष्ट्रास लावीत आहेत ! हिंदुराष्ट्राशीं त्यांना कोणचाही संबंध ठेवावासा वाटत नसेल तर तो, त्यांनीं सुखेनैव तोडावा. आम्ही तो तोडूं इच्छित नाहीं; उलटपक्षीं तो समतेच्या नि ममतेच्या रज्जूंनीं अधिक दृढ करण्यासाठीं यथाशक्ती झटतही आलों आहों. परंतु हिंदुराष्ट्रावर उपकार करण्यासाठीं म्हणूनच काय तें कोणी हिंदुत्वाच्या ध्वजाखालीं यावें अशी कोणाची पायधरणी करण्याइतकें कांहीं आजहि हें हिंदुराष्ट्र स्वाभिमानशून्य वा हतबल वा हताश झालेलें नाहीं ! आणि तशी वेळ दुर्दैवानें कधीं आली तरीहि अशा बाजारबुणग्यांच्या औदार्यावर जगण्यापेक्षां हिंदुत्वाच्या सन्मानास्तव झुंजत मरणेंच कोणताही मानधन हिंदु श्रेयस्कर मानील !

## आंबेडकरांचा आचरट आक्षेप

" हिंदूचें जिणें हें आजच केवळ नव्हे तर सदासर्वदा लाजिरवाणेपणाचेंच काय तें होतें, हिंदू अजूनही जे जगत आहेत ते कांहीं त्यांच्या पराक्रमानें नसून दुसऱ्याच्या पायाखालीं सदासर्वदा तुडविले जात असतांहि, तशा जिण्याची लाजच त्यांना कधीं वाटली नाहीं म्हणूनच काय तें होय, कालाच्या ओघांत आम्ही आजवर जगत आहोंत, उरतों आहोंत, याचा हिंदुराष्ट्राला वाटणारा अभिमान पोकळ आहे. कारण हिंदु समाजाचें जीवन हें सदासर्वदा दासाचें जीवन होतें, अखंडित शरणागतीचे, नि एकसारख्या पराभवाचेंच काय तें! जेता म्हणून झुंजीत प्रतिपक्षास पुरून उरला म्हणून कांहीं हिंदु कधींकाळीं जन्मलेला नाहीं.

The Hindus' has been a life of a continuous defeat. It is a mode of survival of which every Hindu will feel ashamed. " अशा आशयाचे आणि अशाच कठोर शब्दांचे आक्षेप डॉ. आंबेडकरांनीं पंजाबच्या जात—पात–तोडक मंडळाच्या परिषदेंत होऊं घातलेल्या त्यांच्या एका अध्यक्षीय भाषणांत केलेले आहेत.

डॉ. आंबेडकरांचे वरील आक्षेप हे सर्वथैव खोटे आहेत. जर त्यांत सत्य असतें तर तें कितीही कटु असलें तरी आम्ही त्याचा विषाद मानला नसता. डॉ. महाशयांनीं अस्पृश्यतेच्या आजच्या अत्यंत अन्यायी नि दुष्ट रूढींविषयीं जी निर्भत्सना केली आहे किंवा जन्मजात जातिभेदाच्या घातक परिणामाविषयीं जी जळजळीत टीका केली आहे तिच्या इतक्याच न्यायनिष्ठुरपणें आम्हींहि त्या दुष्ट रूढींना निषेधीत आलेले आहों, त्यांच्या उच्चाटनार्थ झटत आलेले आहों. आमच्या हिंदुराष्ट्राच्या अंगीं आज मुरलेल्या त्यासारख्याच इतर अनेक दोषांनाहि आम्ही सडेतोडपणानें राष्ट्रहितार्थच आविष्कारण्यास कचरत नाहीं, हें आम्ही सांगितलेच पाहिजे असे नाहीं. आपल्या राष्ट्रीय दोषांना धिक्कारण्याचें साहस आणि प्रतिकारण्याची शक्ति ज्या राष्ट्रांत उरलेली नसतें तें राष्ट्र मृत्युपंथास लागलेंच म्हणून समजावें. परंतु तसे साहस नि ती शक्ति आमच्या हिंदु–राष्ट्रांत आजहि आहे असा आम्हास पूर्ण भरंवसा

असल्यामुळेंच आम्हीं आमचे दोष उघडकीस आणण्यास भीत नाहीं. तेव्हां आमच्या राष्ट्राचे असलेले दोष कोणी काढले तर तेवढ्यासाठीं केवळ भावना दुखते म्हणून आम्ही त्यास निषेधूं लागलों असें आमच्याविषयीं तरी कोणासही म्हणतां येणार नाहीं. अर्थात् डॉ. आंबेडकर वरील आक्षेपांत म्हणतात कीं, हिंदूंचा इतिहास हा अखंड शरणागतीचाच इतिहास, हिंदूचें जीवन म्हणजे प्रथम पासून आजपावेंतों हास्याचेच जीवन, The Hindus' has been a life of continuous defeat तें जर ऐतिहासिक सत्य असतें तर तो लज्जास्पद आक्षेपहि आम्हीं नाकारला नसता.

पग तरीही खऱ्या मानधन पुरुषाचें कर्तव्य त्याही परिस्थितींत काय ठरतें ? ज्या हिंदु राष्ट्रांत, हिंदु वंशांत, आपण जन्मलों नि वाढलों त्या आपल्या राष्ट्राचा मागचा इतिहास असा अखंड शरणागतीचा आहे, आपल्या वाडवडिलांनी पराक्रम असा केलाच नाहीं, मानधन पुरुष असा आमच्या वंशांत कुणी आढ-ळतच नाही, असें ध्यानांत येतांच ज्यांच्या उदरीं जन्मलों त्यांनाच लाथाडून, तशा दुर्गतींत पचणाऱ्या स्वतःच्या वाडवडिलांच्या पोटीं आम्हीं जन्मलोच नाहीं, स्वतःच्या वडिलांना वडील म्हणण्याची आम्हाला लाज वाटते असें कापुरषी रडगाणें गात दुसऱ्याचे वडिलांसच वडील म्हणण्यासाठीं हपापणें हें कां आपल्या पिढीचे कर्तव्य ठरतें ? जो बापास बाप न म्हणे असा तो कुपुत्र त्या आपल्या नार्मद पूर्वजांहूनहि नामर्द ठरतो ! आपल्या झाडून साऱ्या पूर्वजांच्या ' अखंड शरणागतीचा ' कलंक दिसण्याइतका जो स्वतःस मानधन मानतो त्या पुत्राचें कर्तव्य आपल्या बापास बाप म्हणण्याचें सोडून दुसऱ्याचा बाप दत्तक घेणें हें नव्हे ! तर स्वतःच्या पराक्रमानें आपल्या वंशाला लागलेला तो अखंड शरणा-गतींचा कलंक धुवून टाकीन ही प्रतिज्ञा करून कर्तव्यरणांत उतरणे हेंच होय ! जर माझे पूर्वज दुर्गतींत पचत असतील तर मी आपल्या पुरुषार्थानें त्यांस उद्धरीन; माझ्या वंशांत मागें कोणी पराक्रम केलेला नसेल नि त्याची लाज मला वाटत असेल तर मीच त्या माझ्या वंशातील पहिला पराक्रमी पुरुष होऊन त्या माझ्या पुसट वंशावळीला जगांतील इतिहासामध्यें सोनेरी अक्षरांत ठळकपणें छापविणें माझ्या कुळशत्रूंनाही भाग पाडीन; माझ्या पूर्वजांनीं कोणाचाही पराभव केला नाहीं म्हणून हंसणाराचे दांत माझ्यासारख्या पराक्रमी पुरुषाला जन्म

देण्याइतका त्यांचा जो बीजभूत पराक्रम होता तो दाखवून त्यांच्याच घशांत घालीन; तितकेंही न साधलें तरी निदान माझ्या आईच्या घरांत चूल वा पंथी पेटविण्याइतकी देखील चेतना नसल्यामुळें अंधेरच अंधेर पसरलेला आहे, ह्यासाठीं तिला त्याच भुकेंत नि अंधारांत खितपत सोडून त्या तिच्या दुर्गतीच्या विटंबनेचें तिच्या शत्रूंशीं हांजी हांजी करीत, त्यांच्या घरच्या तुकड्यांवर पोट भरीत, त्यांच्या दिव्यांच्या दिवल्या पाजळीत राहाणारा त्या आईच्या पोटीं आलेला जंत न होतां तिच्या त्या निराश नि निरभ्र दुर्दशेचा अंधकार घालवण्यासाठीं **आपल्या हृदयाचीच आगकाडी पेटवून** निदान आपल्यापुरती तरी जी कांहीं चेतना, प्रकाश नि अब्रू तिला देतां येईल ती माझ्या आईला देईन असाच निश्चय नि प्रयत्न स्वतःस मनुष्य म्हणविणाऱ्यानें केला पाहिजे! जर खरोखरीच Hindus' life had been a life of a continuous defeat जर हिंदुराष्ट्राचें जीवन हें एक अखंड नि सतत पराभवाचेंच जीवन असतें तर आम्ही तेंहि सत्य न लपवितां किंवा ह्यायोगें हताश न होतां हिंदूच्या ह्या नि पुढच्या पिढ्यांना असेंच उपदेशिलें असतें कीं, चला आतां आपल्या पराक्रमानें त्या अखंड पराभवाचें उट्टें काढून आपल्या राष्ट्राचा तो कलंक धुवून टाकण्यासाठीं यापुढें तरी 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।' हा महाभारतीय मार्गच अनुसरूं या!

यावरून हें स्पष्ट स्पष्ट होईल कीं, आम्ही आंबेडकरांनीं वारंवार केलेल्या वरील विधानांना जे निषेधूं इच्छितों तें कांहीं ती कडवट आहेत किंवा आमच्या राष्ट्राच्या त्यांत केलेल्या निंदेनें आमच्या भावना दुखतात यास्तवच काय तें नव्हे, तर तीं त्यांचीं विधानें मुळांतच अगदीं खोटीं नि खोडसाळ आहेत म्हणूनच काय तें होंय. डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वानाला हिंदुधर्म नीतीवर,श्रुतिस्मृतिवर,संस्कृतीवर अनेक व्याख्यानें नी प्रवचनें देत राहणाऱ्या आणि ग्रंथ लिहिणाऱ्या एका उत्तरदायी (responsible) पुरुषाला त्यांची हीं विधानें कशी सर्वथैव मिथ्या आहेत हें कळण्याइतकें हिंदु इतिहासाचें ज्ञानही असलेंच पाहिजे, निदान असावयास पाहिजे. तसें असतांहि त्यांनीं ज्या अर्थी तापट अविवेकाचे भरीं भरून हिंदुराष्ट्राचे नांवास हें नसतें लांछन इतक्या अमर्यादपणें लावलें आहे, त्याअर्थीं आम्हांस त्यांचीं तीं विधानें नुसतीं खोटींच नसून खोडसाळहि आहेत, असेंच म्हणणें भाग आहे.

आपल्या पूर्वजांच्या ममतेपायीं त्यांची नसती स्तुति करीत सुटणें हें मूर्खपणाचें असलें तरी माणुसकीस कांहीं अगदींच सोडून नसतें. पण आपल्या पूर्वजांची नसती निंदा करणें किंवा ती कुणी कुत्सितपणें जाणून बुजून तोंडावर केली असतां तिचा तीव्र प्रतिवाद न करतां ऐकून घेणें हे माणुसकीस लांछनास्पद आहे. हिंदुत्वाचा संबंध किंवा हिंदुराष्ट्राचें नातें डॉ. आंबेडकरांनीं तोडलें असलें तरीहि केवळ न्यायाच्या, ऐतिहासिक सत्याच्या आणि निःपक्षपाताच्या दृष्टीनें तरी हिंदुराष्ट्राविषयीं त्यांनी असली अगदी खोटीं नि खोडसाळ विधानें वारंवार करीत राहावयास नको होतें. अशा भरमसाट निंदेनें हिंदुराष्ट्राच्या सत्कीर्तीपेक्षां निंदकाच्या कीर्तीसच जास्त बट्टा लागतो हें डॉ. आंबेडकरांनीं विसरूं नये. तथापि तें विसरून जर कोणी अशीं कुत्सित नि असत्य विधानें वारंवार करीत राहिला आणि जर त्यांचा वेळोवेळीं साधार प्रतिवाद करींत गेलें नाहीं तर अनेकदां ऐकतां ऐकतां असें असत्यही सहस्रावधि सामान्य नि अतज्ज्ञ लोकांना सत्यासारखें वाटूं लागून राष्ट्राच्या आत्मविश्वासालाच धक्का पोंचण्याचा उत्कट संभव असतो, हेंही कांहीं खोटें नाहीं. यास्तव या असत्य विधानांचा निषेध करणें आणि ऐतिहासिक कसोटीस लावून त्यांचा खोटेपणा उघडकीस आणणें हें आम्हीं आमचें कर्तव्य समजतों. सत्य काय तें जाणण्यासाठीं तरी डॉ. आंबेडकरांनीं ह्या ऐतिहासिक कसोटीचा नीट विचार करावा.

या ऐतिहासिक छाननींत कोणत्याही लहान सहान किंवा विवादास्पद घटनांवर अवलंबून न राहतां परकीय इतिहासकारांनाही नाकारतांच येऊं नयेत अशा ज्या अखंडनीय नि अगदीं ठळक, तेवढ्याच घटनांचा पुरावा आम्हीं जमेस धरू.

ज्या अर्थी डॉ. आंबेडकरांनीं त्यांच्या वर उल्लेखिलेल्या लेखांत हिंदुराष्ट्राच्या कोणच्याही एका जातीला, प्रांताला, वर्गाला किंवा काळखंडाला लावून आपलीं विधानें न करतां तीं एकंदर हिंदुराष्ट्राला नि त्याच्या एकंदर जीवनकालास स्पष्टपणें उद्देशूनच केलेलीं आहेत; The Hindu's life, has been a life of continuons defeat, असेच ज्या अर्थी ते बेधडकपणें म्हणत आहेत त्या अर्थी त्याचें खंडन करावयास ह्या विषयापुरतें तरी हिंदुराष्ट्राच्या एकंदर इतिहासाचेंच विहंगावलोकन करणें अवश्य आहे.

## वैदिक नि पौराणिक काल

जें राष्ट्र आज ह्या आसिंधुसिंधु भारतवर्षाला व्यापून हिंदू म्हणून निवसत आहे त्याचा मूलारंभ वैदिक कालांतील सप्तसिंधू ह्या नावानें प्रख्यातलेल्या राष्ट्रापासून झाला. त्या आमच्या अत्यंत प्राचीन सप्तसिंधू ह्या संस्कृत अभिधेचेंच हिंदू हें प्राकृतरूप होय. वैदिक काळांतील त्या सप्तसिंधू राष्ट्रांतील वीरांचें खड्ग नि द्रष्ट्यांची स्फूर्ति, ते ज्या प्रज्वलित यज्ञाग्निस आराधित असत त्याच्या ज्वालांसारखीच कशी देदीप्यमान नि दुर्धर्ष होती, त्यांच्या काळांतील त्यांच्या शत्रूंवर विजयामागून विजय मिळवीत त्यांची सैन्यें, राज्यें नि संस्कृती सरस्वतीपासून ब्रह्मावर्तास, ब्रह्मवर्तातून मगधास, प्रयागास व काशीस मथुरेस द्वारकेस–पूर्वसमुद्रापासून तों पश्चिम समुद्रापर्यंत अप्रतिस्थपणें कशी विस्तारत गेली; विंध्य ओलांडून, सह्य ओलांडून अंतीं दक्षिण समुद्र त्यांनीं कसा गांठला; अनादि घनदाट महारण्यें कापून छाटून प्रदेशचे प्रदेश त्यांनीं कसे वसवले, नांगरले, पेरले, सहस्रावधि नगरें आणि महानगरें कशीं उभारलीं, वाटेंत भेटलीं तीं तीं विभिन्न जानपदें नि विपक्षीय संस्कृति कांहीं सामावून घेतल्या, कांहीं पचवून टाकल्या, कांहीं कशा मातीस मिळविल्या, कित्येक रावणांचीं दाही दाही शिरें कशी छाटून टाकलीं, कित्येक द्वेष्ट्यांचे सहस्र सहस्र बाहू कसे तोडून टाकले, कित्येक बळी महाबळींना कसे पाताळीं घातले, काव्यशास्त्र, व्याकरण, शिल्प, धर्म, योग, तत्वज्ञानप्रभृति भौतिक नि आत्मिक प्रगतींतही केवढें महनीय स्थान त्यांनी पटकाविलें, तें कांहीं आतां नव्यानें सांगावयास हवें किंवा पुराव्यानें सिद्धावयास पाहिजे असें नाहीं! डॉ. आंबेडकर स्वतःच त्या निबंधांत म्हणतात कीं, ‘ That the Hindu religion was once a missionary religion must be admitted. It would not have spread over the face of India if it was not a missionary religion ! ’ ‘ हिंदु धर्म हा प्रचारशील धर्म होता ह्यांत शंकाच नाहीं. नाहीं तर ह्या साऱ्या भारतवर्षास तो असा व्यापून टाकताच ना ! ’ हिंदू-राष्ट्राच्या धार्मिक दिग्विजयासंबंधीं डॉ. आंबेडकरांनींच जे वरील एकमेव प्रमाणपर्याप्त मानलें आहे तेच वैदिक नि पौराणिक कालखंडांतील सांस्कृतिक नि राजकीय दिग्विजयासंबंधींहि निर्णायक

धरलें पाहिजे. वैदिक सप्तसिंधूंचें राष्ट्र पंचनदापासुन ब्रह्मावर्तांतून आर्यावर्तांत, नि आर्यावर्तांतून ह्या " उत्तरं स्यात्समुद्रस्य हिमाद्रेशैव दक्षिणं । तं वर्षम् भारतम् नाम भारती यत्र संततिः । अशा उभ्या भारतवर्षांत आपली संस्कृति नि साम्राज्य फैलावीत जात जात ज्याचा पुरोहित आणि सेनानी इंद्र आहे अशा आपल्या राष्ट्राचें वर्चस्व ज्या काळच्या जगांत अप्रतिस्थपणें गाजवीत राहिलें होतें त्या काळाविषयीं तरी '*Hindus' life has ever been a life of continuous defeat*' असें म्हणण्याची कोणाची छाति आहे ? त्या हिंदूंच्या दिग्विजयी वैदिक, रामायणिक, महाभारतीय काळाचें वर्णन करावयाचे तर असेंच केले पाहिजे कीं, "In the Vaidic and Pauranic period the life of the Hindus had ever been a life of one continuous triumph, of invincible independence, astonishing progress and unchallengable superiority. !"

आणि तो वैदिक नि पौराणिक कालखंडही कांहीं लहान सहान नव्हता; शतकांनीं न मोजतां सहस्त्रकांनीं मोजला जावा इतका सुदीर्घ ! त्या काळची समकालीन राष्ट्रें आपलें सारें जीवनकार्य नि जीवन संपवून मरून आस्थिशेष वा इष्टिकाशेष वा नामशेषही होऊन गेलीं !

## ऐतिहासिक काल, प्राचीन खंड

**ग्रीकांची स्वारी आणि शेवटीं हिंदूंनीं त्यांची उडविलेली धुळधाण:**—इतिहास कालाचे प्रारंभींच शिकंदरनें इ. स. ३२६ वे वर्षी हिंदुस्थानवर स्वारी केली. वैदिक नि पौराणिक कालांतील दैत्यदानव, असुरनाग, यक्षराक्षसादी परकीय शत्रूंशीं दोन हात करून हिंदूंनीं त्यांचा धुव्वा उडवून दिला आणि त्या कित्येकांच्या बारशाप्रमाणेंच सर्वांच्या बाराव्याला जेवून ते मोकळे झाले. त्यानंतरचा काळ तो इतिहासकाळ. त्याच्या आरंभींच सर्व पृथ्वी पादाक्रांत करूं निघालेल्या ग्रीकांसारख्या बलाढ्य शत्रूशीं सामना देण्याचा प्रसंग ह्या शिकंदराच्या स्वारीमुळें त्यांना आला. पण ग्रीस देशांतून निघाल्यानंतर सीरिया, इराण प्रभृति देश नि देश पादाक्रांत करीत आलेल्या शिकंदराच्या दिग्विजयाची लाट ह्या हिंदुस्थानच्या हिमालयीन तटावर

आदळतांच फुटून गेली. परंतु भारतविजेता म्हणवून घेण्याची शिकंदराची खुमखुम पंचनद ओलांडतो न ओलांडतो तोंच जिरून गेली! त्यानें पौरसाचा पराभव केला, पण तो इतक्या निकराच्या लढाईनंतरच कीं, ग्रीक सैन्याचें त्या पुढच्या मगध साम्राज्याशीं गांठ घालण्याचें धैर्यच कांहीं अंशीं तरी खचून जावें! व्यास नदी ओलांडून त्या मगध साम्राज्याशीं गांठ घालण्याचें शिकंदराच्या सैन्यानें साफ नाकारलें, बंड केलें आणि शिकंदराला परत फिरणें भाग पाडलें. ह्या बंडास इतरही कांहीं कारणें असलीं तरी जर कां मगध साम्राज्यामध्यें शिकंदरास इराणाप्रमाणेंच मोकळें रान सांपडण्याचा संभव असता नि चालतां चालतां जिंकतां येण्याइतकें तें दुर्बळ आहेसें त्या ग्रीक सैन्यास वाटलें असतें तर ते मगधाच्या राजवाड्यांत दोन चार चमचमीत भोजन समारंभ उरकल्यावांचून थोडेच परत जाते! आणि परत फिरले ते तरी कसे तर पावलागणिक हिंदूंच्या लहान मोठ्या गणराज्यांनीं केलेल्या लांडगेतोडीनें भीक नको पण कुत्रा आवर असे संतस्त्र होत होत! त्यांतही क्षुद्रक नि मालव येथील हिंदूंच्या गणराज्यांनीं शिकंदराला असा उपद्रव दिला कीं ग्रीक इतिहासकारांना देखील त्यांच्या शौर्याची वाखाणणी केल्यावांचून रहावेना. त्या दिग्जेत्या शिकंदराला हिंदुवीरांनीं एकदां तर व्यक्तिशः घेरून घायाळ करून समरांगणात पाडला! हिंदूंच्या खड्गाघातानें बेशुद्ध नि रक्तबंबाळ होऊन पडलेल्या आपल्या त्या दिग्विजयी सम्राटाला मोठ्या कडीनिकडीनें बचावून यावनी सैन्यानें रणांतून त्या दिवशीं वेळींच उचलून नेलें. म्हणून शिकंदर हिंदुस्थानांतून जिवंतपणीं परत तरी जाऊं शकला!

शिकंदर दिग्विजेता होताच होता. पण तो भारतविजेता नव्हताच नव्हता! पंचनदांच्या पुढें पाऊल देखील तो टाकूं शकला नाहीं. दक्षिण समुद्रापर्यंत पसरलेल्या हिंदुराष्ट्रसंघाचा केंस देखील तो वांकडा करूं शकला नाहीं. दक्षिणेत तर तो आला ही बातमी पोंचण्याचे आधीं सिंधु ओलांडून तो आला तसा परतलाही होता! एक पंजाब तेवढा त्यानें आपल्या साम्राज्यास जोडला, ( इ. स. पू. ३२५ त! ) पण हिंदूंनीं ग्रीकांच्या अधिकाऱ्यांना पिटाळून लावून तो लगोलग परत घेतला ( इ. स. पू. ३२२ चे आंत )! अवघ्या चार वर्षांचे आंत जगतांतील त्या काळच्या बलाढ्य शत्रूचा पाय हिंदूनीं हिंदुस्थानांत रोवला जातां जातांच असा उखडून टाकला!

पण इतक्यावरच थांबलें नाहीं. हिंदूंचा हा विजय अप्रत्यक्ष विरोधाचा; यावनी सैन्याशीं समोरासमोर खड्गास खड्ग भिडवून कांहीं हिंदूंनीं त्याना धूळ चारली नाहीं, असें कोणी वावदूक म्हणूंच लागला तर त्याचेंही तोंड बंद पाडणारी घटना ग्रीकांच्या इ. स. पू. ३२२ तील वरील उच्चाटनामागोमागच घडून आली. ग्रीकांसारख्या बलाढ्य शत्रूशीं सामना देण्यास बदललेल्या परिस्थितींत जें अवश्य तें तें नवें शिकून, तें तें जुनें टाकून, चाणक्याच्या अलौकिक प्रतिभेनें नि चंद्रगुप्त मौर्याच्या पराक्रमानें मगधांत मोठी राज्यक्रांति घडवून आणली. हिंदुसाम्राज्याच्या महारथाचीं सूत्रें त्यांच्या हातीं येतांच ग्रीकांच्या हातांतून हिंदूंनीं पंजाब लगोलग हिसकून घेतला असें पाहातांच शिकंदराच्या प्रबळ सेनापति सेल्यूकस हा यावनी सैन्यासह पंचनदावर इ. स. पू. ३०५ च्या संधीस पुन्हा चालून आला. तेव्हां सम्राट् चंद्रगुप्तानें त्याला रणांगणात गांठून अभिमुख समरांत ग्रीकांचा इतका पूर्ण पराभव केला कीं, पंचनदच नव्हे तर अफगाणिस्थान नि बलूचिस्थान हे प्रांतही विजयी हिंदुराष्ट्रास देऊन वरती अहेर म्हणून ग्रीक सम्राट सेल्युकसनें आपली कन्याही हिंदुसम्राट् चंद्रगुप्ताला अर्पिली ! त्याकाळच्या जगांतील बलाढ्यांतील बलाढ्य अशा ग्रीकांवर हिंदूंनीं असा निर्विवाद विजय मिळविला ! इ. स. पू. ३०५ च्या आधीं हिंदूंनीं ग्रीक राष्ट्राचा पुरता मोड करून अवघ्या वीस वर्षांचे आंत त्यांची धुळदाण उडवून दिली आणि हिंदु कुश पर्वतावर हिंदुसाम्राज्याचा ध्वज नेऊन रोवला ! पुढें दोनशें वर्षेंपर्यंत हिंदु राष्ट्राकडे पुन्हा डोळा वर करून पहाण्याची ग्रीकांची छाती झाली नाहीं हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे. शिकंदरानें जिंकलेली आशिया खंडातील सारी राष्ट्रें ग्रीकांच्या हातीं राहून तेथें त्यांची चिरस्थाइ राज्यें नांदली. त्यांच्या दिग्विजयाचे दांत एका हिंदुस्थानानेंच काय ते पाडले ! त्या काळच्या जगांतील साम्राज्यामध्यें चंद्रगुप्त–बिंबिसार अशोकादि मौर्यसम्राटांचें हिंदु साम्राज्य सर्वतोपरी श्रेष्ठ होतें की नाहीं, स्वतंत्र होतें की नाहीं, प्रबळ होतें कीं नाहीं तें परस्परें चंद्रगुप्ताचे राजधानींत असलेला ग्रीकांचा राजदूत जो मेग्यास्थेनिस त्यालाच विचारा ! ! त्या देवानाम प्रिय अशोकाच्या यशःस्तंभाना विचारा ! ! ह्या पुराव्याला समोर ठेविलें असतां हिंदूंचें जीवन ' सतत शरणागतींचें नि अखंड पराभवाचें होतें ' असें कोणता पिशुन म्हणू धजेल !

## मीनांदरशी युद्ध

सेल्यूकसला चंद्रगुप्तानें पराभविल्यानंतर कोणाही अहिंदूस भारतवर्षाची सीमा उल्लंघिण्याचें धाडस अव्याहृत दीडशें वर्षेपर्यंत झालें नाहीं. मौर्यवंशाचे बौद्ध राजे पुढें दुबळे झालेले पहातांच आशियांतील ग्रीक राजांनीं हिंदुस्थानावर दुसरें मोठें आक्रमण करण्याचा घाट घातला, तेव्हां मागें नंदवंशीय असेच दुबळे झाल्यामुळें चाणक्य–चंद्रगुप्तानी त्या नंदवंशीय सम्राटास ठार करून हिंदुसाम्राज्याची सत्ता जशी आपल्या हातीं घेतली होती तसाच वैदिक धर्माचा निस्सीम अभिमानी असलेल्या सेनापति पुष्यमित्रानें त्या दुबळया बौद्ध बृहद्रथ राजास मारून यावेळींही साम्राज्यसत्ता आपल्या पराक्रमी हातीं घेतली. मगधांत ही राज्यक्रांति होत आहे तोंच ग्रीक राजा मीनांदर हा सिंधु ओलांडून पंचनदांत इ. स. पू. १८० चे संधीस घुसला. ग्रीकांनीं तडाक्यासरशी चाल करून साकेत घेतलें आणि ते मथुरेपर्यंत चालून आले, तोंच सम्राट पुष्यमित्रानें तेथें त्यांना गांठलें. रणामागून रणामध्यें हिंदु सैन्यानें ग्रीकांस चोप दिला. आणि मागें रेटीत रेटीत शेवटीं पुष्यमित्रानें मीनांदरचा इतका धुव्वा उडविला कीं त्याला धांवपळ करीत सिंधुपार होतां होतांच नाकीं नव आले. ह्या विजयाची घोषणा करण्यासाठीं हिंदुसम्राट पुष्यमित्र ह्यानें मोठा अश्वमेध यज्ञ आरंभून आपला यज्ञीय विजयाश्व संचारार्थ सोडला. त्यास कांहीं ग्रीक राजानीं अडवितांच पुष्यमित्राचा पुत्र जो युवराज अग्निमित्र ह्यानें त्यांचाही मोड केला. हिंदूंच्या अप्रतिरथ पराक्रमाची द्वाही अशी देशोदेशी गाजवीत तो विजयाश्व परतल्यानंतर पुष्यमित्र सम्राटानें आपला अश्वमेध यज्ञ पुरा केला.

मीनांदराच्या ह्या स्वारीविषयीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मथुरेपर्यंतचा उत्तर पश्चिमेचा एक प्रांत सोडला तर बाकीच्या साऱ्या दक्षिणोत्तर अशा विस्तृत भारतवर्षाशीं शिकंदराच्या स्वारीप्रमाणें ह्या स्वारीचाही लवलेश संबंध आला नाहीं. आणि त्या परशत्रूंना आंत येतां येतांच हिंदूंनीं असें लागोपाठ पिटाळून लावलें.

## शक आणि यूची यांशीं महायुद्ध

सम्राट पुष्यमित्राच्या वरील दिग्विजयानंतर हिंदुराष्ट्राला अहिंदु आक्रमणाशीं तोंड देण्याचा म्हणण्यासारखा प्रसंग शंभर वर्षें तरी कांहीं

आला नाहीं. त्यानंतर साऱ्या आशियाला हादरून टाकणाऱ्या शक आणि यूची ह्यांच्या टोळधाडी जेव्हां उठल्या तेव्हा इसवी सनाच्या पहिल्या शतकांत हिंदुराष्ट्रालाही त्यांचा प्रचंड धक्का बसून हिंदूंच्या प्राचीन इतिहासाला एक तात्कालिक लांछन लागावें इतका आमचा पराभव झाला. शक आणि यूची यांच्या टोळधाडीनें आशियाच्या साऱ्याच मोठमोठ्या साम्राज्यांची दुर्दशा करून सोडली हें जरी खरें, तरीहि त्या टोळधाडी गांधारापर्यंत पोंचण्याचे आधींच सिंधु नदीच्या सीमेवर प्रचंड प्रतिकार करण्यास समर्थ असें हिंदुसैन्य नेऊन उभें करणारी एकही संघटित शक्ति हिंदुराष्ट्रसंघांत त्यावेळीं पुढें येऊं शकली नाहीं. आणि अंतस्थ यादवींत तो सारा राष्ट्रसंघ गुंतून ती टोळधाड उज्जयनीपर्यंत येऊन पोंचली तरी तिचा प्रतिकार करण्यास समर्थ झाला नाहीं. ही ढिलाई त्या काळच्या हिंदुराष्ट्राच्या इतिहासास कलंक फासीत आहे हें कांहीं नाकारतां यावयाचें नाहीं. ग्रीकांच्या आक्रमक सैन्यांना हिंदुस्थानांत घुसतांच जसें एका दशकाचे आंतच चंद्रगुप्तानें वा पुष्य-मित्रानें पुन्हां सिंधुपार पिटाळून लावलें तसें या शकयूचीचें पारिपत्य लागोलाग कोणी करूं शकला नाहीं. उलट काश्मीर, पंजाब, सिंध, काठेवाड प्रभृति प्रांतांत त्यांची राजसत्ता चिरस्थायीपणें स्थापली जाऊन त्या अहिंदु राजवंशानीं उज्जयनी-प्रभृति दोन तीन राजधान्यांतून दोन अडीच शतकें तरी राज्य करूं शकावें, ही वस्तुस्थिती त्या कालखंडापुरती लज्जास्पद समजली पाहिजे.

परंतु असा तात्कालिक पराभव होणे आणि दोनचार प्रांत शत्रूचे हातीं पडणे निराळे आणि तो अल्पांशी नि अल्पकालिक पराभव झाला म्हणून त्या यच्चावत् राष्ट्राचे यच्चावत् जीवनच 'सतत पराभवाचेंच काय तें होय' असे अप्रमाण नि आचरट विधान करणें हें निराळे!

विषप्रयोगाच्या संकटांत बलिष्ठ भीमसेनही मूर्च्छित होऊन डोहांत बुडाले, त्यावेळीं कित्येक नागांनीं त्यांना विळखून टाकलें, कित्येक बेडकें त्यांच्या डोक्यावर नाचलीं, पण त्या नागांच्या त्या विषासही पचवून त्या विषप्रयोगाच्या बेशुद्धींतूनही ते सावरले आणि त्या विषप्रयोगाचा सूड त्या दुःशासनाचा कंठनाळ फोडून घेते झाले हें भीमाचे भीमपण! पण तें विसरून आणि त्या तात्कालिक बेशुद्धीसच भीमसेनाचे सबंध जीवन समजून भीमाचे जीवन म्हणजे एक अखंड

बेशुद्धीच होती, जन्मभर त्या दुबळ्याचे डोक्यावर बेडकें नाचली, असे जर कोणी ट्रांवट्रांव करण्यास धजेल तर तें कोणी फुगीर बेडुकच काय तें !

शक-यूचीच्या भारतावर कोसळलेल्या त्या आपत्तीचीहि गोष्ट तशीच आहे. गुजराथपर्यंत त्यांची सत्ता चालू होती. भारतीयांस त्यांचा यशस्वी प्रतिकार करवला नाहीं. पण त्या अवधींत आंध्रीय हिंदुसम्राटांनीं आपली शक्ति एकवटून शक लोक नर्मदा उतरून येतात तोंच त्यांची गांठ घेतली. प्रथम त्यांना नर्मदेपार हुसकलें आणि मग आंध्रांचा प्रबळ नृपति गौतमी पुत्र विलियन कूर शालिवाहन यानें शकांच्या हातून उत्तरेकडील प्रांतामागून प्रांत परत घेत शेवटीं शकांचा प्रत्यक्ष राजा नहपान क्षहराट यास तुमुल संग्रामांत पराभवून ठार मारिलें ! त्या हिंदु विजेत्याची आई जी गौतमी तिला आपल्या वीर पुत्रानें अहिंदूंचा असा सूड उगविल्याची बातमी कळतांच इतका परमहर्ष झाला कीं त्याची स्मृति कार्ले येथील एका शिलालेखांत नित्याची कोरून ठेविली गेली ! इ. स. १०६ ते इ. स. १३० पर्यंत ह्या प्रतापी गौतमी पुत्रानें राज्य केल्यानंतर त्याचा पुत्र राज्यावर बसला. तोच प्रख्यात शककर्ता पुलुमायी शालिवाहन हा होय ! त्यानें उज्जयनीचा दुसरा पराक्रमी राजा जो रुद्रदामन त्याचाही पराभव केला. इ. सन ३२० चे संधीस वैदिक धर्माभिमानी गुप्तवंशाच्या हातीं जेव्हां उत्तरेच्या हिंदु साम्राज्याचीं सूत्रें गेलीं तेव्हां त्याचा पराक्रमी संस्थापक सम्राट् चंद्रगुप्त ह्यानें उत्तरेच्या यूचींचा नि शकांचा उच्छेद मांडला. त्याचा पुत्र सम्राट समुद्रगुप्त ज्यास विदेशी इतिहासकारहि भारतीय नेपोलियन म्हणतात, त्यानें पंचनदांत घुसून शकयूचींशीं दोन तीन पीढ्या चाललेल्या त्या महायुद्धात विजयामागून विजय मिळवीत त्या परकीयांची धुळधाण उडविली. त्याचा पुत्र सम्राट चंद्रगुप्त ( द्वितीय ) दूधविक्रमादित्य तो हाच ! कनिष्कापासून बळावलेली शकयूचींची सत्ता त्यानें साफ लयास नेली. त्याचा शेवटचा शत्रू जो रुद्रसिंह त्याचा हिंदुसैन्यानें पुरता पराभव करून त्याची राजधानी जी उज्जयनी तीहि घेतली. सिंधू नदीपासून पूर्व पश्चिम दक्षिण सिंधुपर्यंत जिकडे तिकडे हिंदु राष्ट्राचे विजयदुंदुभी पुन्हा अप्रतिरथपणें दुमदुमूं लागले.

जवळ जवळ दोनशें वर्षें काश्मीर ते नर्मदेपर्यंतचा सिंधु गंगेच्या मधील भारतीय प्रदेश शकयूचींच्या परकीय सत्तेखालीं होता. हिंदुवंशांनी रणामध्ये

त्यांचा चक्काचूर उडविला, हे तर झालेच. पण त्या सामरिक विजयापेक्षांही एक अत्यंत गौरवास्पद असणारा दुसरा जो विजय हिंदूनीं या लाखो शकयूचींवर मिळविला, तो होता सांस्कृतिक विजय! वास्तविकपणे शकयूची आंत आले तेव्हांच काय ते खरे परकीय होते, खरे शकयूची होते, पण जेव्हां इ. स. १३० च्या संधीस कनिष्कानें बौद्ध धर्म आणि इतरांनीं वैदिक स्वीकारला तेव्हांच हिंदूंनीं त्यांना खऱ्या खऱ्या अर्थी पाडाव करून टाकलें! एक शतकाचे आंत हिंदुसंस्कृतीचा ध्वज त्या शकयूचींच्या राजधान्यांवर नि राज्यावर फडकूं लागला! त्यांच्यांतील सहस्त्रावधि जनतेनें नि शतावधि राजपुरुषांनीं, मोठमोठ्या राजवंशांनीं, वैदिक धर्म, भाषा, देश, वेष स्वीकारला—कित्येकांनीं बौद्ध! हिंदुराष्ट्रानें त्यांचीं राज्येंच काय ती छिनाहून घेतलीं नाहींत तर त्यांचें स्वत्वसुद्धां सर्वस्वीं छिनावून, महासर्प जसा त्याच्या प्रचंड जबड्यांत घुसणाऱ्या हरिणीला जिवंतच जिवंत पचवितो तसें हिंदुसंस्कृतीनें तिच्या जबड्यांत


बाहेरगांवचे लोकांस किंवा मुंबईतील दुखणाइतांस **जरूरीच्या आणि निकडीच्या वेळीं** औषधें वगैरे मिळण्याचें **बारा महिने २४ तास उघडें** असें एकच ठिकाणः—

# मॉडेल केमिस्टस्

**( गव्हर्नमेंट रेकग्नाईज्ड )**

**देशी व विलायती औषधांचे व्यापारी**

ठाकूरद्वार नाका—मुंबई नं. ४

घुसणाऱ्या त्या लाखों शकयूचींना आपल्या प्रखर जठराग्नींत गिळून गाळून नुसतें पचवून टाकलें, त्यांनाच हिंदु करून सोडलें !

ह्या प्रबळ पराक्रमी गुप्त सम्राटांनीं हिंदुराष्ट्राच्या ह्या अतुल विजयाची नि प्रभावाची घोषणा करण्यासाठीं आपला वैदिक धर्माभिमानी गरुडध्वज पुढें घालून दळभारासहित यज्ञीय अश्व आसिंधु सिंधु भारतवर्षाच्या चतुःसीमापर्यंत नेला आणि तो अप्रति-रुद्ध संचार करून परततांच मोठ्या विजयोत्सवांत अश्व-मेध यज्ञ साजरा केला !

आपल्या ह्या इ. स. ३०० ते ४०० च्या पराक्रमी कालखंडास विदेशीय इंग्रज इतिहासकारही सुवर्णयुग म्हणून संबोधतात. सुदैवानें त्याचवेळीं चीन प्रवासी फाहाइन हा भारतवर्षात आला होता. मेग्यास्थेनीस प्रमाणेंच त्यानें ह्य काळच्या हिंदुराष्ट्राच्या पराक्रमाचें, सुस्थितीचे नि वैभवाचें जें वर्णन लिहून ठेवलें आहे तेंच कुत्सित निंदेस सांगेल कीं, त्या काळीं देखील हिंदूंचें जीवन पराजयाचें वा शरणागतीचें नसून शत्रूंना दांतीं तृण धरविणाऱ्या पराक्रमाचें, राष्ट्रस्वातं-त्र्याचें नि त्याच्या जगांतील प्रबलतम साम्राज्याचें होतें.

'प्रतिभा' पाक्षिक, १९४१



# बोरू मोडा नि बंदुका घ्या म्हणजे काय ?

आजच्या प्रसंगीं मी साहित्यावर बोलावें अशी अनेकांची इच्छा मला दिसली. पण मुंबई येथें तीन वर्षांपूर्वी भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून मीं जें भाषण केलें तेंच आतांपर्यंत शेवटचें ठरलें होतें; कारण त्यानंतर आतां-पर्यंत मी साहित्याची पोथी गुंडाळून ठेवली होती ! मुंबईच्या साहित्यसंमेलन-प्रसंगीं मीं माझ्या अध्यक्षीय भाषणांत 'बोरू मोडा नि बंदुका घ्या' असें सांगितलें, तें ऐकून अनेकांना मोठें चमत्कारिक वाटलें, इतकेंच नव्हे, तर अजून त्यावर महाराष्ट्रांत वादविवाद सुरू आहे. एखाद्यानें लग्नसमारंभासाठीं यावें आणि त्यानें नवऱ्या मुलास संन्यास केव्हां घेणार असा प्रश्न विचारावा म्हणजे जसें त्याला चमत्कारिक वाटेल, तसेंच साहित्यसंमेलनासाठीं आलेल्या सरस्वतीभक्तांना मीं अध्यक्षपदावरून 'बोरू टाका नि बंदुका घ्या' असें सांगितल्यावर जरा चमत्कारिक वाटले. 'बोरू टाका नि बंदुका घ्या' हें सूत्र मीं उगाच सांगितलें नाहीं. साहित्याच्या संरक्षणाकरितांच मीं तें सांगितलें. दहावीस पुस्तकें एकत्र केलीं कीं झालें वाचनालय. पण तेवढ्यानें भागत नाहीं. त्या पुस्तकांची योग्य ती व्यवस्था ठेवण्याकरितां एक ग्रंथालय हवें आणि त्याचें रक्षण करण्याकरितां बाहेर पहारेकरीहि हवा. साहित्यमंदिर तयार करणें आणि त्याचें रक्षण करणें याबद्दल जर मी कांहीं युक्ति सुचविली किंवा मार्ग सांगितला तर त्यांत विषयांतर तें काय झालें ? ज्या देशांत किंवा ज्या राष्ट्रांत उत्तमोत्तम सैनिक नसतील, ज्या राष्ट्रा-जवळ सैनिकबल भरपूर नसेल, तें राष्ट्र तर जातेंच पण त्याचबरोबर त्या राष्ट्राची भाषा, त्या राष्ट्राचें वाङ्मय, त्या राष्ट्राची संस्कृति हीहि नामशेष होते. मुसलमान राज्यकर्ते कडवे आणि इंग्रज राज्यकर्ते लुच्चे. मुसलमानांनीं आमच्या देशावर आक्रमण करून जो भाग घेतला त्या भागांतील आपलें वाङ्मय, आपले ग्रंथ जाळून टाकले व आपली संस्कृति नाहींशी केली. आणि इंग्रज राज्यकर्तेहि तीच गोष्ट, आपणास कळणार नाहीं इतक्या बेतानें करीत आहेत. ही स्थिति पालटावी, आपणाला आपल्या वाङ्मयाचें, आपल्या भाषेचें व आपल्या संस्कृतीचें संरक्षण

करतां यावें यासाठीं मी म्हणतों बोरू मोडा नि बंदुका घ्या. तक्षशिला, नालंद या विद्यापीठांचें महत्व पूर्वी इतकें मोठें समजलें जात असे कीं, जितकें सध्यां ऑक्सफर्ड–केंब्रिज विद्यापीठांना महत्व आहे. त्या काळच्या ज्ञात जगांतील विद्यार्थी विद्याभ्यासासाठीं तक्षशिला विद्यापीठांत येऊन रहात. त्या काळचे जपानी विद्वान् तक्षशिलेच्या दिशेनें पाहात प्राण सोडीत. अशा या जगन्मान्य तक्षशिला विद्यापीठाचें पुढें काय झालें ? आज त्याचे अवशेष देखील उरले नाहींत. कां असें व्हावें ? या विद्यापीठांतील विद्येचें पीठ कां झालें ? याला कारण एकच व तें म्हणजे त्या विद्यापीठांतील क्षात्रवृत्ति नाहींशी झाली, क्षात्रतेज लयास गेलें हेंच होय. विद्यापीठाचें रक्षण करण्याची ताकद आपणामध्यें राहिली नाहीं. मुसलमानी राज्य झाल्याबरोबर त्यांनी मोठमोठीं विद्यापीठें जाळून टाकली ! तक्षशिला विद्यापीठांतील ग्रंथालय सहा महिने जळत होतें ! इतकी तेथली ग्रंथ-संपत्ति मोठी होती. आपल्या जुन्या वाङ्मयाची, जुन्या पुस्तकांची अशी राख कां झाली ? कारण एकच. आपल्यामधें त्याचें रक्षण करण्याची शक्ति उरली नाहीं म्हणून. सापाच्या दृष्टीनें पाहिलें तर मनुष्यप्राण्याला दंश करणें हें पाप ठरणार नाहीं. पण मला जर तो चावू लागला तर त्याला ठेचणें यांत मीं तरी पाप कां समजावें ? ज्या विद्वान् पंडितांनीं तक्षशिलेसारख्या महान् विद्यापीठांत राजांच्या आश्रयाने विद्याभ्यास चालविला होता, त्यांची सरसहा कत्तल करण्यांत आली. याचेंही कारण त्यांच्या हातांत बंदुका नव्हत्या, आत्मरक्षणाचें व विद्यापीठाच्या रक्षणाचें सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हतें हेंच होय. म्हणून मी म्हणतों की साहित्य आणि शस्त्र यांचा संबंध अगदीं निकटचा आहे.

या माझ्या विधानाबद्दल चमत्कार वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. आजही आपली स्थिति तशीच आहे. ज्या सार्वजनिक वाचनालयांत अनेक दुर्मिळ जुने ग्रंथ आपण ठेवतां त्याच वाचनालयांत आपणाला माझीं किंवा स्वातंत्र्य–कवि गोविंद यांचीं जप्त पुस्तकें, शिवरामपंत परांजपे यांचे काळमधील लेख आपणाला ठेवतां येत नाहींत याचेंही कारण हेंच कीं, असे ग्रंथ ठेवले तरी त्यांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं कोठें आहे ? आज आपल्या हातीं बंदुका असत्या, आपल्या बाहूंत बळ असतें, तर जीं पुस्तकें जप्त आहेत तीं आपणाला बंधमुक्त करतां आली नसती काय ? आपल्या लेखणींत इतकेंहि सामर्थ्य नसेल

तर तिची किंमत एक मोडका बोरू इतकीच करावी लागेल. आपण जसे पारतंत्र्यांत खितपत पडलों आहों तसेंच आपलें साहित्य पारतंत्र्यांत जखडलें गेलें आहे. ही पारतंत्र्याची शृंखला तोडायची असेल, तर साहित्याबरोबर संग्रामशक्ति निर्माण करा. कारण आज ती लुप्त झाली आहे. लढाईवर जाऊन विजयी होऊन परत आलेला एखादा साहित्यिक आनंदानें शीळ घालूं लागला, एखादी मौजेची कविता त्यानें लिहिली, तर तें क्षम्य होईल; पण लढाई चालू असतांना जर तो प्रेमकाव्य रचीत बसला तर आपण त्याला काय म्हणाल ? आपणावर आलेलें व येणारें संकट कोणतें आहे याचा अगोदर विचार करा, त्याचें निवारण कसें करतां येईल याचा प्रथम विचार करा नि मग कविता लिहीत बसा. कवितांचा आकडा कमी भरला तरी चालेल, पण अगोदर सैनिकशिक्षण घ्या. जो सैनिक नाहीं तो जातिवंत कवीच होऊं शकत नाहीं. पोरेंबाळें भुकेनें तडफडून मरत आहेत अशा स्थितींत काव्य काय निर्माण होणार आणि तें पोटाची भूक कशी भागविणार ? देश पारतंत्र्यांत असतांना कसल्या कविता करतां ? म्हणून मी म्हणतो कीं कांहीं काळ बोरू मोडून टाका नि बंदुका घ्या. जिवंत साहित्य निर्माण व्हावें म्हणून आपण आपल्या हातीं बंदुका घ्या.

स्वातंत्र्य कवि गोविंदांनीं ' घे हातीं तरवार देवा ! घे हातीं तरवार ' असें आपल्या काव्यांत म्हटलें आहे. कवि गोविंदाच्या मनांत ' घे हातीं, तरवार हिंदु ! घे हातीं तरवार ' असेंच लिहावयाचे होतें. पण परिस्थिति आड आली. कवि गोविंदांना आम्ही स्वातंत्र्यकवि कां म्हणतो ? त्यांनीं झेंडूच्या फुलांवर, विहार करणाऱ्या पक्ष्यांवर, बागेंत खेळणाऱ्या मुलांवर कविता केल्या म्हणून नव्हे. याचा अर्थ फुलांवर नि मुलांवर मुळीच कविता करूं नयेत असा नाहीं. झेंडूच्या फुलांवर कविता लिहा पण त्या अगोदर समय कोणता आहे, संकट कोणतें आहे, भोवतालची परिस्थिती काय आहे याकडे पाहा, त्याचा अगोदर विचार करा. घराला आग लागली कीं, जवळपासचे पाणी आणूनच ती विझवावयास पाहिजे. त्यावेळीं चंद्रावर पाणी किती आहे आणि तें खालीं कसें आणतां येईल याचा विचार करीत बसण्यांत काय अर्थ. स्वातंत्र्यकवि गोविंद हे नुसते कवि नव्हते. तर ते स्वातंत्र्यकवि होते, स्वातंत्र्याचे उपासक होते. आणि म्हणूनच त्यांच्या शब्दांत तेज होतें. मीं सिंहगडचा पोवाडा रचला, पुढें तो जप्त झाला; पण त्या काळांत ज्या माझ्या थोड्या मित्रमंडळींनीं तो म्हटला त्यावेळीं त्यांत खरा रस निर्माण होत होता. कारण त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची तळमळ होती.

आज तो पोवाडा अनेक लोक गुणगुणतात, पण ती तळमळ आज नष्ट झाल्यानें त्याच शब्दांचा खरा अर्थ मात्र लोपल्यासारखा वाटतो. आपल्या आत्म्याचा खरा विकास व्हावयाचा असेल, श्रेष्ठ नि जिवंत साहित्य निर्माण करावयाचें असेल, तर अगोदर क्षात्रतेज निर्माण करा. नॉर्मन लोक इंग्लिश शब्दाचा अर्थ गुलाम असा करीत. पण आज ती स्थिति राहिली नाहीं याचें कारण त्यांनीं आपल्यामध्यें निर्माण केलेलें क्षात्रतेज. आपली संस्कृत, विद्या लुप्त होत चालली आणि सातासमुद्रापलीकडील इंग्रजी विद्येला मान मिळूं लागला. आपले अनेक प्रभावी कवि मागें पडले. पण सातासमुद्रापलीकडील शेक्सपियर, ग्रे, मिल्टन, यांना आपल्या देशांत मान मिळूं लागला, याचें कारण इंग्रजांची वाढलेली सत्ता हेंच होय. नुसत्या नांवानें राष्ट्र वर येत नसतें. राष्ट्र उर्जितावस्थेला येण्यास पराक्रम लागत असतो. पराक्रमानें नांवाला महत्व येतें. आपण आपल्या पराक्रमानें हिंदु शब्द शिरोधार्य करून ठेवा.

[ नाशिक सार्वजनिक वाचनालयाचे शतसांवत्सरिक महोत्सवाचे वेळीं केलेल्या भाषणांतील कांहीं भाग १९–१–४१ ]


# व्ही. पी. बेडेकर आणि सन्स




**मसाले, लोणचीं, पापड, सांडगे यांचे व्यापारी.**

वरील सर्व माल घरगुती पद्धतीनें तयार केलेला असून तो चोख व उत्तम असतो. व्ही. पी. नें पाठवला जातो.

**दुकानें**—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परेळ.

पत्ता—व्ही. पी. बेडेकर आणि सन्स, मुंबई नं. ४

# महासभेचा त्याग नि काँग्रेसचा त्याग

तथाकथित राष्ट्रीय सभेच्या लोकांकडून जो एक आक्षेप महासभेवर नेहमीं घेण्यांत येतो तो म्हणजे तौलनिक दृष्ट्या महासभेचा त्याग काँग्रेसच्या त्यागापेक्षां जास्त आहे काय ? दिल्लीच्या महासभेच्या कार्यकारी मंडळीच्या बैठकीला जाण्यापूर्वी माझ्या या शेवटच्या व्याख्यानांत मी या आक्षेपाचा फोलपणा सिद्ध करून दाखविणार आहे. " कॉनिकल " चें एक कात्रण मला आज देण्यांत आलें. "Mischievous proaganda" म्हणजे " खोडसाळ प्रचार " या नांवाच्या एका स्फुटामध्यें माझ्या ख्रिस्तीसभेंतील व्याख्यानाविषयीं मला त्यांत दोष दिला आहे- या व्याख्यानामुळें मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत मुस्लीम-वृत्तपत्रांत आग पाखडण्यांत आली आहे. इतर अल्पसंख्यांकांशीं सख्य करून मुसलमानांना मारण्याचा महासभेचा प्रयत्न आहे असें " क्रॉनिकल " पत्राच्या संपादकांच्या मताच्या लोकांना वाटतें. मी पण पुन्हां ठांसून सांगतो कीं, महा सभेच्या राष्ट्रीय तत्वांवर जे जे अल्पसंख्य येतील त्यांना आम्ही आमच्याबरोबर घेऊन जाऊं. मुसलमान येत नसले तर तो दोष त्यांचा आहे. त्यांच्यात कोणी शहाणे निघाले नाहींत, म्हणून इतर सर्वांना वेडे ठरविता कीं काय ?

पाश्चात्य देशांत मुसलमानांना, निर्गमन करा, आमचा धर्म स्वीकारा, नाहींतर तुमची कत्तल केली जाईल असे अंतिमोत्तर विधर्मीयांनीं दिलें होतें. आमच्याकडे मशिदींनांही देणग्या देण्याइतकी सहिष्णुता होती. म्हणूनच आज आमच्या देवळांच्या मशिदी होत आहेत !

मी सांगतो त्या महासभेच्या मार्गाचा दृश्य परिणाम म्हणून गांधींची ते भेटायला आले असतांना ज्या जिनांनीं चपराशाकडून स्वागत करून बोळवण केली, त्या जिनांचे नि हयातखानांचें मला भेटण्यासाठीं, दोन बायका ज्याप्रमाणें एका नवऱ्याला भेटण्यासाठीं भांडत बसतात त्याप्रमाणें भांडण झालें. याच मार्गानें संघटित व्हाल तर जिनाच काय, पण व्हाइसरॉयही तुमच्या दाराशी येतीलच येतील. तुम्ही अमेरीना दोष देतां; पण " No Swaraj without Hindu–Muslim Unity " ही घोषणा केली आहे गांधींनींच !

आज आम्हाला एडवर्ड जाऊन जोसेफ नको आहे; अकबरही नको आहे ! कारण कुंभाराला उडविणाऱ्या गाढवासारखें तें होईल. क्रांति कुंभाराची झाली, तुम्ही गाढवच राहिलांत !

त्यागाच्याविषयीं इतकेंच सांगतो कीं तुरुंग हीच एक देशभक्तीची कसोटी नाहीं. शिवाजी तुरुंगांत गेला होता, पण पळून आला. बाजीराव कधींच तुरुंगांत गेला नाहीं. रामदासांची तीच गत. पण हे सर्व सारखेच देशभक्त होते. वास्तविक तुरुंगांतील शिक्षेला, कॉंग्रेसवाल्यांच्या प्रपितामहांच्या दृष्टीनेंही मी भिण्याचें कारण नाहीं. पण जर तशी कसोटी घेतच असाल, तर मी निक्षून सांगतो कीं, आमच्यांतील एका एका नेत्याचा त्याग तुमच्या कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांचा त्याग कोळून घातलात, तरी अधिकच राहील ! ! आमच्यांतील ' अ ' वर्ग कोलूचा होता, मोसंब्याचा नव्हता ! नि 'ब' वर्ग काथ्या कुटण्याचा अत्यंत क्लेशदायक असा होता. तुमचा आहे तो त्याग मान्य करायला कांहींच हरकत नाहीं. पण तुलनाच करूं लागाल, तर आमच्या हालअपेष्टांच्या नि त्यागाच्या पासंगालाही तुमचा त्याग नि हालअपेष्टा पुरायच्या नाहींत ! !

प्रथम कार्यकारी मंडळापासूनच आरंभ करूं; इतर सर्व भौतिक वैभवाप्रमाणेंच विनयाचाही त्याग करून मला यावेळीं सांगितलें पाहिजे कीं, माझीं स्वतःचीं तेरा वर्षें अंदमानांत गेलीं आहेत. रात्रंदिवस तिथें एकच गोष्ट दिसत होती नि ती म्हणजे आत्यंतिक कष्टाचा मृत्यु होय ! मी तेरा वर्षें स्थलबद्धतेंत काढलीं. याहीपेक्षां अपमानास्पद त्या अवधींतील स्वातंत्र्यमारक गळचेपी भासत होती. माझ्या मोठ्या बंधूंनींही स्वतःच्या सौख्यमय जीवनाचा नि पत्नीच्या कौटुंबिक सौख्याचा केवढा त्याग केला आहे. माझ्या धाकट्या बंधूंनीं अठरा वर्षांपासून आतांपर्यंत बऱ्याच वेळां नि तुमच्या समवेतही पुन्हां तीन वेळां कारावास पत्करला आहे.

एक साधारण सिद्धांत सांगतो कीं, पूर्वींचे बहुतेक राज्यक्रांतिकारक आज महासभेंत आहेत. तेव्हांही ते हिंदुत्वनिष्ठच होते. कान्हेरे—चाफेकर यांनीं फांसावर चढतांना गीता घेतली होती हातांत, कुराण नव्हे ! धिंग्रांनीं तर स्पष्टपणें उद्घोषिलें होतें कीं " मी हिंदु म्हणून मरतों आहे. आणि भारत जोपर्यंत स्वतंत्र झाला नाहीं तोंपर्यंत हिंदु म्हणूनच मी पुन्हां पुन्हां जन्म घेऊन माझ्या

देशासाठीं पुन्हां पुन्हां मरेन!" हातांतील चेंडूप्रमाणें ज्यांनीं आपले पंचप्राण राष्ट्राकरितां फेंकून दिले, त्यांना भ्याड अहिंसकांनीं त्यागाच्या गोष्टी त्या काय शिकवाव्या! आशुतोष लाहिरींची जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा नैनी तुरुंगांत तीन रात्री घालविणाऱ्यांनीं कमी लेखावी ना! आजच कॉंग्रेसच्या इच्छुकाचा दणदणीत ८००० मतांनीं पराभव करून ते बंगाल विधिमंडळांत निवडून आले आहेत. रतनचंद हे फांशीच्या छायेंतून परत आले आहेत. आज ते रामशरण-दास हरिराम यांच्यासह उत्तर हिंदुस्थानांत हिंदुत्वाचें राजकारण करीत आहेत. १९३० त तुमचें तत्त्वज्ञान मान्य नसूनही, तुमच्याशीं खांद्याला खांदा लावून लढण्याइतक्या उदात्त देशभक्तीचे कितीतरी स्वार्थत्यागी पुढारी महासभेंत आज आहेत. त्यावेळींही प्रथम पकडलें भोपटकरांना! आतां तर काय, साठाव्या वर्षीं निजामचा तुरुंगवास धडाडीनें स्वीकारून त्यांनीं महाराष्ट्रीय हिंदुत्वनिष्ठेचें एक अविस्मरणीय प्रतीक तरुणांपुढें उभें केलें आहे. ते कांहीं पोटदुखीनें बाहेर आले नाहींत. निजामचा तुरुंग नि येरवड्याचा तुरुंग यांची तुलना तरी होऊं शकेल काय? डॉ. मुंजे तुमच्यांत चार वर्षें प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. मोपल्यांच्या अत्याचारांविषयीं गांधीनीं जें घरखाऊ भ्याड धोरण स्वीकारलें त्यामुळें ते फिरले. जमनादास मेहता तुमच्या प्रांतिकसभेचे अध्यक्षच होते. त्यांनींहि कारावास भोगला नाहीं का? भाई परमानंदांनीं आपल्या विद्वत्तेचा सर्वसाधारण जीवनांतील अमोल फायदा त्यागून राष्ट्रकार्यार्थ काय कमी देहदंड सोसले? चांदकिरण सारडा हेही अजमीर कॉंग्रेसमध्येंच होते. डॉ. नायडू तुमच्या वर्किंग कमिटीचेच सभासद होते. त्यांचा त्याग नि कष्ट आतां ते तुमच्यांत नाहींत म्हणून का कमी लेखतां? आणि सर्वांत शेवटचें उदाहरण; केवळ दोनच वर्षांच्या या प्रभावी तत्त्वज्ञानाच्या जागृतीनें जे चार हजार प्रतिकारक निजामच्या नरकवत् तुरुंगांत लाठीमार खात होते, समरांगणांत असह्य दुखापतींची बिरुदावळें मिरवीत होते, जे अत्याचार ऐकून शहारे यावे असे अत्याचार प्रतिकारीत होते त्यांना "I don't want to embarass the Nizam" असलीं मुसलमानधार्जिणी वाक्यें उच्चारणाऱ्यांनीं त्याग तो काय विचारावा?

आज हिंदुमहासभेंत बरेच लोक असे आहेत कीं जे पूर्वीं कॉंग्रेसमध्यें होते. हे लोक जोपर्यंत कॉंग्रेसमध्यें होते तोपर्यंत त्यांचा त्याग अपूर्व होता, ते देशभक्त

होते ! पण हिंदुमहासभेंत येतांच तेच देशभक्त देशद्रोही नि स्वार्थी ठरले ! असली निषेधार्ह असहिष्णुवृत्ति काय कामाची ?

महासभेच्या त्यागाचा नि कष्टशीलतेचा वृक्ष फार भव्य आहे. रोपट्यांनीं त्याच्याशीं तुलनाही करूं नये. त्यागाच्या जगांत या रोपट्यांनाही थोडें स्थान आहे, तें आम्ही सादर मान्य करतो; पण तुलनाच करूं लागलों तर काँग्रेसचा त्याग नि कष्ट हिंदुमहासभेच्या त्यागाच्या नि कष्टाच्या पासंगालाही पुरणार नाहींत.

गंगाराम खत्र्याची वाडी, ता. ४।१०।४१

---


मुंबईंत

शाकाहारी खाद्यपेयांची व भोजनाची अप्रतीम व्यवस्था

**तांबे आरोग्य भुवन**मध्येंच होते

प्रोप्रायटर्स—बी. तांबे लिमिटेड

दुकानें—( १ ) शेअर बाजार समोर, हमामस्ट्रीट फोर्ट.
( २ ) मापला महाल—ठाकुरद्वार.
( ३ ) कोना रेस्टोरंट—मॅजेस्टिक सिनेमाजवळ

ऑफीस—संझगिरी सदन गिरगांव

फोन—२०६८७

तांबे या नांवानें युक्त असलेल्या इतर कोणत्याहि दुकानाशीं आमचा संबंध नाहीं.

# हिंदूंकरतां महासभेनें काय केलें ?

आतां पद्यांतून जी स्तुति करण्यांत आली ती शब्दशः नि व्यक्ति म्हणून मी खरी मानीत नाहीं. पण हिंदुराष्ट्राच्या दृष्टीनें पाहाल तर मात्र गेल्या तीन चार वर्षांत एक तेजस्वी सूर्य निश्चित उदय पावलेला आहे; नि तो म्हणजे हिंदु-संघटनसूर्य होय.

हिंदुमहासभेला जातीय चळवळ म्हणणें किती भ्रान्तपणाचें आहे हें आंग्रे-वाडींतील माझ्या व्याख्यानांत मी स्पष्ट मांडलें होतें. हिंदूंना हिंदुस्थानांत जातीय म्हणणें हें जर्मनांना जर्मनींत जातीय म्हणण्याइकें मूर्खपणाचें आहे. आणि जातीय म्हणून तुम्ही म्हणतां कोणाला ? पांच लोकांची जात होऊं शकेल. सहस्र किंवा लाख लोकांची जात होऊं शकेल. एक कोटीला जात म्हणाल, पण तीस कोटी हिंदूंच्या जमातीला तुम्ही जात म्हणतां कसे ? ती जात नसून तें एक राष्ट्र आहे. आणि मुसलमान नि इतर अल्पसंख्यांक या जाति आहेत. एकदां राष्ट्रीय म्हणून तुम्ही स्वतःला म्हणवून घेतल्यानंतर मुसलमान म्हणून त्यांना तुम्ही निराळे ओळखतांच कसे ? पण कॉंग्रेसनें मुसलमान पुढाऱ्यांशीं घरखाऊ हिंदुमुसलमान ऐक्यासाठीं विचारविनिमय करून आपली जातीय दृष्टीच प्रकट केली आहे. वस्तुतः हिंदुमहासभेला जातीय म्हणतांना मुसलमानांना अवाच्या सवा अधिकार देणारी कॉंग्रेसच जातीय आहे !

हिंदूंकरितां हिंदु महासभेनें काय केलें, असा प्रश्न पुष्कळदा कॉंग्रेसमधील हिंदू विचारीत असतात. वास्तविक असें विचारणाऱ्यांना आमचा उलट प्रश्न आहे कीं तूं स्वतः हिंदूंकरितां काय केलें आहेस ? हिंदूंच्या हक्कासाठीं प्रयत्न करणाऱ्यांचे पाय ओढणाऱ्यांना हा प्रश्न विचारण्याचा अधिकार नाहीं. परंतु महासभेच्या आक्षेप-कांच्या वरील प्रश्नाला सरळ उत्तर असें आहे कीं, सिंधच्या विभक्तिकरणापासून परवांच झालेल्या शिरगणतीच्या प्रश्नापर्यंत हिंदूंचें हित साधण्याचे सर्व प्रयत्न एकट्या महासभेनेंच केले आहेत. ती अधिक कांहीं करूं शकली नसेल, तर महासभेच्या बाहेर जे हिंदू आहेत त्यांचा तो दोष आहे.

महासभेनें अल्पसंख्यांकांतही दोन कोटींहून अधिक लोकांना न समजणाऱ्या उर्दु भाषेची हिंदी भाषेवरील कुरघोडी थांबविली. हिंदी भाषेवरील उर्दूच्या आक्रमणाविरुद्ध रान उठवून संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा अशी घोषणा केली. वर्धा शिक्षणयोजनेनुसार जो शिक्षणक्रम आंखण्यांत आला आहे त्यात प्रत्येक पुस्तकांत पांच नवे उर्दु शब्द शिकविले जातात. भोळसट ऐक्य-साधनाच्या मार्गाचा अवलंब करून शहाजादा राम नि बेगम सीता असले धेडगुजरी नि बाडगे शब्दप्रयोग त्या पुस्तकांत करण्यांत आलेले आहेत. मुसलमानांच्या आक्रमक प्रवृत्तीपुढें मान वाकविण्याच्या भ्याड वृत्तींतच हिंदी याने हिंदुस्थानी या अजब भाषेचा जन्म आहे. जातीय निवाड्याविषयीं ना स्वीकार ना धिक्कार असलें पुळचट धोरण स्वीकारून अंतीं त्या अराष्ट्रीय निवाड्याचा कॉंग्रेसनें स्वीकार केला आहे. या निर्णयाला प्रारंभापासून महासभेनें विरोध केलेला आहे; त्या निवाड्याची कटु फळें आज बंगालमध्यें हिंदु जनतेला भोगावी लागत आहेत.

सिंधविक्रीकरणाला केवळ मुसलमान रागावतील म्हणून कॉंग्रेसनें विरोध केला नाहीं, त्यामुळें आज सक्कर सारख्या प्रांतांत हिंदूंचे गांवचे गांव बेचिराख होऊन गेले आहेत. गांधींनी यावेळीं हिजरात करण्याचा उपदेश केला होता, पण त्या हत्याकांडांत हिंदूंच्या जीवितांचें, वित्ताचें नि अब्रूचें संरक्षण हिंदुत्वनिष्ठां-नीच केलें.

पाकिस्तानच्या प्रश्नावरही कॉंग्रेसनें मौन स्वीकारलें आहे. या अराष्ट्रीय योजनेचा एका ठरावानें तरी कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें धिक्कार केला आहे कां ? उलट तुमची पाकिस्तानची योजना आहे तरी काय, असें मोठ्या सहानुभूतीनें कॉंग्रेसचे पुढारी मुसलमानांना विचारीत आहेत. हिंदुमहासभेनें अगदीं रोखठोक शब्दांत या योजनेला विरोध केला आहे. नि शेवटचा हिंदू जिवंत असेपर्यंत हिंदुस्थान अविभाज्य राखण्याचा आमचा निश्चय आहे !

अगदीं अलीकडचा शिरगणतीचाच प्रश्न घ्या. कृपालानींनी सांगून टाकलें कीं, हा जातीय प्रश्न आहे, आणि म्हणून त्याच्यात कॉंग्रेस लक्ष घालूं शकत नाहीं. पण आज या जातीय शिरगणतीला जातीय म्हणणारेच त्या गणतीवर आधारलेल्या मतदारसंघातून निवडून येण्याची धडपड करण्यास कचरत नाहींत. गेल्या शिरगणतीच्या वेळेस कॉंग्रेसच्या नादानें असहकार केल्यामुळें बंगाल इत्यादि

प्रांतांत हिंदूंची संख्या मुसलमानांच्या संख्येपेक्षां कमी भरली नि अल्पसंख्य ठरून ते पोरके झाले! यावेळीं या बाबतींत सर्व हिंदुस्थानभर हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनींच मुसलमानांच्या स्वार्थी धोरणाला पायबंद घातला नि 'आदिवासी प्रभृति वस्तुतः हिंदु असणाऱ्या पण हिंद्वेतर गणल्या जाऊं घातलेल्या लोकांची हिंदू म्हणूनच नोंद करून घेतली.

शुद्धीची चळवळ हिंदुत्वनिष्ठांनींच चालविली आहे. शुद्धीच्या चळवळीमागें मोठें राजकारण आहे. बळानें बाटवून तुम्हांला अल्पसंख्य करून सोडण्याचा डाव शुद्धी चळवळीनें हाणून पाडला आहे. स्वतःचा समाज पद्धतशीरपणें वाढविण्याची मुसलमानांची प्रवृत्ती प्रसिद्ध आहे. त्या प्रकाराला शुद्धीच्या चळवळीनें बराच आळा बसला आहे.

अगदीं अलीकडचें हिंदुमहासभेचें हिंदुत्वरक्षणार्थ तेजस्वी आंदोलन भागानगर निःशस्त्रप्रतिकाराचें युद्ध होय ! यांत पांच सहस्र हिंदु प्रतिकारकांनीं निजामच्या नरकवत् तुरुंगांतील हालअपेष्टा सोसल्या! पन्नास हजार रुपये एकट्या महाराष्ट्रानें या कार्यासाठीं वेचले ! पण अशा भीषण परिस्थितींतून भागानगरचे नि बाहेरचे हिंदु जात असतां कॉंग्रेसनें काय केलें ? निजामला मला अडचणींत टाकावयाचें नाहीं अशा घोषवाक्यानें गांधींनीं आणि निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीला प्रत्यक्ष विरोध करून कॉंग्रेसमंत्र्यांनीं आपल्या मुसलमान धार्जिण्या अराष्ट्रीय वृत्तीचा कळस केला ! हिंदूंच्या नागरीक हक्काचे बाजूनें एक फुकाचा शब्दही उच्चारला नाहीं.

आज विशेषतः सक्कर, डाक्का इत्यादि ठिकाणीं नि कर्णावति मुंबई नि इतर शेंकडों ठिकाणीं तुमच्या बाजूंनीं मुसलमान गुंडाशीं कोण लढले ? मुन्शी म्हणतात, गांधी नव्हते म्हणून कर्णावती येथील हिंदु पळून गेले ! मी म्हणतो गांधी होते म्हणूनच तसें झालें ! तोंच मुंबईत दंगा झाला, तरी इथले कुत्रेसुद्धां पळाले नाहींत. कारण संघटित नि हिंदुत्वनिष्ठ असा एक भाग इथें होता. धमक्या, मारपीट, खून, जाळपोळ या आपत्तींना तोंड देऊन, शंकरानें जसें हालहल पचविलें तसें हें दंग्याचें विष नष्ट करून टाकण्याइतके आज येथले हिंदु समर्थ बनले आहेत.

उलट कॉंग्रेस अधिकारांत होती त्या काळांत हिंदूंच्या नागरिक हक्कांची धडधडीत पायमल्ली झाली. संयुक्त प्रांताच्या पं. पंतांनीं त्यांनीं स्वहस्तें छापलेल्या

पत्रकांत ही कबुली देऊन टाकलेली आहे ! राजाजी नि मुनशी यांनीं आपापल्या प्रांतांत तेच प्रकार केले होते !

हिंदुमहासभेचे सभासद किती आहेत असा प्रश्न पुष्कळदां विचारण्यांत येतो. प्रथम प्रथम सरकारही काँग्रेसला हाच प्रश्न विचारून हिणवित असे. त्यावेळेला काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें उत्तर असें कीं We among ourselves are the vocal India speaking on behalf of the dumb millions. (" हिंदुस्थानांतील इतर लक्ष लक्ष मुक्या जनतेचे वतीनें बोलणारा भारत म्हणजेच आम्ही." ) आज दुर्दैवानें भागानगर नि भोपाळ येथील असंख्य हिंदूंची नि काँग्रेसनें ज्यांची अवहेलना केलेली आहे अशा आपदग्रस्त हिंदूंची हिंदु महासभा ही त्याच दृष्टीनें प्रतिनिधित्व करीत आहे. वार्षिक अधिवेशनाचे वेळीं एक हॉल भरला तर ज्या काँग्रेसचे पुढारी ना. गोखले आनंदानें नाचत असत, त्या संस्थेनेच वरील प्रश्न विचारला आहे !

हिंदुमहासभा काँग्रेसप्रमाणेंच वाढली तर हिंदूंना हिंदुस्थानांत मानानें राहतां येईल. न वाढली तर चिंता नाहीं. आम्ही आमचें कर्तव्य करीत आहोंत. लाला लजपतराय प्रभृती काँग्रेसमान्य पुढाऱ्यांनींच महासभेचीं जोपासना केलेली आहे. आजही काँग्रेसमधील पुढाऱ्यांनाहि आदर्शभूत असे नेते हिंदुमहासभेंत आहेत ! सरकारच्या कुशींतूनच जन्मलेल्या काँग्रेसनें हिंदुमहासभेला सरकारजमा तें काय म्हणावें ? या हिंदु–ध्वजाखालीं संघटित व्हाल, तर जगांतील कोणत्याही शक्तीची तुम्हांला भीति बाळगण्याचें कारण नाहीं. स्वतःच्या सामर्थ्यावरच तुम्ही हिंदुराष्ट्र पुन्हां एकदां वैभवसंपन्न करून सोडाल ! !

शास्त्रीभुवन, ता. ४–१०–४१

उत्तम व सुवासिक अगरबत्ती मिळण्याचें ठिकाण

**गोवर्धनदास ठोकरसी**

**चंदन व लोबणाचे मोठे व्यापारी**

चर्नीरोड ट्राम जंक्शन, ग्रांटरोड मुंबई. नं. ७

टे. नं. ४२४७८

# हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व

आज तुम्ही हिंदुत्वाचा नुसता तोंडानेंच जयजयकार केला नाहींत तर त्याच्या जोडीला रुपयांचाही छनछनाट केलात याविषयीं तुमचे मी दुप्पट अभिनंदन करतों. एक काळ असा होता कीं, पांचशें रुपये घ्या पण महासभेचें तत्त्वज्ञान ऐका असें म्हणावें लागत असे. आज पांचशेंच काय पांच सहस्र रुपये देतों पण तुमचा युयुत्सु मंत्र ऐकवा असा बदल हिंदूंत झालेला आहे. आजचेंच उदाहरण घ्या! विजयादशमीचा दिवस हा हिंदुराष्ट्रीय निधीचा शेवटचा दिवस ठरविला होता. संकल्पित निधिची टोंचणी लागून वैयक्तिक पराकाष्ठा म्हणून बडोद्याहून विष्णु कृष्ण अभ्यंकर या नांवानें एक सहस्र रुपये माझ्याकडे आले आहेत. दुष्काळ, महागाई इत्यादींनीं ग्रस्त अशा विपरीत स्थितींतहीं दीड लाखपर्यंतचा निधि मध्य-महाराष्ट्रानें जमविला आहे. आमचे कांहीं गुजराथी बंधु आहेत. तेही हिंदुच आहेत. त्यांच्यांतील कांहीं जणांनीं मला विनंती केली आहे कीं तुम्ही आमच्या प्रांतांत या! तुमच्या विजिगीषु कार्यासाठीं लक्ष लक्ष रुपयेही आम्ही मोजूं! त्यांच्यापुढेंही या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे. शरीरें नि घरेंदारें पेटलीं कीं मनेंही पेटूं लागतात.

मागील प्रत्येक व्याख्यानांत मी हिंदु–संघटनाचा एक एक पैलू सांगितला. यापुढें महासभेवरील तर्कांध लोकांच्या कांहीं आक्षेपांचा फोलपणा सप्रमाण मी सिद्ध करणार आहे.

महासभेवरील पहिला नि प्रमुख आक्षेप म्हणजे ती जातीय असल्याचा होय. या आक्षेपाचें मूळ जातीयत्व नि राष्ट्रीयत्व याविषयींची आपल्याला मिळालेली चुकीची शिकवण होय. कारण जातीयत्व नि राष्ट्रीयत्व हीं सापेक्ष असतात. एकादा लढा जर विवक्षित जातीवर होणारे अन्याय दूर करण्याकरितां असला तर केवळ तो एका विशिष्ट जातीसंबंधी आहे म्हणूनच त्याला आपण संकुचित वृत्तीचा अशा अर्थानें जातीय म्हणूं शकत नाहीं; उदाहरणार्थ, तथाकथित अस्पृश्यांवरील, अन्याय दूर करण्यासाठीं चाललेली अस्पृश्यता निवारणाची चळवळच घ्या! यांत कॉंग्रेसचें नि महासभेचें धोरण वाईट अर्थानें जातीय आहे असें

कोणीही म्हणत नाहीं. मग राष्ट्रांतील स्थायीभावच होऊन राहिलेल्या बहुसंख्य हिंदु समाजावरील अन्यायांचा प्रतिकार हा वाईट अर्थानें जातीय होऊंच शकत नाहीं; आणि दुसरें असें कीं जगांतील रूढार्थानेंही हिंदुस्थानांत हिंदु ही जात नसून एक राष्ट्र आहे. नि इतर सर्व अल्पसंख्यांक समाज या जाति आहेत. त्याच विश्वमान्य नियमामुळें, हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व हें आमचें घोषवाक्य एक प्रस्थापित सत्य आहे.

कॉंग्रेसमधील जे लोक याला संकुचित मनोवृत्ति म्हणतात, त्यांना मी विचारतो, कीं मग हिंदी राष्ट्रीयत्व हेंही विश्वबंधुत्वापेक्षां संकुचितच नाहीं का? नि इतकेंच कशाला, वेदांत्याच्या दृष्टीनें पृथ्वी हेंही एक संकुचितच क्षेत्र नाहीं का? त्याला त्यांचें उत्तर असें आहे कीं, इतर राष्ट्रें आपापल्या लोकांच्या पृथक गटालाच राष्ट्र या संज्ञेनें संबोधतात; यामुळें आम्हालाही हिंदी म्हणूनच राहणें भाग आहे. गांधी किंवा नेहरू हे कदाचित् वैयक्तिक दृष्ट्या रूझवेल्टपेक्षांहि श्रेष्ठ ठरतील. पण अमेरिकेंत त्यांना हिंदी म्हणूनच ओळखतील. आतांपर्यंत कॉंग्रेसनें प्रादेशिक राष्ट्रीयत्वाच्या खोट्या कल्पनेवर हिंदु नि मुसलमान म्हणून एक नि एक दोन मिळून एक राष्ट्र कल्पिलेलें होतें. त्यापैकीं मुसलमानांनीं आतां साफ सांगितलें कीं, आम्ही निराळें राष्ट्र आहों! मग आतां कॉंग्रेसच्या मतानेंहि दोन उणे एक म्हणजे एकच खालीं उरला, नि तेच हिंदु होत. भूमीचीं नांवें राष्ट्रावरून पडत असतात. राष्ट्राचीं नांवें भूमीवरून क्वचितच पडतात. हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वावरच हिंदुस्थान राहूं शकेल. नाहीं तर ॲबिसीनीया नि इराण यांच्यासारखाच हा देश मला वाटेल. कॉंग्रेसचा महासभेवरील जातीयत्वाचा आरोप भ्रान्त कल्पनांच्या मागें लागलेल्या डोक्यांतील आहे. तुमच्यावर आक्रमण झालें तरी, तुम्ही आणि आक्रमक यांचें एक राष्ट्र आम्हांला बनवावयाचें आहे, म्हणून तुम्ही गप्प बसा, असें जर कोणाचें म्हणणें असेल तर ती राष्ट्रीयता आम्ही शतशः धिक्कारतो!

अल्पसंख्यांकांच्या योग्य हक्कावर आम्ही कधींच आक्रमण करूं इच्छित नाहीं. त्यांनीं गुडघे टेकावे, आम्हीं उभें राहून नमस्कार करूं! त्यांची भाषा, त्यांची संस्कृति, त्यांचा धर्म त्यांनीं पाळावा. आमची भाषा, आमची संस्कृति, आमचा धर्म आम्ही पाळूं; पण असें करतांना राष्ट्रीयत्वाकरितांच आमच्या हक्कांवर कोणाचेंही आक्रमण आम्ही चालूं देणार नाहीं.

"One man one vote" ही आमची लोकशाही राज्यघटनेची बैठक आहे. गुणावर वा हवेंच असेल तर सर्वांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांतच सरकारी नोकऱ्या द्यावयाला आम्ही सिद्ध आहोंत. पण ही सर्वस्वी लोकशाहीची तत्त्वप्रणाली कॉंग्रेस मंत्र्यांनीं बेधडक लाथाडली! अरे, हिंदु म्हणून नाहीं, पण राष्ट्रीय म्हणून तरी तुम्ही असें कसें करूं शकतां? हिंदूंचे हक्क डावलून नि अल्पसंख्यांकांना अवास्तव नोकऱ्या देऊन, तुम्ही राष्ट्रीयत्त्वाला काळोखी फांसलीत! या कॉंग्रेसच्या घरखाऊ तत्त्वज्ञानाला आम्ही कवडीचीही किंमत देत नाहीं.

या सर्वश्रेष्ठ तत्त्वांना, हिंदुमहासभेच्या राष्ट्रीयत्वालाच तुम्ही जातीय म्हणत असाल तर तर्कावरील भक्कम आसन सोडूनही मी सांगतों कीं, मग आतां याच तत्त्वज्ञानानें आम्हीं पुढें जाणार! कॉंग्रेसमध्येंही कांहीं विचारवंत हिंदु आहेत; पण त्यांना बोलतां येत नाहीं. मुनशींच्या तोंडाला कॉंग्रेसचें कुलुप होतें. तें निघतांच तेंच मुनशी आज देशद्रोही योजनांचा धिक्कार उघड उघड करीत आहेत! पुढच्या दाराशीं असलेल्या चोराशीं लढतांना मागच्या दाराशीं असलेल्या चोराला चोरच म्हटलें पाहिजे त्याला मित्र म्हणून कसें चालेल? नाहींतर ज्या घरासाठीं तुम्ही पहिल्या शत्रूशीं लढतां ते घरच मागील दारचा शत्रू बळकावून बसेल! म्हणूनच या देशाचें भवितव्य हिंदूंवर अवलंबून आहे. आतांपर्यंत कॉंग्रेसमध्येंही त्याग कोणी केला? फांसावर कोण गेले? सत्याग्रहांतही कोणी भाग घेतला? लोकमान्य कोण होते? स्वतः गांधींही कोण आहेत? हिंदु आईबापांचेच ते पुत्र होत. जगांतील इतर राष्ट्रें चिमुकल्या भूतकाळावरच अभिमानानें मिरवत आहेत. तुमच्या परंपरेचा प्रारंभ धुंडण्यासही

शक्तिसाठीं मुलांस

डोंगरे बालामृत

दिलें पाहिजे

किती सायास पडतील. काँग्रेसची परंपरा म्हणून दादाभाईपासूनची मी म्हणतो. आमची काय, "उर्ध्वमूलमधः शाखं" इतकी पुरातन आहे! जिना म्हणतात काँग्रेस हिंदूंची आहे, तें खरें आहे; आतांपर्यंत हिंदूंनीच काँग्रेसला बलवान केली आहे!

आज जगामध्यें राष्ट्रीय स्वाभिमानाची केवढी ज्योत पेटली आहे. चार मिशनऱ्यांच्या अपमानाचा सूड म्हणून चीनवर स्वारी झाली होती. एका जपान्याच्या बायकोच्या संबंधांत जपान्यांनीं केवढा कल्लोळ उडविला! हिंदूंमधील प्रत्येक घटकाविषयीं अशीच भावना निर्माण झाली पाहिजे. जिना पाकिस्तानची मागणी करीत आहेत. एका विद्वानानें पंजाब देऊन टाका म्हणून तोड सुचविली आहे. मी म्हणतो, देण्याचीच वृत्ति कां तुमच्यांत? घेण्याची मनीषा कां नाहीं? अफगाणिस्तानही पूर्वी तुमचाच होता. द्रव्यांत, सैनिकबलांत, विद्वत्तेंत नि सुदीर्घ तेजस्वी परंपरेंत तुम्ही श्रेष्ठ आहांत! अशा बलिष्ठ हिंदु राष्ट्राचे घटक म्हणून या हिंदुत्वाच्या भूमिकेवर उभे राहा. गतकालांत शेकडों देशद्रोह्याचा नि शत्रूंचा तुम्ही निःपात केलेला आहे. या तेजस्वी राष्ट्रीयत्वामुळें कोणी दुधखुळे म्हणतात आपण नष्ट होऊं! जर होणारच असं तर हिंदु राष्ट्रीय म्हणूनच रणांगणांत मरून जाऊं! पण मरण्याकरितां हें राष्ट्र आज सहस्र वर्षे जगलेलें नाहीं. इतिहासाच्या नव्या पानावर जर्मनांकरितां जर्मनी, इंग्लिशांकरतां इंग्लंड, त्याप्रमाणें हिंदूंकरितां हिंदुस्थान हा देश निश्चितीनें राखून ठेवा

आंग्रेवाडी, ता. ३०-९-४१

---

मुंबईत ... राहण्याचें व भोजनाचें सर्वोत्कृष्ट ठिकाण

# माधवाश्रम

टे. नं. ४२४८४ } पारेख स्ट्रीट
गिरगांव मुंबई ४

टे. नं. ३१९४७

बोरीबंदर समोर

# आराम

## मिल्क बार अँड रेस्टॉरंट

आपल्या सेवेस तयार आहे.

तुमच्या विम्याचे पैसे तुमच्या पश्चात् तुमच्या कुटुंबाचें खात्रीनें संरक्षण करतील.

विश्वास ठेवा व लिहा—

# मे. विश्वास अँड कं.

धी ईस्ट इंडिया इन्शुअरन्स कंपनी लि०

चीफ एजंटस् (कलकत्ता)

२१९–२२१ गिरगांव रोड, मुंबई ४

# भागलपूरचें विमल यश

हिंदु जगताच्या नागरीक हक्काच्या संरक्षणार्थ भागलपूर येथें चाललेल्या विराट लढ्यावर आतां शेवटचा पडदा पडल्यानंतर, त्या सर्व घटनेचें सिंहावलोकन करण्याची वेळ आली आहे. हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळानें अपरिवर्तनीय म्हणून ठरविलेल्या महासभेच्या वार्षिक अधिवेशनाच्या त्या काळांतील घटनांसंबंधीं सर्व पत्रकें नि मतें पहातां सरकारचे निर्बंध धुडकावून भरलेल्या महासभेचें हें तेविसावें अधिवेशन आतांपर्यंतच्या कोणत्याही अखिल भारतीय संस्थेनें भरविलेल्या वार्षिक अधिवेशनांत सर्वांत यशस्वी नि संस्मरणीय झालें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

आतां आपल्यापुढें जीं नांवें वाचलीं गेलीं त्यांत कांहीं नांवें राहिली असण्याचा संभव आहे. पण सर्व प्रतिकारकांची नांवें वाचायचें म्हटलें तर एकवर्षपर्यंत अशा सभा होतील; भागलपूरला जे गेले त्यांचा सर्वांचा सत्कार प्रथम व्हावयास हवा होता. त्यामुळें व्याख्यान रद्द झालें असतें तरी हरकत नव्हती. या धर्मयुद्धांतील आपला वाटा उचलणाऱ्यांत सत्तर पंचाहत्तर वर्षांचे वृद्ध होते. त्याप्रमाणेंच सतरा अठरा वर्षांखालील मुलेंही होतीं. मीसुद्धां हा सन्मान तितकासा व्यक्तिविषयक घेत नाहीं. हिंदुत्वाचाच हा सत्कार समजतो. या आंदोलनांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेणाऱ्या सर्व प्रतिकारकांचे नि हिंदुसंघटकांचे, हिंदुध्वजाच्या मानाकरितां लढल्या गेलेल्या लढ्यांत त्यांनीं केलेल्या कामगिरीविषयीं मी अभिनंदन करतों. ज्यांनीं या लढ्यांत आपले देह ठेवले, ज्या दुसऱ्या कित्येकांनीं ब्रिटिश सत्तेचे प्रहार सहन केले त्यांना प्रस्तुत काळांत हौतात्म्याचा कांटेरी मुकुट आणि दुखापतींचीं बिरुदावलें यावांचून हिंदुमहासभा काय पारितोषकें देणार ?

भागलपूर अधिवेशनाचे बाबतींत बिहार सरकारबरोबर माझ्या वाटाघाटी २१ तारखेपर्यंत चालू होत्या. पण त्याच्या आधीं आमच्या प्रतिकाराची तयारीही आम्ही करीत होतों. व्हाइसरॉयकडे दाद मागणार आहोत असें सांगून वाटाघाटी लांबविल्या त्याही आम्हाला सिद्धतेसाठीं अवधि हवा होता म्हणूनच होय. सरकारशी मी एक गोष्ट बोलत होतो नि हिंदुत्वनिष्ठांशीं

दुसरी बोलत होतों. कार्यकर्ते शक्य तितका अधिक काळ बाहेर राहावे म्हणूनच आम्ही हें सर्व केलें, हें आतां मला उघड सांगावयाला हरकत नाहीं.

मात्र प्रतिकाराचा निश्चय हिंदुत्वनिष्ठांना कळतांच सीमाप्रांतापासून मद्रास-पर्यंत इतकी अहमहमिका हिंदुत्वनिष्ठांत लागली होती कीं, कोणी यावें यापेक्षां कोणी येऊं नये हेंच मला सांगावें लागत होतें. तुरुंगभरती हें आमचें ध्येय कधींच नव्हतें. शत्रूलाच तुरुंगात टाकण्याची आमची आकांक्षा होती. आमची युद्धपद्धति कोणा मूर्खानें शोधून काढलेली नव्हती. शिवाजी नि प्रताप यांच्या-पासून ती चालत आलेली आहे. स्वपक्षाची कमीत कमी हानी नि विपक्षाची जास्तीत जास्त हानि कशी होईल तें पाहाण्याची आमची प्रवृत्ति होती. अन् भागलपुरचा मातीचा नि बांबूचा एक मंडप उध्वस्त होतांच अक्षरशः विहारचे सहा जिल्हेच काय, पण सबंध बिहारप्रांतच या अधिवेशनाचा महामंडप बनला! अधिवेशन अवघ्या हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत पसरलें.

सरकार म्हणत होतें अधिवेशन भरूं देणार नाहीं, मिरवणुका काढूं देणार नाहीं, ध्वजारोपण करूं देणार नाहीं; पण या चारही दिवसांत प्रभातफेऱ्या, सहस्रावधि समुदायाच्या सभा, घरोघरीं भगवे ध्वज नि रात्रीं अडीच वाजल्या-पासूनच रातफेऱ्या यांचा धूमधडाका चालू होता. मोंघीर, गया, बाराबंकीपर्यंत या अधिवेशनचा विस्तार होता. एकच जयजयकार भागलपूरांत ऐकूं येत होता. तो ह्मणजे "हिंदु धर्म की जय" सरकारला वाटत होतें हा मामुली सत्याग्रह असेल. गाड्या भरभरून येतील, त्याच्या पूर्वसूचना मिळतील, स्टेशनवर पोलिसांनीं गराडलें कीं सर्वांना अटक करूं, संपलें अधिवेशन यांचें! आमचा हा निःशस्त्र प्रतिकार, त्यांना अभिनव होता. भागानगर निःशस्त्र प्रतिकारात निजामाला वांकवून कित्येकजण भागलपूरला गेलेले होते. माझ्याबरोबर गेलेल्या प्रतिकारकां-इतकेच स्वयंसेवक आधींच भागलपूरला पोंचले होते. कोणी गोसावी म्हणून गेले, कोणी पिंडदानासाठीं म्हणून गेले. कोणी वृत्तपत्रांचे प्रतिनिधी म्हणून गेले. माझ्या बरोबर असणाऱ्यांपैकींही कित्येकजण ठिकठिकाणी वाटेंतच उतरून निरनिराळ्या मार्गानें भागपूरांत पोचले होते. वेळोवेळीं नवे प्रतिकारक येतच होते. त्यामुळें गाडीतील प्रतिकारकांची संख्या पुन्हां कायमच राहिली. वॉरंट वाचून मला अटक होतांच हिंदु ध्वज हातांत घेऊन मी पोलीसाच्या मोटारींत जाऊन बसलों.

त्याचवेळेला मागच्या प्रतिकारकांना सांगितलें होतें कीं, आतां प्रत्येक हिंदुसभेचा सभासद या अधिवेशनाचा अध्यक्ष आहे नि आपल्या हिंदु आई-बापांचे अभिमानी असे सर्व हिंदुमहासभेचे सभासद आहेत ! !

पहिल्या दोन दिवसांत पोलिसांनीं प्रतिकारकांवर लाठीमाराचा नि घोडदौडीचा कहर केला. पण आमची युद्धकला शिवाजीची होती. पाण्यावर पडलेल्या काठीनें पाणी दुभंगावें त्याप्रमाणें जनसंमर्द दुभंगे, पोलीस मग मध्यें सांपडत नि चोहों-बाजूस हिंदुत्वाचा जयनिनाद उमटे. कांहीं वेळीं घोडेही हलले नाहींत. धर्मशाळेंत आलेल्या अधिकाऱ्यांचे पायच लोकांनीं धरून ठेवले. अटक करायला आलेलेच त्यामुळें अटकावले गेले.

भागलपूरच्या राजमार्गावर, कोपऱ्या कोपऱ्यावर, गल्यागल्यांतून, घरांच्या छपरावरून हिंदुत्वनिष्ठांनीं हिंदुध्वजाच्या चालविलेल्या या जयजयकारानें सरकारचा निर्बंध कोठच्या कोठें धुडकाविला गेला. तेव्हां शेवटीं आपली सर्व अब्रू बिहार सरकारनें लजपतराय उद्यानाच्या लहानशा जागेंत आणून ठेवली. "इतर सर्वत्र तुम्ही आम्हाला नमवलेत; पण या जागेंत या तर खरे !" असें म्हणून सरकारनें लजपतराय उद्यानाभोंवतीं कडेकोट बंदोबस्त केला होता. पठाणांच्या पहाऱ्यानें सरकारच्या अब्रूला कुंपण घातलें गेलें होतें. हिंदूंवर त्यांचा विश्वास नसावा ! दोन हिंदु पोलीसांनीं जागच्या जागीं त्यागपत्रें दिलीं ! त्यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें. तिथें मुंजेप्रभृतिनी त्यांचा सत्कार केला. दोन धनिक प्रतिकारकांनीं त्या पोलीसांना त्यांचें नोकरींतील वेतन देण्याची व्यवस्था केली आहे.

पहिल्या दिवशीं मुंबईच्या श्री. तोडणकर नि थत्ते प्रभृति वीर तरुणांनीं त्या उध्वस्त मंडपावर, पोलीस पहाऱ्यांतील लजपत उद्यानांत घुसून हिंदुध्वज फडका-विला ! भारत स्वतंत्र असता तर असली मर्दुमकी गाजविणाऱ्यांचा विजय-चिन्हांनीं सन्मान झाला असता ! त्यांतील कांहींना बेशुद्ध पडेपर्यंत मारण्यांत आलें. दुसरे दिवशीं नागपूरचे बाळशास्त्री प्रभृति युवकांनीं भगवा ध्वज त्याच ठिकाणीं उभारला. एका तट्टयाच्या आडोशांतून त्यांनीं उद्यानांत प्रवेश केला. पोलिसांना ध्वज लावला जाईपर्यंत तें कळलेंसुद्धां नाहीं. तिसरे दिवशीं इंदूरचे सरदार तारासिंगांनीं नि कोल्हापूरचे किंकर प्रभृतिनीं रात्रीच्या घनदाट काळोखां-तच कुसवावरून आंत उड्या मारून हिंदुत्वाचा ध्वज त्याच उद्यानांत फडका-

विला. अशा रीतीनें तीनही दिवस सरकारच्या इभ्रतीचा या वीरांनीं बोजवारा उडविला नि हिंदूंच्या मानाचा ध्वज उंच फडकत ठेवला. बिहारसरकारच्या कीर्तिसुंदरीचें वस्त्रहरण केलें ! ! योजिल्याप्रमाणें अधिवेशन भरलें, अध्यक्षीय भाषण वाचलें गेलें. ठराव पास झाले नि २०००० जनसमुदायांसमोर संपूर्ण 'वंदेमातरम्' म्हटल्यानंतर अधिवेशनाचें सूप वाजलें.

तुरुंगातही ते किती जणांना घालणार ? कोणीही यावे नि प्रतिकारकांना भेटावे अशी स्थिती होती. सायंकाळपर्यंत पुष्कळदा बाहेरचे. आंत राहात नि प्रतिकारक भेटकून पुन्हा बंदिस्त होत असत त्या तुरुंगांतही अधिवेशन भरले होतें. नेहमीप्रमाणें अधिवेशनातील भाषणें झालीं; ठराव सम्मत झाले, 'वंदे मातरम्' म्हणण्यांत आलें.

यावेळीं हिंदूंचा लढा लढविण्यास हिंदु महासभाच पुढें आली. प्रागतिकांपैकीं सन्मान्य हिंदूंनीही आम्हाला पाठिंबा दिला, तसे ठराव केले. पण सात दिवसपर्यंत विचारविनिमय करणाऱ्या नि आम्ही नागरीक हक्कांसाठीं लढतो म्हणणाऱ्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीला त्याचा विचारही करवला नाहीं ! नागरिक स्वातंत्र्य संघ प्रस्थापिणारे पं. नेहरूही त्यांत होते ! दूरच्या चीन नि रशियाबद्दल मात्र हे जीव ढसढसां रडले ! स्वतःला राष्ट्रीय समजणाऱ्या नि नागरिक स्वातंत्र्याचेसाठीं लढतों असें म्हणणाऱ्या संस्थेला ही शरमेची गोष्ट नव्हे कां ?

किंवा असे तर नसेल ना कीं ज्याप्रमाणें ब्रिटिश लोक जगांतील हिंदुस्थान सोडून इतर सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीं लढत आहेत त्याप्रमाणें नागरिक स्वातंत्र्याचे भोक्ते कॉंग्रेसवाले पुढारीही हिंदुवाचून इतर सर्वांच्या नागरिक हक्कांसाठीच लढत असावेत !

मी कॉंग्रेसच्या या भ्याड धोरणाविषयीं त्यांचा विशेष धिक्कार करतो. कॉंग्रेसच्या अधिकारस्थ काळांत श्री. राजाजी प्रभृतींनी अवलंबिलेल्या हिंदुविरोधी धोरणापेक्षां बिहार सरकारची ही बंदी अधिक अपमानास्पद नव्हती. मुसलमानांनी दुकानें अधिवेशन कालांत बंद ठेवली होती. प्रीतिनें प्रीति वाढते असें म्हणतात. पण भीतिनेंही प्रीति वाढते

भागलपूर मुस्लीम लीगच्या अध्यक्षानींही या बंदीविरुद्ध पत्रक काढलें. बिहार प्रांतांतील मुसलमान पुढाऱ्यांनीं असंदिग्ध शब्दांत बिहार सरकारच्या धोरणाविरुद्ध प्रकट केलेल्या निषेध पत्रकांनीं तर सरकारच्या मस्तकावर निर्णायक वर्मी प्रहार केला ! असेच संघटित व्हाल तर एक दिवस असा येईल कीं,

ऑल इंडिया मुस्लीम लीगचे अध्यक्ष मि. जिना यांनाही पत्रक काढावें लागेल कीं, " आम्हांला पाकिस्तान नको. आम्हांला नुसते हिंदुस्थानांत राहूं द्या." या प्रकरणावरून आमच्या शत्रूंनीं त्याप्रमाणेंच कॉंग्रेसमधील भ्रांत राष्ट्रीयानंहि बोध घ्यावा कीं, खरी हिंदुमुस्लीम एकी हिंदुमहासभेच्या तत्वानेंच लवकर होईल नि तीही मानाची असेल.

शिवाजी नि गुरु गोविंदसिंग यांच्याकाळीं जी अखिल हिंदुत्वाची भावना नव्हती आणि जी निर्माण करण्यासाठीं हिंदु महासभेनें आतापर्यंत भगीरथ प्रयत्न केले ती भावना कोणत्याही हिंदुविरोधी शक्तीला उच्छेदिण्याइतकी आतां प्रबळ झाली आहे. तुरुंगांतही सधन प्रतिकारक सर्व विशेष सोयींचा त्याग करून इतर सर्व हिंदूंप्रमाणेंच समानतेनें वागले. हिंदूंवरील अन्यायाची वार्ता ऐकून संताळांची मोठी जमात भागलपूरकडे निघाली होती. पंथभेद, प्रांतभेद, हे सर्व नद्या ज्याप्रमाणें एका समुद्राला मिळतात. त्याप्रमाणें हिंदुत्वाच्या मानासाठीं या धर्मयुद्धांत विलीन झाले होते. पण हे सर्व झाल्यानतर आपण हें विसरतां कामा नये कीं असले लढे हे भविष्यकाळांतील राजकीय रणांगणावर लढल्या जाणाऱ्या विराट स्वातंत्र्य युद्धाचे केवळ प्रातिनिधिक आहेत. आज आपण निःशस्त्र आहोत. एक दिवस असा येईल–नि तो दिवस आंतरराष्ट्रीय योगायोगामुळें तुम्हाला कल्पना करवणार नाहीं इतक्यात्वरेनें जवळ येत आहे–कीं सशस्त्र होऊन आजचे प्रतिकारक सेनापति होऊन सशस्त्र युद्धांतही शत्रूचा पाडाव करतीलच करतील. जगाच्या नव्या नकाशावर इंग्लिशांकरितां इंग्लंड, जर्मनांकरितां जर्मनी त्याप्रमाणें हिंदूंकरितां हिंदुस्थान हा देश निश्चितीनें राखला जाईल !

चौपाटी, ता. १४–१–४२

**लिथो** आणि टाइप प्रेसची शाई, रंग वॉरनिशिस, रोलर कंपोझिशन, ब्रांझ पावडर वगैरे माल व लहान मुलां-करितां सचित्र रंगीत **वर्णबोध** आणि मुळाक्षरें **मराठी गुजराती हिंदी, कानडी** व **इंग्रजी** भाषेंत; शिवाय विडी, सिगारेट, हेअर ऑइल्सचीं फॅन्सी रंगीत लेबल्स्, पोस्टर्स, कॅलेंडर्स, पिक्चर्स शोबोर्डस् वगैरे कामें छापून मिळतील.

**धी इंडस्ट्रिअल एजन्सी,** १५९ गिरगांव रोड, मुंबई ४

टे. नं. २६३७०.

# संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा

हिंदुस्थानची राष्ट्रभाषा हिंदीच करावयाची अशी चळवळ जेव्हांपासून निघाली नि ती साऱ्या हिंदुस्थानांतील हिंदूंत जों जों फैलावत चालली तों तों भारतीय मुसलमानांनीं तिला हाणून पाडण्याचा बळकट प्रयत्न चालविला आहे. त्यांचे उद्दिष्ट एकच कीं, सात कोटी मुसलमानांच्या लहरीसाठीं तेवीस कोटी हिंदूंनीं उर्दू हीच राष्ट्रभाषा करावी. उर्दू हिंदीहून वस्तुतः श्रेष्ठ आहे म्हणून नव्हे–तें नांव काढणेंच कठीण ! उर्दू आपलें दारिद्य ज्या अरबीच्या जीवावर निवारूं इच्छिते ती अरबी हिंदीला असीम शब्दसंपत्तीचा पुरवठा करण्यास सज्ज असलेल्या संस्कृत भाषेपेक्षां किंवा संस्कृत भाषेइतकी संपन्न आहे म्हणून नव्हे–राणीची नि भिकारणीची श्रीमंती मूळांतच तोलनीय नाहीं. इतर कोणतेही विशेष गुण हिंदीपेक्षां उर्दूंत अधिक आहेत म्हणूनही नव्हे, तर उर्दू ही मुसलमानी अल्पसंख्याकांची आवडती भाषा आहे म्हणूनच काय ती या एकाच कारणासाठीं तेवीस कोटी हिंदूंच्या बहुसंख्य राष्ट्रानेंही उर्दूहून ती श्रेष्ठ असली तरी आपली हिंदी भाषा सोडून या उर्दूलाच स्वतःचीही राष्ट्रभाषा मानावी हा मुसलमानांचा हट्ट ! आणि तो न पुरवाल तर ? उर्दूला तुम्हीं राष्ट्रभाषा न कराल तर ? आम्हीं हिंदीला व इतर कोणत्याही भाषेला राष्ट्रभाषा होऊं देणार नाहीं ! आमच्या घरींदारीं कित्येक प्रांतांत ती हिंदी जरी आज मातृभाषाच असली तरीसुद्धां विसरून बदलून उर्दूच चालू करूं, नागरी लिपीला हात लावणें पाप मानूं, इतकेंच काय राष्ट्रभाषा म्हणून जी भाषा करणें असेल तिला नांवापुरतेंसुद्धां हिंदी हें नांव ठेवूं देणार नाहीं. उर्दू हेंच नांव राष्ट्रभाषेचें असलें पाहिजे. ही मुसलमानांची या प्रकरणीं एकमुखी मागणी प्रथमपासून चालू आहे.

आमच्या हिंदू लोकांत एक वर्ग असा आहे कीं, कोणतीही राष्ट्रीय चळवळ म्हटली कीं, तींत जोंवर कोणी तरी मुसलमान कसाबसा तरी धरून आणून बसवला नाहीं तोंवर ती राष्ट्रीय होऊंच शकत नाहीं अशी त्यांची एक विक्षिप्त

समजूत झालेली असते. या वर्गापैकीं अनेक जणांना जेव्हां हें आढळून आलें कीं, हिंदीला राष्ट्रभाषा नि नागरीला राष्ट्रलिपी करण्याच्या कार्यीं मुसलमानांचा वर वर्णिलेला कट्टर विरोध आहे तेव्हां त्यांना देखील चैन पडेनासें झालें. हिंदीला राष्ट्रभाषा करण्याच्या कामीं ज्या वर्गांपैकी कित्येकांनी फार परिश्रम घेतलेले आहेत त्या वर्गाचे पुढारी महात्मा गांधीजी आहेत हें न सांगतांही समजण्या-सारखें आहे. हिंदी व नागरी यांचा प्रसार करण्यांत ज्या कांहीं राष्ट्रभक्त महो-दयांनी मनःपूर्वक यत्न चालविले त्यांत गांधीजींचाही परिश्रम नांवाजण्यासार-खाच-आहे. परंतु राष्ट्रीयपणासंबंधी त्यांची वरील विक्षिप्त समजूत असल्यामुळें आणि जें राष्ट्राच्या हिताचें म्हणजेच त्यांतील शक्य तितक्या बहुसंख्याकांच्या हिताचें तें राष्ट्रीय अशी राष्ट्रीयपणाची व्याख्या त्यांच्या गांवीही नसल्यामुळें अल्पसंख्य मुसलमान जो जो आततांई हट्ट करतील तो तो सुद्धां पुरवून त्यांची हांजी-हांजी केल्यावाचून त्यांना रहावतच नाहीं. त्यांनी या हिंदीच्या प्रश्नाविष-यींही मुससमानांना आंजरण्याचा नि गोंजारण्याचा, मुसलमानांचा धर्मवेडा हट्टही पुरविण्याचा सपाटा चालविला आणि एक तडजोड आपणहून सुचविली.

राष्ट्रभाषा एक करण्यासाठीं मुसलमानांचे मन वळविण्यास्तव जी तडजोड गांधीजीप्रभृती ऐक्यलोलुप मंडळींनी सुचविली आहे ती तडजोड अशीः—ज्या अर्थी कांहीं केल्या मुसलमान नागरी लिपी मानण्यास सिद्ध नाहींत त्याअर्थी एकलिपीचा नाद सोडून द्यावा. हिंदी ही राष्ट्रभाषा हिंदूंनी नागरीत लिहावी नि मुसलमानांनी अलेफबेच्या उर्दू लिपींत लिहावी आणि दोन्ही लिप्यांना राष्ट्रीय लिपींची पदवी अर्पावी. सर्व राष्ट्रीय सरकारी लिखाण दोन्ही लिपींत प्रकाशलें जावें. दुसरी आंतबट्ट्याची गोष्ट म्हणजे हिंदी भाषेला संस्कृतोत्पन्नतेची नि संस्कृत-निष्ठतेची जी घाण मुसलमान लोकांना येते ती शक्य तों न्यूनवावी. यास्तव हिंदी भाषेंत संस्कृतोत्पन्न शब्दांप्रमाणेंच शतावधि अरबी, फारशी प्रभृति उर्दू शब्दांची भर घालावी. आणि तिसरी गोष्ट म्हणजे हिंदीचें नांवसुद्धां हिंदी याने हिंदुस्थानी असें ठेवावें !! या तडजोडीवरून हें स्पष्टच दिसून येईल कीं, तीत जी काय माघार घेतली ती हिंदी भाषेचीच मोडतोड करणारी होय, हिंदूंनीच काय ती घेतलेली आहे. तडजोड म्हटली कीं, दोनही पक्षांनी देवाण घेवाण करावयाची. पण त्याप्रमाणें मुसलमानांनी कोणतीही माघार घेतली नाहीं. मुसलमानांनीं

हिंदीच्या मोडतोडीच्या प्रतिमूल्यांत जो काय उपकार आमच्यावर करावा अशी अपेक्षा हिंदूंनी धरावयाची ती इतकीच कीं, इतकी मोडतोड केल्यावर तरी मुस्लिमांनीं त्या हिंदी याने हिंदुस्थानीला राष्ट्रभाषा मानावी! पण ही अपेक्षा तरी मुसलमान पुरवूं इच्छितो आहे काय? नाहीं, कदापि नाहीं. त्याची फोड अशी—

हिंदीच्या नांवाची मुसलमानांना फार दिवसांची भयंकर चीड. यासाठीं आमच्या भोळसर मंडळीनी तिचें नांव बदलून तडजोडीचें नांव ठेवलें 'हिंदी याने हिंदुस्थानी!' ध्यानांत घ्या, हिंदी अर्थात् हिंदुस्थानी, हिंदी अथवा हिन्दुस्थानीं असें नांव नव्हे, तर 'हिंदी याने हिंदुस्थानी'! हा 'याने' म्हणजे काय पदार्थ आहे याची महाराष्ट्रांतील वा मद्रासेंतील लक्षावधि हिंदूंना नि शतावधि मुसलमानांना वार्ताही नाहीं. पण प्रत्येक शब्दसमुच्चयांत सर्वच शब्द संस्कृतोत्पन्न असतां कामा नयेत. नाहींतर राष्ट्रभाषेची अराष्ट्रभाषा होऊन पडावयाची! राष्ट्रभाषा म्हटली कीं, प्रत्येक शब्दसमुच्चयांत एक तरी उर्दू 'विदेशी शब्द पाहिजे. यासाठीं 'याने' हा उर्दू शब्द त्या नांवातच ठोकून टाकला. 'याने' या उर्दू शब्दाचा अर्थ 'किंवा' 'अर्थात्'. ज्या लक्षावधि मुसलमानांची हिंदी हीच मातृभाषा मोगल काळापासून चालत आलेली आहे ते हिन्दीला उर्दु लिपींत छापून 'हिन्दुस्थानी' असें स्वतःच निवडलेलें नांव तिला लावीत आले आहेत. यासाठीं तिचें 'हिन्दी याने हिन्दुस्थानी' असें हिंदुमुस्लिम या ऐक्यलंपट ठेवलें आणि मनांत म्हणूं लागले, आतां राष्ट्रभाषेचा प्रश्न सुटला!

पण तो प्रश्न नुसत्या नांवाचा नाहीं हें त्यांच्या ध्यानांत येईना! हिंदुस्थानी हें नांव उर्दूलिपींत छापलेल्या हिंदीस मुसलमान स्वतः जरी आजवर लावत आले असले, तरी आतां पॅनइस्लामिझमचें भूत अंगात संचरल्यामुळें त्या मुसलमानांना पूर्वी त्यांनींच निवडलेलें 'हिंदुस्थानी' हें नांवसुद्धां असह्य होत चाललेलें आहे हें आमचा हा ऐक्यलंपट वर्ग विसरला! हिंदी या नांवाप्रमाणेंच हिंदुस्थानी या नांवालाही हिंदुत्वाची घाण येते ती येतेच असें आतां मुसलमानांचें म्हणणें आहे. भाषेलाच काय पण या देशालाही मुस्लिम लोक आतां हिंदुस्थान म्हणाव यास कांकूं करूं लागले आहेत! त्यांनी तो वाद उघड उघड मांडला असून ते म्हणतात कीं, या देशाचें हिंदुस्थान हें नांवसुद्धां ऐक्यविघातक असल्यामुळें

याला जें निर्भेळ मुस्लिम नांव 'पाकस्तान' तेंच दिलें पाहिजे ! उर्दूत पाक म्हणजे मुस्लिम धर्मानुसार शुद्ध, नापाक म्हणजे मुस्लिम धर्मनिषिद्ध जें अशुद्ध तें. ज्या देशांत मुस्लिमांचें वर्चस्व तो पाक. यासाठीं या देशाचें हिंदुत्वाचें वर्चस्व दाखविणारें 'हिंदुस्थान' हें नांव पालटून त्याला मुस्लिम वर्चस्वाचें 'पाकस्तान' हें नांव द्यावें ! मुसलमानांतील आगाखान, इक्बालसारख्या मोठमोठ्या लोकांपासून तों लाहोर-लखनौच्या पैसा अखबारापर्यंत ( दिडकी पत्रापर्यंत ) हिंदुस्थान शब्दावरील हे आक्षेप उघडपणें नि कडव्या भाषेंतून चर्चिले जात असुन पंजाव, काश्मीर, सिंध, सरसीमा या प्रांतांचा हिंदुस्थानचा तुकडा तोडून निदान त्याला तरी आजच्या आज 'पाकस्तान' मुस्लिम वर्चस्वाचा शुद्ध देश, हें नांव द्या अशी मागणी त्यांनी सारखी चालविली आहे. अशा प्रवृत्तींत असणाऱ्या मुसलमानांना हिंदी हें नांव जितकें नावडतें तितकेंच हिंदुस्थानी हें नांवही नावडतेंच. तेव्हां राष्ट्रभाषा एक व्हावी या लालसेपायीं हिंदीचें नांव बदलून तिला 'हिंदी याने हिंदुस्थानी' असें धेडगुजरी नांव ठेवलें तरीसुद्धां प्रश्न कसा सुटणार ? मुसलमान म्हणतात हिंदुस्थानीसुद्धां नव्हे 'पाकस्तानी' म्हणा !

कोणत्याही देशाची राष्ट्रभाषा म्हणजे त्याचें सारें उच्च साहित्य जींत व्यक्तविलें जातें ती. भारताची राष्ट्रीय भाषा म्हणजे भारताचे अत्युच्च विचार, तत्त्वज्ञान, काव्य, रसायन, वैद्यक, पदार्थविज्ञान, यांत्रशिल्प, भूगर्भप्रभृति अनेकविध विज्ञानांचें आणि राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनाचें व्यक्तीकरण जींत होऊं शकेल अशी संपन्न, प्रौढ नि प्रगत भाषा असली पाहिजे. आतां या नानाविध विचारांना, भावांना नि भावनांना व्यक्तविण्याचें सामर्थ्य बाजार बोलींत कां कधीं असूं शकतें ? रसायन किंवा गणित किंवा वैद्यक किंवा ज्योतिष किंवा यांत्र प्रभृति विज्ञानांत लागणारे सहस्रावधि पारिभाषिक शद्ब काय बाजार बोलींत सांपडूं शकतील ? जर तें सर्वस्वीं अशक्य, तर या राष्ट्रीय भाषेंत व्यक्त होणाऱ्या अत्युच्च अशा काव्य-तत्व-विज्ञानांना अवश्य असणाऱ्या सहस्रावधि पारिभाषिक नि प्रौढ कोमल नि रुचिर, परंपरेचे नि गूढ संदर्भ सुचविणारे, अर्थवाहक नि ध्वनिमय शद्ब कोणत्या रत्नाकरांतून घ्यावयाचे ? अरबींतून ? ती स्वयमेव अत्यंत दरिद्री ! इतकी दरिद्री कीं, सारें युरोपीय अर्वाचीन विज्ञान जेव्हां भाषांतरित

करण्याचा चंग अतातुर्क कमालनें बांधला, तेव्हां त्याला स्वतःलाच अरबी भाषा इतकी टाकाऊ भासली कीं तुर्कांना जर प्रगत साहित्य हवें तर ती परकी अरबी भाषा सोडून देण्यावांचून गत्यंतर नाहीं असें उद्‌घोषून त्यानें तुर्कस्तानातून तिची हकालपट्टी केली. तुर्क म्हणजे खिलाफतीचें केंद्र, अरबी ही खिलापतीची भाषा. पण तुर्कांच्या स्वाभिमानाला नि प्रगतीला ती सारखीच विसंगत आहे असें पाहून तुर्कांनी स्वतःच ज्या अरबीला निषिद्ध भाषा ठरविली, ती परकीय नि शब्द दरिद्री अरबी आमच्या हिंदुस्थानच्या स्वाभिमानाला नि प्रगतीला काय सुसंगत नि साहाय्यक समजावयाची आहे ? अर्थात्, हे सहस्रावधि नवेनवे शद्व आम्हांला शद्वरत्नांचा केवळ रत्नाकरच असलेली नि हिंदीच्या प्रकृतीस सर्वथा अनुकूल, जी तिची केवळ मूळच आहे, त्या सुसंपन्न संस्कृत भाषेंतूनच घेतले पाहिजेत, साधले पाहिजेत. शब्दक्षमतेंत संस्कृतचा हात धरील अशी भाषा जगांत आंजही दुसरी आढळणार नाहीं. त्या संस्कृतचा शब्द-रत्नाकर नि साहित्यक्षीरसागर दाराशी असतां आम्हीं कृपणतेची नरोटी हातीं घेऊन मरुभूमीच्या अरबी वाळवंटात ‘ पाणी ! पाणी !’ करीत काय म्हणून भट-कावें ? आणि मुसलमानांना कुठें तडजोड पाहिजे ? उर्दू हीच राष्ट्रभाषा आपल्या स्वतःच्या बळानें आपण करून सोडूं अशी आहे त्यांची बढाईखोर धमक नि धमकावणी. अगदीं सीमाप्रांतापासून घ्या. या प्रांतांत मुस्लिम बहुसंख्य. त्यांचे हातीं सत्ता येतांच त्यांनीं यच्चावत् बोर्ड शाळांतून हिंदी गुरूमुखी शिक्षण निषिद्ध करून टाकले. वैदिक नि शीख या दोन्ही पंथांच्या हिंदु मुसलमानांना उर्दू भाषा नि लिपीच शिकली पाहिजे ! सरकारी काम तिच्यांतच ( हिंदु–शीख, शीखेतर दोघेही विधिमंडळांतून दोनदां या ठरावाच्या निषेधार्थ उठून गेले. पण कोणी भीक घातली नाहीं ! ). मुसलमान बहुसंख्य, यासाठीं त्यांच्या प्रांतांत त्यांची उर्दू भाषा नि लिपीच राष्ट्रभाषा नि राष्ट्रलिपी मानणें युक्त. बहुधा अशा भावनेनें कॉंग्रेस व गांधीमंडळ त्याचा निषेध करण्याचें नावसुद्धां घेत नाहींत. पण मग याच न्यायें निजामच्या राज्यांत हिंदु बहुसंख्य, परंतु तिथेंही शाळांतून त्यांना उर्दू शिकणें भाग पडतें, म्हणून त्याचा निषेध तरी गांधी मंडळानें करावयास पाहिजे होता. पण उलट नागपूरला निजामच्या निषेधाचा ठराव मराठी मंडळीनी तो दडपून टाकला. काश्मीरांत मुस्लिम बहुसंख्य, यास्तव हिंदु राजानें तें राज्य

सोडावें असें तोंडपुजे विधान करणाऱ्या गांधीजींना त्याच न्यायें ' निजाम व भोपाळ हीं बहुसंख्य हिंदु संस्थानें, त्यांच्या मुस्लिम नवाबांनी राज्य सोडावें ' असें सांगण्याची मात्र छाती होत नाहीं. उलट ' भोपाळ रामराज्य आहे ' असा धडधडीत खोटा नि खोडसाळ बहाणा करण्यास गांधीजींना जसा संकोच वाटला नाहीं तसाच हा प्रकार !

खिलाफत चळवळीपासून बंगल्यांतील बहुसंख्य मुसलमानांची भाषा उर्दूच करून टाकण्याची केवढी चळवळ चालविली आहे ! क्रमिक पुस्तकांतील बहुसंख्य बंगाली शब्द काढून त्या जागीं उर्दू शब्द घातलेली क्रमिक पुस्तकें निघत आहेत. त्याच्याही पुढें जाऊन शब्दच काय पण अर्थही वादग्रस्त विषय झाला ! रवींद्रांच्या साहित्यावर मुस्लिमांनी आघात चालविले आहेत. उपमासुद्धां मुस्लिम संस्कृतीच्या हव्यात. भीमासारखा बलवान ! असेंच कां म्हणतां ? रुस्तुमसारखा बलवान म्हणा. विक्रमचंद्रगुप्ताचेच धडे कां ? स्पेन विजेत्या तारीकचे धडे घाला !

हा मुसलमानांचा हट्ट पहा नि कांहीं हिंदूंची परधार्जिणी नि भ्याड वृत्ति पहा. एका मुसलमानानें गांधीजींना पत्र टाकलें कीं, ' भूषणा 'चे काव्यांत मुसलमान निंदा आहे. लगोलग गांधींनी काय केलें ? भूषण काव्य वाचले ? नाहीं. तेच म्हणतात, मी भूषण वाचला नाहीं. त्यांना शिवाजीचें चरित्रही माहीत नव्हतें. पण स्वतःच त्या विषयांत हास्यास्पद अज्ञानी असणाऱ्या गांधीजींनी त्या एका मुसलमानाच्या पत्रासरशीं भूषणासारख्या कवीचें काव्य निषिद्ध ठरविलें आणि क्रमिक हिंदी पुस्तकांतून त्यांचे उतारे घेऊं नयेत म्हणून फतवा सोडला ! इंदूर हिंदु संस्थान, हिंदु बहुसंख्य पण तेथील सरकारी न्यायालयांतील सारें कामकाज अजूनही उर्दू भाषा–लिपीतून चालतें !

परंतु सगळ्यांत दुबळा नि दुधखुळा कोटिक्रम म्हणजे आपले शब्द मारून जे उर्दू शब्द मराठी हिंदीत शिरले आहेत त्यांना आपल्या मानहानीचें द्योतक न मानतां उलट आपल्या पराक्रमाचे विजयध्वज मानावे अशी कांहीं हिंदु लेखकांनींच शेखी मिरवावी हा होय. चीत पडलेल्यानें माझेंच नाक वर म्हणून म्हणण्याचा कोडगेपणा करावा ! यांच्या कोटिक्रमानुसार आज जी शिक्षित मंडळी इंग्रजी शब्दांनी बुजबुजाटलेली बटलरी भाषा वापरतात ती सारी चटोर मंडळी

इंग्लिश भाषेवरहि मोठमोठे दिग्विजय मिळवीत चालली आहे म्हणावयाचा ! कारण ती मंडळी या अनेक इंग्लिश शब्दांना पाडाव करून मराठीत खेचून आणीत आहेत. इंग्लीश भाषेवर चढाई करून आमचा न्हावी 'हेअर कटिंग सलून'ला पाडाव करून आणीत आहे, तर धोबी 'वॉशिंग कंपनी'चा पाडाव करीत आहे ! इंग्रजांच्या राजकीय वर्चस्वामुळें बोकाळलेल्या आमच्या दास्य-प्रवृत्तीचीं हीं चिन्हें आहेत, इंग्रजी भाषेची हिंदी मराठीवर झालेली ही कुरघोडी आहे, का मराठीनें छिनून आणलेले हे ध्वज आहेत ?

तीच गोष्ट मुस्लिम वर्चस्वाच्या काळांत बळावलेल्या उर्दू शब्दांची. पुण्याच्या साऱ्या पेठांचीं नांवें मुसलमानी होतीं. पुणें जळल्यानंतर वसविलें गेलें तेव्हां पेशव्यांनीं पुण्याच्या पेठांची शुक्रवार, शनिवार प्रभृति आजची स्वकीय नांवें ठेवलीं हा काय पेशव्यांचा पराजय झाला ? सिंहगड औरंगजेबानें घेतला तेव्हां त्याचें नांव ' बक्षिंदाबक्ष ' असें ठेवलें. मराठ्यांनी तो गड घेतला इतकेंच नव्हे तर तें


# सांडू ब्रदर्स यांचीं

औषधें वापरा. तीं परिणामकारक असतात असें गेल्या ४० वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे.

**हार्टिना** ||| **ब्राह्मी तेल** ||| **बाळंतकाढा**

**बाळकडू** ||| **कुमारी आसव नं. ३** ||| **च्यवनप्राश**

सर्वत्र मिळतात.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर–मुंबई.

शाखा—ठाकुरद्वार, दादर, परेळ, काळबादेवी

मुसलमानी नांवही पुसून टाकून त्याला आजही सिंहगड म्हणत आहेत हा काय मराठ्यांचा पराभव झाला ? नाशिकला गुलशनाबाद, काशीनालंदेला इस्लामाबाद अशी नांवे मुसलमानांनी दिलीं. हिंदूनी तीं मानलीं नाहींत, नाशिक काशी हींच नांवें तगविलीं हा काय हिंदुसंस्कृतीचा पराजय समजायचा ? देवगिरीचें दौलताबाद नांव आजही तसेंच चालतें हा हिंदुसंस्कृतीचा विजय समजायचा ? शिवाजी महाराजांनी पुरस्कारिलेल्या म्लेंच्छ शब्दांच्या बहिष्कार प्रवृत्तीमुळें शेकडो उर्दू शब्दांची मराठी भाषेंतून हकालपट्टी झाली म्हणजे शिवाजी प्रभृतीनी मराठी भाषा मुस्लिमांच्या हातीं सोंपवून पराजित करून टाकली असें समजायचें तर !! दास्यविकृत मनोवृत्तीचें हें उदाहरण किती विचित्र तें पहा ! उलटी खोपडी म्हणतात ती ही !

असो. उर्दूसंच राष्ट्रभाषा नि राष्ट्रलिपी करावयाची नि तीं हिंदूंवर बळानें लादावयाची असा मुसलमानांचा अट्टाहास आहे. हिंदूनी त्याला विरोध केला पाहिजे. हा दोन संस्कृतींचा विरोध आहे. हिंदूनी या संघर्षास उघडपणें नि जय्यतपणें सिद्ध झालेंच पाहिजे. आमची हिंदूंची राष्ट्रभाषा हिंदीच रहाणार, हिंदूपुरता आम्ही हा प्रश्न सोडविणार अशी घोषणा हिंदूंनी केली पाहिजे. मुसलमानांची हांजी हांजी करण्याचें कांहीं एक कारण आम्हांस नाहीं. मुसलमानांना हवें असल्यास त्यांनी ऐक्य करावें. ' याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुमच्याविरुद्धही हिंदुराष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील ! ' हिंदु–मुस्लिम ऐक्याचें सर्वच प्रकरणीं लागूं असणारें हेंच सूत्र भाषेच्या प्रकरणींही तेंच लागूं. जोंवर बहुसंख्य हिंदू एकीसाठीं मुसलमानांच्या पाया पडत आहेत, तोंवर हिंदुस्थानचें पाकस्तान करण्याच्या एकाच अटीवर काय ते मुस्लिम लोक एकीला हो म्हणाले तर म्हणतील. ही भाषिक प्रकरणींही उघड उघड नि अपरिहार्य वस्तुस्थिती आहे !

या सर्व कारणांसाठीं हा राष्ट्रीय भाषेचा नि राष्ट्रीय लिपीचा प्रश्न सोडविण्याचा इष्टतम नि एकच मार्ग म्हणजे हा कीं, प्रत्येक हिंदूने अशी उघड उघड नि बेधडक प्रतिज्ञा करावी:—

“ आम्हां हिंदूंची राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आणि संस्कृतनिष्ठ अशी ती नागरी लिपी हीच आम्हां हिंदूंची राष्ट्रलिपी ! ”

सह्याद्री जून १९३७

REFBK-0006263